म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का. वा.
दा. क्र. ३६७२

IRBK-0103672

विखुरलेले मोती

सौ. शान्ता माडखोलकर

विखुरलेलें मोतीं

[सुभद्राकुमारी चौहान यांच्या 'बिखरे मोती' या सुप्रसिद्ध हिंदी कथासंग्रहाचा अनुवाद]



कै. सौ. शांताबाई माडखोलकर

म. प्र. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. 3402 बों. दि .....
वि. ..... क. .....

IRBK-0103672

मकर संक्रांत,
१४ जानेवारी १९५१.

किंमत दोन रुपये

— प्रकाशक —

पंडित अनंत कुलकर्णी

कुलकर्णी ग्रंथागार

१८६, शनिवार, पुणे २.

प्रकाशन ८० वें

मुखपृष्ठ

जी. डी. पेडणेकर

— मुद्रक —

मोरेश्वर श्रीधर बोकील

' शशिकांत प्रिंटिंग प्रेस '

३७३, शनिवार, पुणे २.

स्मृतिचिन्ह

जिनकी आशा अभिलाषा हैं चूर चूर होकर सोती ।
उनके ही हलचलसे धुलकर बिखरे हैं ' बिखरे मोती ' ॥

ज्यांच्या आशा अभिलाषा चूर चूर होऊनी जाती ।
त्यांच्या अडउणारे न्हाऊनी हे ओघळले ' बिखरे मोती ॥ '

" विखुरलेलें मोतीं "

कथानुक्रम

		पृष्ठ
१.	भग्नावशेष ...	९
२.	पापी पोट ...	१४
३.	मधली राणी ...	२१
४.	परिवर्तन ...	३६
५.	दृष्टिकोन ...	४४
६.	कदंबाचीं फुलें ...	५३
७.	कोळ्याची मुलगी...	५९
८.	एकादशी ...	६६
९.	आहुती ...	७१
१०.	भाची ...	८०
११.	आंबराई ...	८५
१२.	अनुरोध ...	८९
१३.	ग्रामीण ...	९३
१४.	रंगपंचमी ...	१०७
१५.	किस्मत ...	११०

१९५०

आमचीं प्रकाशनें

१. जेहलम् : ना. सी. फडके ६

२. मेंफल : ना. सी. फडके ३

३. माहेर : अरविंद गोखले ३

४. फुलवाली : वि. वा. शिरवाडकर २

५. आशेचे किरण : प्रा. वा. भा. पाठक २॥

६. कोंकण-कथा : कृ. के. राहाळकर १॥

७. हंसूं आणि आंसूं : ना. सी. फडके ५

८. गोड सोबत : वि. वि. बोकील २

९. चुकामूक : दत्तू बांदेकर १॥

१०. शशिकलेच्या बांगडया : श्री. रेखी ।।=

११. किशोर-कुंज–भाग २ रा : पंडित अ. कुलकर्णी २

१२. पद्मा : गोपाळ नीलकंठ दांडेकर ३

सुभद्राकुमारीचें विनीत निवेदन

मी हें "बिखरे मोती" आज वाचकांच्या हातांत देत आहे. हें सर्व एकाच शिंपल्यांतून निघालेलें नाहींत. सामाजिक रूढी आणि बंधनाच्या शिलांवर अनेक निरपराध आत्मे रोज चूर होत आहेत. त्यांचें हृदय-बिंदु जिकडे तिकडे मोत्यांसमान विखुरलेलें आहेत. मीं फक्त त्यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रयत्नांत मला कलेचा लोभ आहे व अन्यायाबद्दल शोभ आहे. सर्वत्र मानवी हृदय एकच आहे. तें पीडेनें दुःखित, अत्याचारानें रुष्ट व करुणेनें आर्द्र होतें. दुःख, करुणा आणि रोष कोणाच्या हृदयांत नाहीं ? म्हणून या गोष्टी माझ्या नसून माझ्या हृदयाच्या आहेत. आपल्या नसून आपल्या हृदयाच्या आहेत. आणखी कोणाच्या नसून सर्वांच्या आहेत. समाज आणि संसार यांच्यांत घात-प्रतिघात जे निरंतर होत असतात त्यांचे हे प्रतिध्वनि आहेत. ते आपण ऐकले असतील. मीं नवीन असें कांहींच लिहिलें नाहीं. फक्त त्या प्रतिध्वनींना भावनाप्रधान हृदयाच्या द्वारें बरोबर ताल-सुरांत बसविण्याचा प्रयत्न केला आहे.

मग्न हृदयांतून अश्रू गळतात. शिंपेंतून बाहेर पडलेलें तें मोतीच जणुं ! हृदयाला ठाऊक आहे कीं, त्यानें स्वतः त्या आंसवांना पाट दिला आहे. म्हणून ते पवित्र आहेत. ज्याप्रमाणें शिंप येवढेंच जाणते कीं, आपण दिलेला मोती खरा आहे. तो अमूल्य आहे कीं मूल्यहीन आहे, हें ती जाणत नाहीं. त्याचें मूल्य रत्नपारखीच करूं शकतो. म्हणून या "विखुरलेल्या मोत्यां"ची किंमत रसिक वाचकांवरच अवलंबून आहे.

मला हें सर्वांच्या समोर ठेवण्यांत संकोच वाटत होता. त्याबरोबरच हा प्रयत्न हास्यास्पद होईल कीं काय अशीही मला भीति वाटते. पण श्री. पद्मलाल पन्नालाल बक्षी यांच्या आग्रहानें मला प्रोत्साहन दिलें व हें पुस्तक प्रकाशित झालें. म्हणून मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतें.

जबलपूर
श्रीकृष्ण-अष्टमी
संवत १९८९

—सुभद्राकुमारी चौहान

निवेदन

जबलपूरच्या सुप्रसिद्ध कवयित्री आणि कथालेखिका सौ. सुभद्राकुमारी चौहान यांच्या 'बिखरे मोती' या हिंदी कथा-ग्रंथाचा मराठी अनुवाद मी वाचकांना सादर करीत आहे. पंधरा वर्षांपूर्वी हा संग्रह प्रसिद्ध झाल्याबरोबर माझ्या वाचनांत आला होता. पण त्याचा अनुवाद करण्याची कल्पना मात्र प्रकाशकांनीं कोणत्यातरी पुस्तकाची मजजवळ मागणी केल्यावर मला सुचली. मराठी वाचकवर्गाला या कथांतील वातावरण अपरिचित आणि झुनाट वाटण्याचा संभव आहे. कारण महाकोसलमधील मध्ययुगीन जमीनदारी परिस्थिति, पडदा आणि अशिक्षण यांमुळें स्त्रीजीवनाचा जो कोंडमारा सर्व बाजूंनीं चालू आहे त्याचें प्रतिबिंब या कथांत पडलेलें आहे. 'बिखरे मोती' म्हणजे दलित, पीडित, अज्ञानी अशा स्त्रियांच्या डोळ्यांतील विखुरलेले अश्रू. कै. हरिभाऊ आपटे यांनीं ५० वर्षांपूर्वी लिहिलेल्या 'पण लक्षांत कोण घेतो' वगैरे कादंबऱ्यांतून जरी महाराष्ट्रीय स्त्रीची जवळजवळ अशाच प्रकारची दुर्दशा वर्णन केलेली असली तरी महाराष्ट्रांत जमीनदारी पद्धति फारशी नसल्यामुळें आणि स्त्रीशिक्षणाचा प्रसार झपाट्यानें झाल्यामुळें महाराष्ट्रीय स्त्री सुशिक्षित, स्वावलंबी आणि स्वातंत्र्यप्रिय अशीच आपल्या डोळ्यासमोर उभी राहते. महाकोसलमध्यें विंध्यहुना नर्मदेपलीकडील उत्तरभागांत अजून मध्ययुगीन वातावरण बहुंशीं कायम असल्यामुळें तिथें स्त्री ही आजही अशिक्षित, दलित आणि पीडितच राहिली आहे. तिचे अश्रू म्हणजे या कथा होत.

महाराष्ट्रांतील स्त्रियांची परिस्थिति जरी आज अगदीं बदलून सुधारून गेलेली असली तरी तिच्या महाकोसलमधील भगिनींचे हे अश्रू मराठी वाचकांच्या हृदयाला हलवून सोडतील यांत शंका नाहीं. सौ. सुभद्राकुमारी चौहान यांनीं आपल्या 'विनीत निवेदनां'त स्वतःच्या या कथांविषयीं असे आत्मविश्वासाचे उद्गार काढले आहेत कीं, "दुःख दोष और करुणा किसके हृदयमें नहीं है ? इसीलिए ये कहानियाँ विशेष की न होने पर भी सबकी हैं."

हे उद्गार अगदीं खरे आहेत. दुसऱ्याच्या दुःखानें जे दुःखी होतात त्यांना या कथा खचित आवडतील आणि बोधप्रदही वाटतील.

२७-४-४७ —शांता माडखोलकर

भग्नावशेष

मी लेखकही नव्हतों व कविही नव्हतों; पण कवितेची मला आवड होती. कां तें सांगतां येणार नाहीं. पण कवितेबद्दल मला आत्यंतिक आवड होती, एवढें खरें ! मीं नेहमींच सर्व कवींच्या कविता वाचीत असें. ज्या मला जास्त आवडत त्यांचीं कात्रणें मी आपल्या जवळ ठेवीत असें.

एकदां मी प्रवासाला निघालों होतों. वाटेंत एक ठिकाणीं गाडी बदलायची होती. तें मोठें जंक्शन होतें. परंतु स्टेशनवर खाण्यापिण्याच्या वस्तू नीटशा मिळेनात, म्हणून मला गांवांत जाणें भाग पडलें. बाजारांत जातांच भिंतीवर चिकटविलेलीं मोठमोठीं हस्तपत्रकें माझ्या नजरेस पडलीं. एका कविसंमेलनाची जाहिरात होती ती ! विशेष कवींच्या नांवांचाहि त्यांत उल्लेख केलेला होता. कविसंमेलनाची नुसती जाहिरातच मला पुरेशी होती. त्यांत खास कवींचीं नांवें वाचून माझी उत्सुकता फारच वाढली.

* * *

पुढच्या गाडीनें जावयाचें ठरवून मी संमेलनाच्या ठिकाणीं पोहोंचलों. काव्यगायन आधींच सुरूं झालें होतें. मीं प्रवेश केला त्या वेळीं एक उर्दू शाहीर आपली आवेशपूर्ण कविता सभागृहाला ऐकवीत होते. प्रेक्षकांकडून

मिळणाऱ्या साथीमुळें कविता ऐकणेंहि कठीण झालें होतें. मी एका बाजूला जाऊन गुपचूप बसलों. प्रयत्न करूनही माझे डोळे स्थिर राहीनात. जणु कोणाला तरी पाहाण्याच्या आत्यंतिक इच्छेनें ते विकल झाले होते. कितीतरी कवींनीं आपल्या कविता ऐकविल्या. सर्वांच्या शेवटीं एक भगिनी व्यासपीठाकडे हळुहळू जातांना दिसली. तिच्या चालण्यावरून, चेहऱ्यावरून तिला वाटत असलेली लाज व संकोच स्पष्ट दिसत होता. तिनें कविता म्हणायला सुरवात केली. शब्दाशब्दांत इतकी वेदना प्रतीत होत होती कीं, श्रोतृसमुदाय मंत्रमुग्ध होऊन तिची कविता ऐकत होता. कवितेबद्दलचे प्रशंसोद्गार तर राहोतच, पण लोकांनीं श्वास घेणें सुद्धां जणुं बंद केलें होतें ! माझ्या शरिरांतील कण ना कण त्या कवितेचें स्वागत करायला उत्सुक झाला होता.

एकदां तरी तिला भेटल्याशिवाय तेथून निघून जाणें मला तरी अशक्य होतें. म्हणून मीं माझें जाणें आणखी लांबविलें.

* * *

त्या काव्यगायिकेचा पत्ता मिळवून मी दुसरे दिवशीं सकाळीं आठ वाजतां तिच्या घरीं जाऊन पोहोंचलों व आपली परिचयपत्रिका आंत पाठविली. परिचयपत्रिका मिळतांच एक मध्यम वयाचे सज्जन दिसणारे गृहस्थ बाहेर आले. मीं त्यांना नम्रपणें विचारलें, "त्या घरांत आहेत ?"

"हो आहेत. या, बसा ना."

आदर दर्शवीत मीं म्हटलें, "काल संमेलनांत गाइलेल्या त्यांच्या कविता मला फार आवडल्या, म्हणून मी त्यांना भेटायला आलों आहें."

लगेच त्यांनीं आंत निरोप पाठविला. थोड्याच वेळांत मला त्या येतांनाही दिसल्या.

ओळख झाल्यावर पुष्कळ वेळपर्यंत निरनिराळ्या साहित्यावर आम्हीं पुरत्या गप्पा मारल्या. मी त्यांचा निरोप घ्यायला उठलों तेव्हां त्यांनीं

30-8-66 अनुक्रम

मला रात्रीचें जेवणाचें आमंत्रण दिलें. मला नाहीं म्हणवलें नाहीं. त्यामुळें दिवसभर मला त्यांच्या सहवासाचा लाभ घडला. या थोड्या अवधींत त्यांची अलौकिक प्रतिभा पाहून मी आश्चर्यचकित झालों. अतांपर्यंत मला त्याच्याविषयीं वाटत असलेल्या प्रणयपूर्ण आकर्षणाचें भक्तियुक्त आदरांत पर्यवसान झालें. रात्रींच्या जेवणानंतर मला निघणें प्राप्त होतें. वाटेंत मला आपण कांहीं तरी वस्तु हरवून आलों आहों अशा प्रकारची भावना त्रास देत होती.

* * *

घरीं आल्यावर मीं त्यांना एक-दोन पत्रें लिहिलीं. परंतु एकाचेंही उत्तर आलें नाहीं. माझी अत्यंत निराशा झाली. माझ्या मनाला किती त्रास झाला तें वर्णन करणें माझ्या शक्तीबाहेर आहे; परंतु नाइलाजानें गप्प बसणें भाग होतें. त्यांच्या कविता मिळवून वाचण्याचा प्रयत्न मात्र सदोदित करीत होतों.

आतांशीं कितीतरी दिवसांत मला त्यांची कविता वाचायला मिळाली नव्हती. त्यामुळें माझ्या मनांत काळजी उत्पन्न झाली. मनाला समजावण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण चैन पडेना. शेवटीं त्यांना भेटायचें ठरवून घरांतून बाहेर पडलों. घरांतून निघतांनाच डावा डोळा फडफडला व मांजर आडवें गेलें. या अपशकुनामुळें मीं माझा निश्चय मुळींच सोडला नाहीं. पण व्हायचं तेंच झालं. तिथें ती मला भेटली नाहीं. घराला कुलूप होतें. चौकशीअंतीं समजलें कीं, बऱ्याच दिवसांपूर्वी तिचे वडील वारले आणि तिचे मामा तिला घेऊन गेले. पुष्कळ प्रयत्न करून सुद्धां तिच्या मामांचा शोध लागला नाहीं. अशा तऱ्हेनें वाऱ्याच्या झोताप्रमाणें ती माझ्या जीवनांत आली व निघून गेली. तिच्याविषयीं मला कांहींच कळूं शकलें नाहीं.

* * *

दहा वर्षांनंतर——

एकदां मी असाच कुठेंतरी जायला निघालों होतों. वाटेंत एका मोठ्या जंक्शनवर गाडी बदलायची होती. या स्टेशनवर दोन गाडीचे फाटे निरनिराळ्या ठिकाणीं जात होते. मी दुसऱ्या वर्गाच्या डब्यांतून खालीं उतरलों. जवळच असलेल्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यांतून एक स्त्री उतरली. तिचा चेहरा सुंदर पण सुरकुतलेला होता. डोळे मोठाले पण दृष्टि कातर होती. कपडे अगदीं साधे, मळके असे होते. कडेवर एक वर्षभराचें मूल होतें. जवळच दोन-तीन आणखीं मुलें होतीं. मीं लक्षपूर्वक पाहिलें. ती 'तीच' होती. धांवतच मी तिच्याजवळ गेलों. एकदम माझ्या तोंडून निघून घेलें, "तूं इथें! या वेषांत." तिनें माझ्याकडे पाहिलें. तिच्या तोंडांतून बारीकसा चित्कार बाहेर पडला. म्हणाली, "कोण? तुम्ही आहांत?"

मीं म्हटलें—"मी तोच आहें. तुझा अनन्य भक्त. एकांतांत पूजा करणारा तुझा उपासक! पण तूं मला विसरलीस कशी? तुझ्या कवितेवरच मी आयुष्याचे दिवस कंठीत होतों. आतां कविता लिहिणंही तूं सोडून दिलंस का?"

तिच्या मनावरचा ताबा एकदम उडाला. डोळ्यांतून न जाणें किती मोठमोठाले मोतीं विखुरलें. सद्गदित अंतःकरणानें ती म्हणाली, "लिहिण्याबाचण्याविषयीं आतां मला कांहीं विचारूं नका."

इतक्यांत दुसऱ्या बाजूनें एक मध्यमवयाचा गृहस्थ तिथें आला. आल्याबरोबर माझं उभं राहणं त्याच्या डोळ्यांत जणुं काय खुपलं. आपल्या आवाजांत तें दर्शवीत तो झिडकारून म्हणाला, "इथें उभी राहून गप्पा मारते आहेस. कांहीं वाटत नाहीं तुला?"

ती म्हणाली, "हे माझ्या वडिलांचे....." तिचें वाक्य पुरें होण्यापूर्वीच तो पुटपुटला, "चूप बैस. मला कांहीं ऐकायचं नाहीं. मुकाट्यानं चल." तिनं माझ्याकडे अत्यंत भेदक दृष्टीनें पाहिलें. तिच्या दृष्टींत असीम करुणा, विवशता व कातरता ओसंडत होती. हळुहळू ती आपल्या पतीच्या मागें चालूं लागली.

अशा रीतीनें दहा वर्षांनंतर ती पुन्हां एकदां माझ्या नैराश्यपूर्ण जीवनांत अंधारांतल्या विजेप्रमाणें चमकून नाहींशी झाली. माझ्यापासून तिला जबरदस्तीनें हिरावण्यांत आलें. तिचें दर्शनही मला दुर्लभ झालें.

● ● ●

पापी पोट : : २

आज सभेत लाठीहल्ला झाला. पांच हजार निःशस्त्र शांत मनुष्यांवर ५० हत्यारबंद लोखंडी टोंकाच्या लाठ्या घेऊन पोलीस तुटून पडले. लोक जीव बचावून पळूं लागले. पळतां पळतां जवळजवळ पांचशें लोकांना तर जबर जखमा झाल्या. तीन माणसें तर बेशुद्ध होऊन सभागृहांत पडलीं. तीन-चार प्रमुख लोकांना पकडून तुरुंगांत पाठविण्यांत आलें.

पोलिसांनीं झेंडा लावलेला खांब खालीं पाडला व त्याला आग लावून दिली. तिरंगी झेंडा पाडून पायाखालीं तुडवला. सरकारी सत्ता सर्वांना काळासारखी वाटूं लागली.

लौकिकदृष्ट्या पोलिसांचा विजय झाला. त्यांच्यासमोर सर्व लोक पळतांना दिसले. क्वचित् एखाद्यानें आपल्या जागेवर उभें राहण्याचें धाडस दाखविलें, तो लाठीमारांनीं धरणीवर लोळवला गेला. मात्र विजयाचा उल्हास त्यांच्या मुखावर दिसत नव्हता. एक प्रकारची उदासीनता होती. त्यांच्या चालण्यांत आनंदामुळें प्राप्त होणारा हलकेपणा नव्हता; तर पायांत जणुं मणामणाच्या बेड्या घातल्या आहेत असें वाटत होतें. आनंदानें त्यांचें हृदय उचंबळत नव्हतें. तें भारावलें होतें.

पोलीसलाइनींत गेल्यावर शिपाई लाठीहल्ल्याची चर्चा करूं लागले.

निःशस्त्र माणसांवर लाठी चालविल्याबद्दल वाईट वाटत होतें. राम खिलावतनें आपल्या खोलीचा दरवाजा लावून घेतला व लाठी चुलींत घालून जाळून टाकली. त्याच्या लाठीनें एका कोमल लहान मुलाचें डोकें फुटलें होतें. त्याला वाटलें, 'निरपराध, निःशस्त्र लोकांना लाठीनें मारणें ! काय ही हत्या ! कशाकरितां ? पोटाकरितां ? हें पापी पोट जनावरंसुद्धां भरतात. आपण मनुष्य होऊन असं पाप करायचं ? वीस रुपयांकरितां इतका नीचपणा ? आतां हें आपल्याकडून होणार नाहीं. ज्या परमेश्वरानं पोट दिलं आहे तो कसाही देईल. आग लागो त्या नोकरीला !" दुसऱ्या दिवशीं नोकरीचा राजिनामा देऊन तो देशांत निघून गेला.

* * *

ठाणेदार बरकतउल्ला लाठीहल्ल्याच्या वेळीं ओरडून ओरडून हुकूम देत होते, "मारा, खूप मारा, मोठे स्वराज्य घ्यायला आले आहेत. जोरांनीं मारा." आपल्या घरीं गेल्यावर मात्र त्यांचा हा आवेश नाहींसा झाला. त्यांची वाणी कटु होती; पण हृदय तितकं निर्दय नव्हतं. दरवाजांत पाऊल ठेवतांच त्यांच्या बीबीनें म्हटलें, "पहा हा गफूर, कसा हुंदके देऊन देऊन रडतो आहे. आज काय केलंत तुम्हीं ? तीनदां-तीनदां विचारलं तर म्हणतो, 'अब्बांनीं गोपूला ठार मारलं.' मला तर कांहीं समजत नाहीं काय झालंय तें !"

हें ऐकतांच ठाणेदारसाहेब सुन्न होऊन खालीं बसले. गोपाळ फार सरळ व प्रेमळ मुलगा होता. ठाणेदारांचा गफूर व तो एकाच वर्गांत शिकत होते. दोघेही जिवलग मित्र होते. ठाणेदारांना फार दुःख झालें. ते उद्गारले "आग लागो अशा नोकरीला ! दिवस असे वाईट आहेत. नाहींतर तेव्हांच राजीनामा दिला असता; पण नोकरी सोडून काय करणार ? घरांत बायको आहे, कच्चीं बच्चीं आहेत. म्हातारी आई आहे. यांचं कसं होईल ? नोकरी तर वाईट आहेच, पण पोटाचा प्रश्न त्याहून वाईट आहे. आज

महिन्यास साठ रुपये मिळतात. नोकरी सोडली तर कोणी वीस रुपयांनाही विचारणार नाहीं. या पापी पोटाकरितां नोकरी करणं भाग आहे; पण या पापापासून सुटायला एक मार्ग आहे. तीन महिन्यांची माझी रजा शिल्लक आहे. तीन महिने पुष्कळ झाले. तोंपर्यंत ही परिस्थिति पालटून जाईल." असा विचार करून दुसरेच दिवशीं त्यांनीं रजेकरितां अर्ज केला.

* * *

इकडे कोतवाल बख्तावरसिंह यांचीही परिस्थिति वाईटच होती. दुःखानें त्यांचें मन ठणकत होतें. बख्तावरसिंह रजपूत होते. रजपुतांचा पराक्रम त्यांच्या स्मरणांत होता. चितोडचा जोहार, जयमल आणि फत्ताचे आत्मबलिदान, राणा प्रतापचा पराक्रम त्यांच्या अंतःकरणांत राहून राहून अस्वस्थता उत्पन्न करीत होता. त्यांना वाटलें 'मी त्याच वीरांचा वारस आहें. अनेक शतकांचें पूर्वजांचें पुण्य माझ्या पाठीशीं आहे. माझ्या पूर्वजांनीं कधींही निःशस्त्रावर हल्ला केला नाहीं, पण आज मीं हें काय केलं ? यापेक्षां मरण पुरवलं ! हें पापी पोट जगांत काय करणार नाहीं ?"

या उलटसुलट विचारांत ते रात्रीचें जेवणही विसरले. जेवण जाणार तरी कसं ? त्या जखमी विव्हळ मुलाचें रक्तरंजित कोमल शरीर, त्याचे सद्गुण, आक्रंदन आणि हृदय भेदून टाकणारी त्याची भेदक दृष्टि, त्यांच्या डोळ्यांसमोरून हटेना. त्या आठवणीनें त्यांच्या हृदयाचे तुकडे तुकडे होत होते ! अशा अस्वस्थ मनःस्थितींतच त्यांना केव्हां झोंप लागली कोण जाणे !

सकाळीं उठतांच त्यांना आठवलं कीं, काल आपण पगाराचे ३०० रु. खिशांत ठेवले होते. कोणीं घेतले तर नसतील ना ?—या शंकेनें त्यांनीं ताबडतोब कोट उचलला व खिशांतून नोटा काढून मोजूं लागले. शंभर-शंभराच्या तीन नोटा होत्या. बादशहाचा शिक्का त्यावर होता. सरकारतर्फे कोणाच्या तरी हस्ताक्षरानें त्यावर लिहिलें होतें कीं, "तुम्हीं मागतांच शंभर रुपये देण्याची मी हमी घेतों." अशा प्रकारें तीनशें रुपये दर

महिन्याला मिळत जाणार. वर्षाला ३६०० ! तीन हजार सहाशें, तीस वर्षांत एक लाख आठ हजार ! दर वर्षाला बढती मिळेल. तीस वर्षांनंतर पेन्शन ! शिवाय वरची अमदानी निराळीच !! अशा मनोराज्यांत ते गुंगले असतांच टेलीफोनची घंटा वाजली. चटकन् ते टेलिफोनजवळ गेले व रिसीव्हर घेऊन म्हणाले, " हॅलो. " दुसऱ्या बाजूनें आवाज आला, "डी.एस.पी. आपण कोण आहांत ?" त्यांनीं सांगितलें, "शहर कोतवाल !" शहर कोतवाल हा अधिकारदर्शक आवाज त्यांच्या कानांत भरून राहिला. दुसऱ्या बाजूनें पुन्हां उत्तर आलें. " हें पहा, कोतवालसाहेब, आज ११ वाजतां तुरुंगांत काल पकडून पाठविलेल्या कैद्यांचा खटला चालेल. तुम्हांला साक्ष द्यावी लागेल. बरोबर अकराला तुम्ही तुरुंगांत जा. " कोतवालसाहेब म्हणाले, " ठीक आहे. "

रोजच्याप्रमाणें कोतवालसाहेब ऑफिसमध्यें गेले. ऑफिसमध्यें पोंचतांच त्यांची रोजची कुरकुर सुरूं झाली. ' कोतवालींत काम फार असतं. मोठं शहर असल्यानं दिवसभर घाण्याला जुंपावं लागतं. खायला सुद्धां वेळ मिळत नाहीं. २४ तास सारखं राबावं लागतं. तेव्हां कुठें तीनशें रुपये डोळ्यांना दिसतात. तीनशें रुपयांत काम होतं ? आजकाल पांचशें रुपयां. खालीं अब्रुदार माणसाला जगणं कठीण होऊन बसलं आहे. या पैशाकरितां खरं-खोटं, न्याय-अन्याय, करूं नये तें करावं लागतं. पण उपाय काय ? या सहा फूट शरिराचा व्यापार नीट चालविण्याकरितां या पोटांत ढकललं तर पाहिजे. परमेश्वरानं पोट दिलं नसतं तर किती बरं झालं असतं ! ' या विचारांत वेळ निघून गेला. बरोबर ११ वाजतां तुरुंगांत पोंचण्याकरितां कोतवालसाहेब निघाले.

* * *

लाठी-हल्ल्याचा हुकूम दिल्यानंतर लगेच रायसाहेब कुंदनलाल यांना मोठ्या साहेबांकडून जरूरीचा निरोप आला. साहेबांनीं त्यांना ताबडतोब

बंगल्यावर बोलाविलें होतें. इकडे लाठी-हल्ला सुरूं असतांनाच ते मोटारींत बसून साहेबांच्या बंगल्यावर निघून गेले. कामाचें बोलणें संपतांच लाठी-हल्ल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करून 'रायबहादुरीबद्दल आपण तुमची अवश्य शिफारस करूं', असें त्यांनीं सांगितलें. बड्या साहेबांचे आभार मानून कुंदनलाल घरीं परतले. निःशस्त्र लोकांवर लाठी चालवल्याबद्दल त्यांची सदसद्विवेकबुद्धि त्यांना टोंचत होती. त्यांचें मन त्यांना 'तूं वाईट गोष्ट केलीस' असें बजावीत होतें. लाठी-हल्ल्याशिवाय काम निभलं असतं, सभा झाली असती म्हणून काय बिघडत होतं? ते लोक सभेंत कांहीं कोणाला मारणार नव्हते. मग मीं त्यांच्यावर लाठी-हल्ला करण्याचा हुकूम कां दिला?' दुसरं मन म्हणालं, 'यांत बऱ्यावाईटाचा काय प्रश्न आहे? तूं आपलं कर्तव्य बजावलंस. भगवान् श्रीकृष्णानें कर्तव्यपालनार्थ आपल्या आप्तेष्टांना मारण्याचा उपदेश अर्जुनाला केला नाहीं का? मग तुझं कर्तव्य काय आहे? आपल्या अधिकाऱ्याचा हुकूम पाळणं. धूम करणाऱ्या लोकांवर लाठी चालवण्याचा तुला हुकूम होता. सरकारचं तूं मीठ खातोस; त्याच्या आज्ञेचं उल्लंघन तूं कसं करणार? आज्ञा मिळाल्यावर उचित-अनुचिताचा विचार करण्याचं कारणच नाहीं. धर्मनीतिज्ञ पितामह भीष्मांनीं अर्जुनाचा पक्ष खरा असूनही मिठाला जागण्याकरितां दुर्योधनाला नाहीं का साथ दिली? त्याप्रमाणें तुलाही आपलं कर्तव्य केल पाहिजे. परिणाम चांगला होवो अगर वाईट होवो!'

पुन्हां त्यांच्या मनानें दंश केला, 'कोणाला ठाऊक किती जणांचीं डोकीं फुटलीं आहेत?' दुसरें मन उत्तरलें, 'जोंपर्यंत सरकारी नोकरी करायची आहे तोंपर्यंत इमानानें केली पाहिजे. आपल्याच्यानें होणार नसेल तर नोकरी सोडून द्यावी. हे लोक नाहींतरी स्वराज्याकरितां झगडताहेत. त्यांचं काम निःस्वार्थबुद्धीनें ते करताहेत. सर्वांचं हितच आहे ना त्यांत? पण करणार काय? नोकरी सोडून दिली तर या पापी पोटाचं कसं होईल?

आमच्या मनांत काय देशप्रेम नाहीं ? पण उपाशी पोट देशप्रेम कसं करणार ? मीं आज नोकरी सोडली तर हे स्वराज्यवाले मला ६०० रुपये देणार आहेत का ? मागें घर आहे, मुलंबाळं आहेत, त्यांना तर पोसलंच पाहिजे ना ?' असा विचार करीत ते आपल्या बंगल्यावर येऊन पोहोंचले.

* * *

घरीं पोहोंचतांच त्यांना कळलं कीं, त्यांची पत्नी दवाखान्यांत गेली आहे. लाठी-हल्ल्यांत मुलाचें डोकें फुटलें आहे. त्यांचें काळीज धडधडायला लागलें. एकच मुलगा होता त्यांना. लगेच मोटारींत बसून जलदीनें ते दवाखान्याकडे निघाले. तेथें पोहोंचतांच मुलाला मांडीवर घेऊन त्यांची पत्नी अश्रू गाळीत असलेली त्यांना दिसली. गोपूच्या डोक्याला पट्टी होती व त्याचे डोळे बंद होते. त्यांना पाहतांच त्यांची पत्नी तिरस्कारानें म्हणाली, " हा तुमच्या लाठी-हल्ल्याचा परिणाम ! " तिचा कंठ भरून आला आणि डोळ्यांतून अश्रुधारा वेगानें वाहूं लागल्या. कुंदनलालजींच्या तोंडांतून एकही शब्द निघाला नाहीं. इतक्यांत डॉक्टर आले. त्यांनीं समजावणीच्या स्वरांत म्हटलं, " घाबरण्याचं कांहीं कारण नाहीं. जखम मोठी आहे खरी, पण यापेक्षां मोठ्या जखमा झालेले बरे होतात. आपण काळजी करण्याचं कारण नाहीं. "

रायसाहेब पत्नीला म्हणाले, " तूं त्याला बाहेर कां जाऊं दिलंस ? " पत्नी म्हणाली, " मला विचारूनच तो बाहेर गेला का ? "

रात्रभर गोपू बेशुद्ध होता. दुसरे दिवशींही तो शुद्धीवर आला नाहीं. दुसऱ्या दिवशीं अकरा वाजतां तुरुंगांत खटला चालणार होता. पण न्यायाधीश नेमल्या वेळीं येऊं शकले नाहींत. तीन महिन्यांपासून त्यांच्या कोर्टांत चाललेल्या एका खटल्याचा निकाल आज त्यांना द्यायचा होता. तेरा वर्षांच्या एका मुलीस विकण्याकरितां पळवून नेल्याचा तो खटला

होता. गुन्हा शाबीत झाला होता. न्यायाधीशांनीं त्याला सहा महिन्यांची सक्तमजुरीची कैद दिली होती.

निकाल ऐकून न्यायाधीश तुरुंगांत आले. रायसाहेब व कोतवालसाहेब यांच्या साक्षी झाल्यावर दोघांपैकीं एकाला दोन वर्षें सक्तमजुरी व दोन हजार रुपये दंडाची शिक्षा झाली. दुसऱ्याला दीड वर्ष कैद व १५०० रु. दंड; तिसऱ्याला एक वर्षाची कैद आणि ५०० रु. दंड अशा शिक्षा झाल्या होत्या. कैद्यांनीं खटल्याच्या कामांत कोणताच भाग घेतला नाहीं. किंवा पुढची तारीखही मागितली नाहीं. त्यामुळें खटल्याचें काम एक तासांत आटोपलें.

तीनही कैदी चांगले प्रतिष्ठित होते. रायसाहेबांच्या ओळखीचे होते. खटला संपल्यावर रायसाहेबांनीं त्यांची माफी मागितली व म्हटलें, " क्षमा करा मला. या पापी पोटापुढें मी लाचार आहें. नाहींतर आमच्या मनांत काय देशप्रेम नाहीं ? " आपल्या मनाचे अशा रीतीनें थोडंसं समाधान करून ते घाईनें दवाखान्यांत आले. गोपूची स्थिति वाईटच झाली होती. त्याची नाडी हळूं हळूं मंद होत होती. रायसाहेब तिथें पोंचल्यावर प्रथमच त्यानें डोळे उघडले. त्याच्या चेहेऱ्यावर थोडेंसें हंसूं दिसत होतें. शांतपणें तो म्हणाला, " वंदेमा···म् ! " पण उच्चार नीट होऊं शकला नाहीं. म् च्या उच्चाराबरोबर उघडलेलं त्याचं तोंड तसंच राहिलं. डोळे कायमचे बंद झाले ! त्याच्या आईनें हंबरडा फोडला. रायसाहेबांच्या शून्य हृदयांत पुन्हां पुन्हां प्रश्न येत होता, ' हें सर्व कशाकरितां ? ' आणि त्याला दुसरीकडून उत्तर मिळत होतें, ' पापी पोटाकरितां ? '

● ● ●

ते माझे कोण होते ? मी काय सांगूं ? तसं पहायला गेले तर ते माझे कोणी नव्हते. होतील तरी कसे ? मी ब्राह्मण, ते क्षत्रिय; मी स्त्री, ते पुरुष ! नातेवाईक नाहींत कीं मित्रही नाहींत ! हाय ! काय केलं मीं हें ! मित्र ? एखाद्या स्त्रीचा एखादा पुरुष कधीं मित्र होऊं शकतो ? कदाचित् झाला तर समाज तें सहन करील ? इथें तर एखाद्या पुरुषाला भेटणं किंवा बोलणं पाप समजलं जातं. कदाचित् एखाद्या स्त्रीनें एखाद्या पुरुषाशीं मैत्री करण्याचा प्रयत्न केला, प्रेमानें त्याच्याशीं बोलली, तर ती भ्रष्ट समजली जाते. चरित्रहीन ठरते. परपुरुषाशीं संबंध ठेवण्याचा दुसरा अर्थच होऊं शकत नाहीं. मला समाजापासून कांहीं ध्यायचें नाहीं न् द्यायचंही नाहीं. माझा कांहीं संबंध नाहीं. दुधांत पडलेल्या माशीप्रमाणें समाजानें मला उचलून फेंकून दिलें आहे. मी तरी त्याची पर्वा कशाला करूं ?

माझे आईबाप साधारण स्थितीचे होते. कुटुंबांत आईबाप व माझे तीन मोठे भाऊ होते. मी सर्वांत लहान होते. लहान असल्यामुळें घरांत माझे लाड झाले. माझे दोन भाऊ बनारस विद्यापीठांत शिकत होते. आणि तिसरा राजन मॅट्रिकमध्यें शिकत होता. माझे वडील संस्कृत पंडित होते. जुन्या रूढींचे पूर्ण पक्षपाती. माझं लग्न नवव्या वर्षीं करून शास्त्राप्रमाणें

कन्यादानाचे अक्षय पुण्य मिळवण्याचा त्यांचा विचार होता. पण ते कांहीं लोकांच्या व विशेषतः माझ्या भावांच्या विरोधामुळें इतक्या लवकर लग्न करूं शकले नाहींत.

जेव्हां मी इंग्रजी पांचवींत शिकत होतें व माझें वय चौदा वर्षांचें होतें तेव्हां माझ्या आईबापांना माझ्या लग्नाची चिंता वाटायला लागली. ते वर शोधत होते. त्याच वेळीं ललितपुरचे जहागीरदार राजा राममोहन आमच्या प्रांतांत शिकारीला आले होते. आमच्या प्रांतांत मोठें जंगल होतें. तिथें शिकार फार चांगली मिळत असे. त्यांचा डेरा आमच्या गांवाच्या जवळच होता. गांवांतल्यांना तो एक तमाशा झाला होता. त्यांच्या तंबूतून कधीं ग्रामोफोनचे, तर कधीं नाच तमाशाचे सूर कानावर येत असत. लोकांच्या झुंडीच्या झुंडी हा फुकट तमाशा पहायला जमत असत. एक दिवस मी माझे वडील व भाऊ राजन यांच्याबरोबर त्यांच्या तंबूंत गेलों. माझ्या वडिलांची राजेसाहेबांशीं ओळख होतीच. आम्ही त्यांच्या जवळ जाऊन खुर्च्यांवर बसलों. त्यांनीं आमचा सत्कार केला. जातांना बरोबर फळं, मेवामिठाई देऊन आपल्या बगींतून आम्हांला पोंचवून दिलें. गांवांतल्या किती तरी मुलांमुलींच्या उत्सुक नजरा बगींतून येत असतांना माझ्याकडे लागल्या होत्या. मला तर वाटत होतं कीं, मी जणुं कांहीं राणीच आहें. या कल्पनेनें मी त्यांच्याकडे डोळा उचलूनही पाहिलें नाहीं.

माझ्या भावांना जेव्हां समजलं कीं, ताराचं लग्न एका जहागीरदाराच्या विलासी, बेताचें शिकलेल्या मुलाशीं होणार आहे, तेव्हां त्यांनीं फार विरोध केला. पण त्यांच्या विरोधाला कोण विचारीत होतं! वडील आपला हट्ट सोडायला मुळींच तयार नव्हते. 'यापेक्षां चांगला वर कुठें मिळणार?' असं त्यांना वाटत होतं. घरंदाज आणि कुलीन घराण्यांतला मुलगा—ही त्यांच्या दृष्टीनें महत्त्वाची गोष्ट होती. शिवाय राजेसाहेबांबरोबर सोयरीक केल्यानें गांवांत त्यांची प्रतिष्ठा केवढी वाढणार होती! विवाहाचें प्रथम

बोलणें राणीसाहेबांनीं आपण होऊन केलें होतें. आणखी काय पाहिजे ! एरवीं येवढ्या मोठ्या घरांत मुलगी देण्याचा विचारही त्यांच्या मनांत येणं शक्य नव्हतं. हुंडा एक पैसाही न द्यावा लागतां मुलगी इतक्या मोठ्या घरांत दिली जात होती. इतक्या गोष्टी त्यांना नजरेआड करणं कसं शक्य होतं ?

माझे वडील मी राणी होणार म्हणून माझ्या भाग्याबद्दल माझं कौतुक करीत. ' राणी होणार ' या कल्पनेनें मी सुद्धां अगदीं फुगून गेलें होतें. भावांचा विरोध मला आवडत नव्हता. पण मी त्यांना कांहीं म्हणूं शकत नव्हतें. शेवटीं एकदांचं माझं लग्न मधले राजा मनमोहन यांच्याबरोबर झालंच.

फुलांनीं सजवलेल्या मोटारींत बसून मी सासरीं जायला निघालें. ललितपूर आमच्या गांवापासून २७ मैल दूर होतें म्हणून वरात मोटारींतून निघाली. आयुष्यांत प्रथम मी मोटारींत बसलं. मला असं वाटत होतं कीं, मी वाऱ्याबरोबर उडते आहें. २७ मैल मोटारींत बसूनही समाधान झालें नाहीं. ' रस्ता आणखी लांबेल तर किती छान होईल ! ' असं मला सारखं वाटत होतं. पण तें कसं शक्य होतं ? एका मोठ्या महालाच्या स्त्रियांच्या खास दारासमोर एकदांची मोटार थांबली. सासू तर नव्हतीच. माझ्या मोठ्या जावेनें (मोठ्या राणीनें) मला ओवाळून आंत नेलें. मला एका मोठ्या सजवलेल्या खोलींत बसविण्यांत आलें. तीनदां तीनदां माझ्याजवळ बायका येऊन माझं तोंड वर करून मला पाहायला लागल्या. कोणी कोणी कांहीं भेटीदाखल देत होत्या. माझ्या जावेनें मला पाहिलें व जरा नाखुषीनेंच माझ्या बोटांत एक अंगठी घातली. शेजारच्या खोलींत कोणाशीं कोणी तरी बोलत असलेलें मला ऐकायला येत होतें. " पाहिलंत का सुनेला ? काय सारखी तारीफ चालली होती ! मामंजींच्या सांगण्यावरून वाटत होतं कीं, अगदीं इंद्राची अप्सरा असेल. पण रंग न् रूप सुंदर सुंदर म्हणून कुठली

भिकाऱ्याची मुलगी करून आणली न् घराला कमीपणा आणला ! मामंजी तर रूपावर बेहद्द खूष होते. मी स्वतः सुंदर नसले म्हणून काय मला सौंदर्याची पारखही नाहीं ? ह्या तितक्या सुंदर स्त्रिया पाहिल्या आहेत. त्यांच्या नखाचीही सर हिला नाहीं. मामंजींची साठी बुद्धि नाठी झाली आहे आतां. मधल्या राजांचा गळा कापला त्यांनीं. '

हें सर्व वक्तृत्व ऐकणारी विरजूची आई त्यांच्या सुरांत आपला सूर मिळवीत म्हणाली, ' सुंदर तर आहेतच राणीसाहेब. आपल्यासारख्याच तर आहेत. लहान आहेत अजून. मोठ्या झाल्या कीं आणखी रूपवान् दिसतील. '

हें बोलणें मोठ्या राणीसाहेबांना आवडलें नाहीं. त्या तावातावानें म्हणाल्या, ' आणखी रूप चढतंय ! मुळांत असेल तर येणार ना ? दिसतंच आहे. ' एक मोठा उसासा टाकून त्या म्हणाल्या, ' हुः ! जाऊं द्या, बरं असो कीं वाईट असो ! आपल्याला काय करायचंय ! '

खोलींतून सर्वजणी निघून गेल्यावर जेव्हां मी एकटीच राहिलें तेव्हां माझ्याबरोबर आलेल्या पाठराखणीनें माझा शेला काढून ठेवला. आरसा हातांत घेऊन मीं तोंड नीट निरखून पाहिलं. विचार करूनही मला माझ्या रंगरूपांत दोष आढळेना.

* * *

पहिल्यांदा फक्त पांच दिवस सासरीं राहून मी वडिलांबरोबर माहेरीं आले. सासरचे पांच दिवस मला पांच वर्षांसारखे वाटले. राणी बनण्याचं स्वप्न पार नाहींसं झालं होतं. मी घरीं आल्यावर कांहींच बोललें नाहीं. पण पाठराखणीच्या तोंडून सर्व हालहवाल ऐकल्यावर आई म्हणाली, ' राणी मग नांवाचीच असते. आंतली परिस्थिति तर आमच्याहूनही तिपराटी आहे. '

महिना-सव्वा महिना होतांच मला सासरहून फळ आलं. राजेसाहेबांच्या इच्छेविरुद्ध माझे वडील तिळभरही जायला तयार नव्हते. मनांत नसूनही त्यांना मला पाठवणं भाग पडलं. इतक्या लवकर सासरी जाणं मलाही मुळींच आवडत नव्हतं. पण करणार काय? श्रावणांत जेव्हां सर्व मुली सासरहून माहेरीं येतात तेव्हां मी सासरच्या कोंडवाड्यांत बंद व्हायला चालले होते. भाऊजींबरोबर मी मोटारींतून जायला निघालें. या वेळीं मी माझ्याबरोबर माझी बाजाची पेटी घेतली होती.

प्रथम मी सासरीं आलें तेव्हां माझ्याबरोबर पाठराखीण होती. या वेळेला माझी पेटी व थोडीशीं पुस्तकं याशिवाय दुसरं कांहीं नव्हतं. एका खोलींत नुसतं बसून बसून मला उबल्यासारखं वाटे. घरांत असं कोणीही नव्हतं—ज्याच्याशीं तास, दोन तास गप्पा मारून जिवाची करमणूक होईल. फक्त लहान राजे, माझे छोटे भाऊजी, यांच्याशीं बोलणं मला जरा बरं वाटे. पण तेही माझ्याकडे अगदीं कमी आणि मोठ्या राणीसाहेबांना चुकवून केव्हांतरी येत असत. साऱ्या दिवसभर मी वाचीत असें. पण पुस्तकं तरी किती पुरणार? आठ-दहा दिवसांत सर्व पुस्तकं वाचून झालीं. एक-एक पुस्तक दोनदां-तीनदां वाचून झालं. लहान भाऊजी केव्हांतरी गुपचुप मला वर्तमानपत्र आणून देत असत.

घरांत सर्व कामाला नोकर-चाकर, दास-दासी होतीं. घरांत कांहींही काम करायला नव्हतें. माझ्या तैनातीला सदैव दोन दासी हजर असत. मला मात्र मी त्यांची कैदी आहें, असें वाटत असें. कारण माझी प्रत्येक बारीक-सारीक गोष्ट मोठ्या राणीच्या कानापर्यंत पोंचत असे. एखाद्या दासीला जर मीं कांहीं कामाकरितां पाठविलें तर मोठ्या राणीच्या हुकुमाशिवाय ती कुठेंही बाहेर जाऊं शकत नव्हती. त्यांची परवानगी मिळाली तरच काम करायचं. दर महिन्याला १५० रु. मला खाजगींतून हातखर्चाला मिळत. पण महाराजांना विचारल्याशिवाय मला एक पैही खर्च

करणं शक्य नव्हतं. घरांतल्या व्यवहाराचीं सर्व सूत्रें मोठ्या राणीच्या व बाहेरचीं मामंजीच्या हातांत होतीं. मधले राजे माझे पति अत्यंत विलास-प्रिय, मदिरासक्त, शिकारीचे शौकी—कोणाला ठाऊक आणखी काय होते ते ? कसं सांगूं तें सर्व ? ते फार सुंदर होते. त्यांचं दर्शनसुद्धां मला दुर्लभ होतं. चार-सहा दिवसांत कधीं तास अर्ध्या तासाकरितां ते खोलींत आले तर महत्भाग्य ! त्यांच्या रूपमाधुरीचं पोटभर पान करायला माझे डोळे अजूनही तहानेलेले आहेत. पण तशी वेळ कधीं आलीच नाहीं.

या सगळ्या वैभवाच्या देखाव्याच्या आंत माझं जीवन फरपटलं जात असतांच माझ्या अंधकारमय जीवनांत तें प्रकाशासारखें झालें.

छोटे राजांचें वय १७।१८ वर्षांचें होतें. ते फार सज्जन आणि चांगले होते. घरांत लिहिण्या-वाचण्याची संवय फक्त त्यांनाच होती. छोटे राजे मॅट्रिकच्या परीक्षेची तयारी करीत होते. त्याकरितां एक मास्तर असत. ते त्यांना शिकवीत असत. घरांत येण्याजाण्याची त्यांना पूर्ण मुभा होती. घरांतल्या बायकांना बाहेरच्या वस्तु आणून देण्याचा मक्ता मास्तरांचा होता. त्यामुळें घरांत ते सर्वांना जास्त परिचित होते.

लग्नापासून मोठी राणी माझ्यावर नाखूष होती. त्यांना माझं राहणं, वागणं जरासुद्धां आवडत नसे. प्रत्येक गोष्टींत माझा दोष काढण्यांतच त्यांची बुद्धि खर्च होत असे. माझ्या थोड्या थोड्या गोष्टींचं रामायण करून जो कोणी ओळखी-अनोळखी मनुष्य येईल त्याला ती सांगत असे. जणुं कांहीं माझ्या सुंदरतेला माझ्या दोषांचें पांघरूण घालून ती झांकूं पाहात होती ! महाराजांनाही तिनें अशाच गोष्टी सांगितल्या. ते तर घरांत रोजच येत असत. त्यांच्याजवळ रोज माझ्याविषयीं तक्रारी होऊं लागल्या. पण याचा परिणाम महाराजांवर उलटा झाला. मीं पाहिलं तिरस्कार वाटण्या-ऐवजीं महाराजांचं माझ्याशीं वागणं जास्त गोड व आदरपूर्ण होत होतं.

* * *

छोट्या राजांना माझं गाणं फार आवडत असे. नेहमीं ते मला गाण्याचा आग्रह करीत. गाण्याबजावण्याची माझी आवड फारशी उरली नव्हती, पण त्यांच्या आग्रहावरून मी केव्हां केव्हां गात असें त्या दिवशीं थंडीचे दिवस असूनही आकाश ढगांनीं भरून आलें होतें. मी आपल्या खोलींत एक मासिक चाळीत बसले होते. इतक्यांत छोटे राजे आले व म्हणाले, 'मधल्या बहिनी, कांहींतरी गा ना. मला ऐकायचं आहे.'

मीं टाळण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण त्यांनीं ऐकलं नाहीं. त्यांनीं पेटी आणून माझ्यासमोर ठेवली. मीं गायला सुरवात केली—

"विहरत हरिरिह सरसवसंते।
नृत्यति युवतिजनेन समं सखि विरहिजनस्य दुरंते।
ललितलवंगलतापरिशीलन कोमल मलयसमीरे।
मधुकरनिकरकरंबितकोकिलकूजित कुंजकुटीरे॥"

(गीतगोविंद)

तेही कुठूनतरी येऊन गुपचुप उभे राहिले होते. छोट्या राजांच्या हंसण्यानें मी भानावर आले. मागें वळून पाहतांच ते मला दिसले. पेटी बाजूला सरकवून मी गप्प बसून राहिले. तेही हंसून तिथेंच बसले व म्हणाले, "मधल्या राणी! तुम्ही इतक्या चांगल्या गातां हें मला आजच कळलं."

असं बोलणं इकडे चाललयं तोंच मोठ्या राणी पाय आपटत तिथें अवतरल्या आणि रागानें म्हणाल्या, "आतां हें घर सभ्य माणसांचं म्हणावं असं राहिलं नाहीं. लाजलज्जा सगळी कोळून पिऊन टाकली आहे. आतां अगदीं हद्द झाली. जशी हलक्या घरांतून आली तशीच वागते आहे. शेजाऱ्यांनीं ऐकलं तर ते काय म्हणतील? असंच ना कीं, मधल्या राजांची राणी नायकिणीप्रमाणें गाते म्हणून! या कुळांत कधीं असं घडलं नाहीं. कुळाची इभ्रत तरी घालवूं नकोस बाई! आपल्या बाबाच्या घरीं जा अन्

घरांतच काय, सडकेवर गात फिरलीस तरी आमचं कांहीं म्हणणं नाहीं. इथें मात्र हें चालणार नाहीं. तुला काय, घरांत बसून तूं मन मानेल तशी वागतेस, पण बाहेर पुरुषांना मान खालीं घालावी लागते.'' दमांत एवढं बोलून त्या आल्या तशा वावटळीसारख्या निघून गेल्या.

माझ्या मनांत आलं—'दारू पिऊन रखेल्यांच्या गळ्यांत गळे घालून हिंडतांना मान खालीं घालावी लागली नाहीं. गरिबांवर वाटेल तसा जुलूम करतांना कूळ बुडत नाहीं. नांव जातं घराचं फक्त गाण्यांनीं! यापुढें कधींही पेटीला हात लावणार नाहीं.' त्या दिवसापासून मी पेटीला शिवलें नाहीं. आणि छोट्या राजांनींही मला कधीं गाण्याचा आग्रह केला नाहीं. यदाकदाचित् त्यांनीं आग्रह केला असता तर पेटीला हात लावण्याचें धाडसही माझ्यानें झालें नसतें.

या प्रसंगानंतर कितीतरी दिवसांनीं एकदां मास्तर छोट्या राजांना शिकवून वरून खालीं येत होते, आणि मी खालून वर येत होते—जिन्यांतच त्यांची-माझी गांठ पडली. ते थांबले व म्हणाले, ''कशा आहेत मधल्या राणी?''

''जिवंत आहेत.''

''आनंदांत रहात जा. अशा रितीनं वागण्यानं काय फायदा?''

''मनाची कशी समजूत करूं मास्तरसाहेब?''

''चांगलीं चांगलीं पुस्तकं वाचा. त्यांच्याइतका उत्तम मित्र जगांत तुम्हांला दुसरा मिळणार नाहीं.''

''पण चांगलीं चांगलीं पुस्तकं आणूं कुठून?''

''आणून देण्याचं काम माझं.''

''तुम्ही चांगलीं पुस्तकं आणून द्याल? यापेक्षां मला तरी अधिक काय पाहिजे?''

" अशी काय मोठी गोष्ट आहे ही ! माझ्यापाशीं पुष्कळशीं पुस्तकं पडलीं आहेत. त्यांतलीं कांहीं तुम्हांला आणून देईन."

या त्यांच्या चांगुलपणाबद्दल मीं त्यांचे आभार मानले व वर निघून गेलें. मी मान वळवून वर पाहतें तों मोठी राणी तिथं उभी असून तीव्र नजरेनें माझ्याकडे पाहात असलेली मला दिसली. मी एक शब्दही न बोलतां खालीं मान घालून आपल्या खोलींत निघून गेलें.

* * *

दुसरे दिवशीं मास्तर जरा नेहमींच्या वेळेच्या आधींच आले. त्यांच्या हातांत कांहीं पुस्तकें होतीं. छोट्या राजांच्या खोलीकडे जातांना ते सरळ माझ्या खोलीकडे आले. येतांना बाहेरूनच त्यांनीं आपल्या आगमनाची सूचना दिली. पण दोन्हींपैकीं एकही दासी तिथें हजर नसल्यानें मींच म्हटलें, " या मास्तर." ते येऊन बसले. प्रत्येक पुस्तकाचं व लेखकाचं नांव सांगून ते मला द्यायला लागले, " हे 'महात्मा गांधींच्या आत्मकथे'चे दोन भाग आहेत. ती प्रेमचंदजींची ' रणभूमि ', तिचेही दोन भाग आहेत. हें आहे मैथिलीबाबूंचे 'साकेत'. हें पंतांचं ' पल्लव '; याशिवाय आणखीही पुष्कळ पुस्तकं आहेत. हीं तुमचीं वाचून होत आहेत तोंपर्यंत दुसरीं आणून देईन."

नंतर त्यांनीं ' साकेत 'मधील लक्ष्मण उर्मिलेचा निरोप घेतो त्या सुंदर प्रसंगाचें वर्णन वाचून दाखवायला सुरवात केली. इतक्यांत मला मोठ्या राणी आल्या आहेत असं वाटलं आणि लगेच खोलीचे दरवाजे फटाफट बंद झालेले ऐकायला आले. मास्तरांनीं एकदां माझ्याकडे व एकदां दाराकडे पाहून म्हटलें, ' कोणी हा दरवाजा लावला ! उघडून द्या. "

कांहींच उत्तर न मिळालेलं पाहून मला राग आला. मीं तीव्र स्वरांत म्हटलें, ' कोणी दरवाजा लावला आहे ? उघडून द्या. आम्ही आंत बसलों आहों. ठाऊक नाहीं का ? '

मोठ्या राणीचा कर्कश आवाज ऐकायला आला : " थांबा. आतां दरवाजा उघडेल. तुम्ही आंत आहांत हें दाखवण्याकरितांच दरवाजा लावून घेतला आहे. पण प्रेक्षक तर येऊं द्याल कीं नाहीं ? तुमच्या या गमजा आतां फार दिवस चालायच्या नाहींत ! "

माझें डोकें भणाणलें. "देवा ! काय केलं आम्हीं ? पुस्तक वाचणं हें पाप आहे का ?" अशा रितीनें १५ मिनिटेंपर्यंत दरवाजा बंद होता. रागानें मास्तरांचा चेहरा लाल झाला होता. बाहेर मोठे राजे, मधले राजे व महाराजे यांचे आवाज ऐकायला येत होते. लगेच दरवाजा उघडला गेला. मोठी राणी म्हणाली, " माझ्या बोलण्यावर कोणाचा विश्वास नाहीं. आतां आपल्या डोळ्यांनीं पहा. डोळे तर फसवणार नाहींत ना ? "

आजपर्यंत मीं मधल्या राजांची विलासी मूर्ति पाहिली होती. आज मीं त्यांचं रुद्र-रूपही पाहिलं. रागानें पाय आपटीत ते म्हणाले, " किरण-कुमार, या खोलींत तूं कोणाच्या हुकूमानें आलास ?" मास्तरांनींही त्याच आवाजांत उत्तर दिलें, " मला कोणत्या खोलींत येण्याजाण्याचा हुकूम नाहीं आहे ?"

मोठे राजे—मास्तरसाहेब, आतां इथून निघून जा. यांतच तुमचं कल्याण आहे.

मास्तर—आग लागो त्या कल्याणाला ! भ्याडाप्रमाणें पळून जायला मी अपराधी नाहीं. जाण्यापूर्वी मी आपल्याला सांगून ठेवतों कीं, मी आणि मधली राणी दोघेंही निर्दोष आहोंत. हा सर्व प्रकार मत्सरानें करण्यांत आला आहे.

मोठी राणी गरजली, " चोराच्या उलट्या बोंबा. चोर तो चोर अन् वर शिरजोर ! मी तुमचा मत्सर करीन ? तुम्ही कुठल्या झाडाचा पाला ? तुम्हांला काय किंमत आहे ? तूं एक भिकारडा मास्तर आणि ही कालची पोर ! तीही कांहीं तालेवाराची नव्हे. ईर्ष्या आपल्या बरोबरीच्या माणसा-

बरोबर केली जाते.'' नंतर मोठ्या राजाकडे वळून म्हणाली, '' तुम्ही याला लाथ मारून काढून कां देत नाहीं ? तुम्हांला उलटून बोलतो न् तुम्ही ऐकतां ? मीं पहिल्यानूदांच सांगितलं होतं कीं, नोकरां-चाकरांशीं जरा बेतानंच वागावं.''

महाराजे मोठ्या रागानें म्हणाले, '' किरणकुमार, चालता हो.''

याच वेळीं कुठून तरी एकदम छोटे राजे आले व त्यांना पकडून जबरदस्तीनें घेऊन गेले. माझ्यावर केवढा गहजब झाला त्याचं वर्णन करणं शक्य नाहीं. या सगळ्याचा परिणाम येवढाच झाला कीं, त्याच दिवशीं बरोबर एक चिठी देऊन मला कायमचें पाठवून देण्यांत आलें. एका टांग्यांत बसवून चपराश्याबरोबर माझी रवानगी झाली. चिठी माझ्या वडिलांना लिहिलेली होती. त्यांत लिहिलं होतं कीं, '' तुमची मुलगी पतित आहे. आमच्या कुलाला हिनें कलंक लावला आहे. आतां आमच्या घरांत हिला जागा नाहीं. ' बोलबोल म्हणतां माझ्या भ्रष्टाचाराची बातमी सर्व गांवांत पसरली. मी येऊन पोंचण्यापूर्वीच त्याचे पडसाद वडिलांच्या कानापर्यंत पोंचले होते.

* * *

माहेरीं मी येऊन पोंचलें तेव्हां संध्याकाळ झाली होती. मध्यंतरींच्या काळांत आई देवाघरीं गेली होती. तीनही भाऊ कॉलेजांत शिकत होते. घरीं फक्त वडील होते. त्यांनीं मला घरांत येऊं दिलं नाहीं. बाहेरच्या खोलींतच बसवलं. पत्र वाचून ते अत्यंत संतप्त होऊन म्हणाले, '' ही कुलटा आहे ! तर इथें कशाला आणली ? रस्त्यांत कांहीं तळीं, विहिरी हिला ढकलून द्यायला सांपडलीं नाहींत का ? हिला मी आपल्या घरांत ठेवीन ? कुठेंही जा. मर, मला काय करायचं आहे.'' मीं त्यांच्या पायावर लोटांगण घालून रडतरडत म्हटलं, '' दादा, मी निर्दोष आहें. '' दोन पावलं मागं सरकून ते कडाडले, '' दूर हो चांडाळणी ! तूं निर्दोष आहेस तर मग

एवढा गांव कां गाजला आहे ? उगीचच्या उगीच बदनामी करायला त्यांना काय वेड लागलं आहे ? जिथें तुला जागा सांपडेल तिकडे जा. माझ्या घरांत मात्र तुला जागा नाहीं. काय करूं ? हें इंग्रजी राज्य नसतं तर तुझे तुकडे तुकडे केले असते. ''

हा तमाशा पहायला गांवांतले कांहीं शिष्ट व शेजारचे लोकही जमा झाले. सगळ्यांनीं माझ्या भ्रष्टाचाराची कहाणी ऐकली व तिरस्कार केला. एक म्हणाला, '' आतां ही घरांत ठेवायला लायक राहिली नाहीं. जेव्हां सासरच्यांनींच घरांत ठेवली नाहीं, तर पंडित रामभजन काय आपल्या घरांत ठेवून वाळीत पडतील ? '' दुसऱ्यांनीं मल्लीनाथी केली, '' घरांत ठेवली तर ठेवा. त्यांचीच मुलगी आहे ती ! पण आम्ही मात्र पंडितजींच्या घरांत पाऊल घालणार नाहीं. ''

मी पुन्हां घरांत जायला दरवाजाकडे गेलें, त्याबरोबर माझ्या वडिलांनीं मला दाराबाहेर दूर लोटून दिलें. मीं कुळाला कलंक लावला होता. मला घरांत ठेवून जातीबाहेर ते कशाला होतील ? मी लांब जाऊन पडलें व बेशुद्ध झालें. जेव्हां मी शुद्धीवर आलें तेव्हां माझ्या घराचं दार बंद होतं आणि बोळांत शांतता पसरली होती. मधून-मधून कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाज काय तो येत होता. मी उठलें. बराच विचार केला व स्टेशनच्या रोखानें निघालें. एक कुत्रा मोठ्यानें भुंकला. जणुं तो सांगत होता कीं, या आळींत आतां तुझ्याकरितां जागा नाहीं. मी स्टेशनवर पोंचलें तेव्हां एक गाडी उभी होती. कांहींही विचार न करतां मी बायकांच्या डब्यांत जाऊन बसलें. किती वेळ गाडी चालली, कुठें कुठें थांबली, मला कांहीं ठाऊक नाहीं. परंतु सकाळीं गाडी जेव्हां कानपूरला पोंचली व रेल्वेच्या मनुष्यानें मला उतरायला सांगितलें, तेव्हां मी चकित झाले. मीं पाहिलं तों सगळी गाडी रिकामी झाली होती. स्टेशनवरही फारसे उतारू नव्हते. मला कळेना मी गाडींतून आतां कुठें जाऊं ! काल या वेळेला मी एका राजाची

30868
मधली राणी
वा.वा.

राणी होतें. आज तिला उभं राहायला सुद्धां जागा नव्हती, बऱ्याच वेळानें माझ्या लक्षांत आलं कीं, सत्याग्रहाची मोहीम सुरूं आहे; आपण स्वयं-सेविका बनून आपलें जीवन कां व्यतीत करूं नये ? विचारत विचारत कशी तरी मी कॉंग्रेस कचेरींत पोंचलें. तिथें दोन-तीन माणसं बसलीं होतीं. त्यांनीं मला 'तुमच्याजवळ एखाद्या कॉंग्रेस कमिटीचं प्रमाणपत्र आहे का ?' म्हणून विचारलं. मीं ' नाहीं ' म्हणून सांगितलं, तेव्हां त्यांनीं मला स्वयं-सेविका करून घेण्याबद्दल नकार दिला. यानंतर अशा प्रकारच्या किती तरी संस्थांत आणि सुधारकांच्या दारांत मी गेलें. परंतु मला कुठेंच आश्रय मिळाला नाहीं. हतबुद्ध होऊन भुकेली, तहानेली अशी मी चालत होतें. पण जाणार कुठें ? दमून एका झाडाखालीं बसलें. स्वतःच्या परि-स्थितीचा विचार करूं लागलें. राणीच्या आसनावरून आतां भिकारीण बनलें होतें. भिकेशिवाय दुसरा कोणता उपाय होता ? इतक्यांत कुठूनशी एक म्हातारी भिकारीण हातांत लहान लहान गाठोडीं घेतलेली त्या झाडाखालीं येऊन बसली. मोठ्या कष्टानें दिवसभर भीक मागून मिळालेली तांदूळ, कणीक, डाळ आपल्या त्या चिंध्यांत नीट बांधून तिनें माझ्याकडे बघितलें. मींही तिच्याकडे पाहिलें. दुःखाच्या सहानुकंपानें क्षणाभरांत आम्ही एक झालों. भिकारीण बरीच म्हातारी होती. तिला कमी दिसत होतें. भिक्षा मागण्याकरितां तिला कोणी तरी साथीदाराची आवश्यकता होती. मी तिच्याबरोबर राहूं लागलें.

कितीतरी वेळां आत्महत्येचा विचार मनांत आला. पण प्रत्येक वेळीं कोणीतरी आपल्याला मागें ओढीत आहेसें वाटे. मी आत्महत्या करूं शकलें नाहीं. सतत एक वर्षभर भिकारणीजवळ राहूनही मी भीक मागण्याची कला शिकलें नाहीं. येईल तरी कसं ? म्हातारीचा हात धरून मी तिला नेत असें आणि तीच भिक्षा मागत असे. मी सुंदर होतें, तरुण होतें. फाटक्या मळक्या कपड्यांतूनही तें रूप उठून दिसत होतं. माझें रूपच

ठिकठिकाणीं मला छळत होतं. आपल्या सतीत्वाचं रक्षण करण्याकरितां मला अत्यंत सावधानतेनं रहावं लागत होतं. त्यामुळें मला वारंवार जागा बदलावी लागे.

माझ्या साडीचा वरचा पदर पार फाटून गेला होता. अंग झांकायला सुद्धां धड कपडा नव्हता. प्रयागला माघ अमावास्येला मोठा मेळा भरणार होता. म्हातारी म्हणाली, 'तिथें गेलों तर तीन-चार महिन्यांची खाण्याची बेगमी होईल, आणि कपड्याकरितां पैसेही मिळतील.' म्हातारीबरोबर मी पायीं प्रयागला जायला निघाले.

भीक मागत मागत कितीतरी दिवसांनीं आम्ही प्रयागला पोंचलों. इथें महिनाभर मेळा असतो. लांबलांबून यात्रेकरू येतात. आम्ही रस्त्याच्या एका बाजूला एक फडकं हंतरून बसत होतों. दिवसभर भिक्षा मागून रात्रीं एका झाडाच्या खालीं शेकोटी पेटवून निजत होतों. अशाच एक दिवस आम्ही संध्याकाळीं परत येत असतांना एक बग्गी जातांना दिसली. त्यांत कांहीं बायका बसलेल्या दिसत होत्या. म्हातारी पैशाकरितां गाडीमागें धांवली. कांहीं वेळानें गाडींतून एक पैसा फेंकला गेला. संध्याकाळच्या संधिप्रकाशांत म्हातारीला पैसा नीटसा दिसला नाहीं. पैसा सांपडण्याकरितां ती तिथेंच घोंटाळत राहिली. इतक्यांत मागून व पुढून एकदम मोटारी आल्या. म्हातारीनें स्वतःला बचावण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. मोटारवाल्यानेंही शिकस्त केली. पण म्हातारी मोटारखालीं सांपडली. तिला जबर दुखापत झाली, व तिला वांचवण्याच्या गडबडींत मलाहि पुष्कळ लागलं. ज्या मोटारीचा धक्का आम्हांला लागला होता, त्या मोटारवाल्यानें मागें वळून-सुद्धां पाहिलें नाहीं, परंतु दुसरी मोटार थांबली. त्यांतून दोन व्यक्ती उतरल्या. माझ्या तोंडांतून एकदम एक किंकाळी बाहेर पडली.

* * *

कित्येक दिवस सतत ताप आल्यानंतर जेव्हां मी शुद्धीवर आलें तेव्हां मी एका स्त्रियांच्या दवाखान्यांतील पडक्या वॉर्डमधल्या खोलींत आहें, असें मला दिसलें. एका खाटेवर मी निजलें होतें. जवळच दुसऱ्या खाटेवर भिकारीणही मृत्युशय्येवर पडली होती. मी खाटेवर उठून बसायला लागलें. मास्तर होते ते. जवळच ते खुर्चीवर वाचीत बसले होते. मला उठतांना पाहून ते जवळ येऊन म्हणाले, "आतांच उठूं नका. डॉक्टरच्या परवानगीशिवाय तुम्हांला उठतां येणार नाहीं."

"कां? मी रस्त्यावरची भिकारीण, मला हे मऊ मऊ स्वच्छ कपडे कशाला हवेत? उद्यांपासून मला पुन्हां गल्ली-बोळांतून ठोकरा खात जावं लागेल ना?"

त्यांचे विशाल नेत्र पाण्यानें भरून आले. मोठ्या करुण स्वरांत ते म्हणाले, "मधली राणी! तुम्ही मला क्षमा करणार नाहीं? तुमचा अपराध मींच केला आहे ना? माझ्यामुळेंच तर तुम्हांला राणीपद सोडून रस्त्यावरची भिकारीण व्हावं लागलं ना!"

एकदम त्यांनीं मला 'मधली राणी' म्हटलं तेव्हां मी चमकलें. एकदम माझ्या तोंडांतून निघून गेलं, "मास्तरसाहेब!"

दोन-तीन दिवसांत मी बरी झालें. भिकारणीची प्रकृति सारखी बिघडत चालली व एक दिवस तिनें आपली जीवनयात्रा समाप्त केली. त्यानंतर मी त्यांच्या बंगल्यांत राहूं लागलें. पण अजून समजूं शकलें नाहीं कीं, ते माझे कोण आहेत? ते माझ्यावर मातेसारखी ममता व पित्यासारखं प्रेम करतात; बंधूसारखी मदत आणि मित्रासारखा हितकारक सल्ला देतात. पतीप्रमाणें रक्षण व पुत्रासारखा आदर बाळगतात. यामुळें कुणीच नसूनही ते माझं सर्वस्व आहेत व सर्व कांहीं असूनही माझे ते कुणीच नाहींत.

● ● ●

परिवर्तन : : ४

ठाकूर खेतसिंहांचं नांव ऐकतांच लोकांच्या चेहऱ्यावर तिरस्काराचे व सुडाचे भाव दिसूं लागत. पण त्यांच्यासमोर त्यांच्या विरुद्ध कोणाची हूं म्हणण्याची हिंमत नव्हती. कोणत्याही तऱ्हेनें कोणीही ठाकूर खेतसिंहांचा केससुद्धां वांकडा करूं शकत नव्हता. त्यांच्या तोंडावर सरळ बोलणं ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हती. दोन-चार शब्द बोलून ठाकूरसाहेबांचं कांहींच बाईट होत नव्हतं. बोलणारांचे मात्र दिवस भरत असत.

एकदां असंच बोलतां बोलतां ठाकूरसाहेबांच्या एका कृत्याबद्दल निषेध प्रदर्शित करीत मैकू अदिर म्हणाला, " आहेत तर मोठे प्रतिष्ठित. अशीं कामं करतात कीं, हलक्यांतला हलका मनुष्यसुद्धां तीं करायला लाजेल. इतकं म्हणायचाच अवकाश कीं गोष्ट तिखटमीठ लावून ठाकूरसाहेबांच्या कानापर्यंत पोंचली, आणि बिचाऱ्या मैकूची कठीण अवस्था झाली. दुसरे दिवशीं मैकूला बोलविण्यांत आलें. दरवाजा बंद करून मैकूची कणिक तिंबली गेली; आणि त्याला समज मिळाली कीं, " ही गोष्ट बाहेर फुटली तर पुढच्या वेळेला गोळीला बळी पडावं लागेल." मैकूनें हा अपमान विषाच्या घोंटासारखा मुकाट्यानें गिळला, पण त्याची बायको सुखिया हिच्यानें साहवलें गेलें नाहीं. तिनें दहा-पांच खऱ्या-खोट्या

गोष्टींचा उद्धार करून आपलें समाधान करून घेतलें. सुखियाचं बोलणं ठाकूरसाहेबांच्या कानापर्यंत न जाणं अशक्यच होतं.

याचा परिणाम असा झाला कीं, त्या दिवशीं रात्रीं मैकूच्या झोंपडीला आग लागली व त्याचें गव्हाचें हिरवें हिरवें शेत घोड्यांनीं तुडवून टाकलं. दुसरे दिवशीं आपलें बाडबिस्तर घेऊन मैकूला गांव सोडणें भाग पडलें.

ठाकूर खेतसिंह मोठे जमीनदार होते. ते सोळा हजार रुपये वार्षिक सारा देत असत. दारांत हत्ती झुलत आहे—गाडी, घोडा, मोटार सर्व सुख-समृद्धि त्यांच्या समोर हात जोडून उभी होती. त्यांच्या येथें दोन संध्यांचा पहारा रात्रंदिवस असे. ते बाहेर पडत तेव्हां त्यांच्याबरोबर दहा-वीस लाठीदार जवान असत. त्या प्रांतांत किती जण फुकट खात होते व किती बरबाद होत होते त्याला सुमारच नव्हता. पण या कारभारावर कोणी टीका करण्याची सोय नव्हती. विकत श्राद्ध घेण्याची कोणाची हिंमत नव्हती. ठाकूरसाहेबांचा जरब प्रांतांत सर्वांना होता. त्यांची नादिरशाही कोणाला ठाऊक नव्हती? कोणाच्या सुंदर मुलीवर किंवा सुनेवर त्यांची नजर फिरली म्हणजे आकाशपाताळ एक झालं तरी ती मुलगी त्यांच्या जनानखान्यांत पोहोंचल्याशिवाय राहायचीच नाहीं! स्टेशनवरही त्यांचे गुंड सदोदित संचार करीत असत. एखादी सुंदर बाई आढळण्यांत आली कीं, तिला युक्तिप्रयुक्तीनें फसवून ठाकूरसाहेबांच्या जनानखान्यांत पोहोंच-विली जात असे! व याबद्दल त्यांना बक्षिस दिलं जाई! मालाच्या किंमती-प्रमाणें त्यांना बक्षिसही कमीअधिक मिळत असे.

ठाकूरसाहेबांचे सर्व नातेवाईक त्यांच्या या बागणुकीमुळें रुष्ट होते. त्यांच्या घरीं येणं-जाणंही त्यांनीं सोडून दिलं होतं. पण आपल्या संप-त्तीच्या मदानें ते इतके धुंद झाले होते कीं, कोणी आला काय आणि गेला काय त्याची त्यांना पर्वा नव्हती.

* * *

हेतसिंह हा ठाकूरसाहेबांचा चुलतभाऊ होता. लहानपणापासून तो त्यांचा आश्रित होता. हेतसिंहावर ठाकूरसाहेबांचे सख्ख्या भावासारखें प्रेम होतें. तो फायनल बी. ए.चा विद्यार्थी होता. तो मोठा उमदा व सच्चारित्र तरुण होता. ठाकूरसाहेबांच्या या वर्तनाची त्याला मनस्वी चीड होती. प्रजेवर होणारा अत्याचार त्याला बघवत नव्हता. एक दिवस अशाच एका गोष्टीचा राग येऊन त्यानें घर सोडलें. कुठें गेला कांहीं पत्ता लागला नाहीं. ठाकूरसिंहानें कांहीं दिवस त्याचा शोध केला. पण या रिकाम्या गोष्टीकडे बघायला त्यांना वेळ कुठें होता ? ते तर आपलें जीवन सफल करीत होते.

एक वर्षानंतर हेतसिंह एक दिवस पुन्हां गांवांत आला. त्याच दिवशीं ठाकूरसिंहाच्या इथें एका कुंभाराची नवविवाहित सून आणली गेली होती. कुंभाराच्या घरीं हाहाःकार माजला होता. याच वेळीं हेतसिंह तिकडून आला. त्याला कुंभारानें आपलें दुःख सांगितलें. हेतसिंहाचा राग अनावर झाला. अशाच एका गोष्टीमुळें त्यानें घर सोडलें होतें. भावाला भेटून मागची बेदिली दूर करण्याकरितां तो आला होता. मागचीच गोष्ट पुन्हां पुढें येत होती. क्रोधानें त्याचा चेहरा लाल झाला. खिशांत हात घालतांच भरलेलें पिस्तुल त्याच्या हाताला लागलें. हेतसिंह घरीं पोहोंचला, तेव्हां ठाकूरसाहेब कांहीं लोकांबरोबर गप्पा मारीत बसले होते. ते त्याला पाहून मोठ्या आनंदानें म्हणाले, "ये हेतसिंह ! कुठें होतास इतके दिवस ? पुष्कळ दिवसांनीं आलास. कांहीं बोलल्या-सांगितल्याशिवाय कुठें गेला होतास ?"

हेतसिंहानें एकाही प्रश्नाचें उत्तर दिलं नाहीं. तो आपल्याच रागांत होता. तो म्हणाला, "भैय्या, मनका कुंभाराची सून घरांत आहे ? जर असेल तर तिला परत पाठवून द्या."

ठाकूरसाहेबांच्या भुंवया चढल्या. राग आवरून ते म्हणाले—

"हेतसिंह ! तूं अजून बच्चा आहेस. या भानगडींत पडण्याची तुला जरूरी नाहीं. आंत जा. हातपाय धू. जरा कांहीं खा–पी. !"

हेतसिंह तीव्र स्वरांत म्हणाला, "मी काय म्हणतो आहे !! मनका कुंभाराची सून परत पाठवून द्या."

मीं एकदां तुला सांगितलं कीं, "माझ्या कारभारांत पडण्याची तुला गरज नाहीं."

"तरी मी तुम्हांला विचारतों कीं, तिला परत पोंचविणार कीं नाहीं?"

खेतसिंह गंभीर होऊन म्हणाले, "तुला उत्तर द्यायची आमची इच्छा नाहीं. चालता हो इथून."

हेतसिंहाला कांहीं तें सहन झालें नाहीं. खिशांतून पिस्तुल काढून त्यानें लागोपाठ तीन गोळ्या झाडल्या. पण ठाकूरसाहेब इकडेतिकडे हलल्यानें बचावले. हेतसिंह पकडला गेला. खून करण्याच्या अपराधावरून त्याला पांच वर्षांची शिक्षा झाली.

यानंतर मैनपुरच्या एका कारस्थानांत त्याला गुंतवून आणखी आरोप त्याच्यावर लादले गेले; व आणखी सात वर्षांची शिक्षा त्याला मिळाली. ठाकूरसाहेबांचें यत्किंचितही नुकसान झालें नाहीं.

* * *

ठाकूरसाहेबांच्याकडे त्यांचे नातेवाईक जात नव्हते, पण ते मात्र कधीं कधीं आपल्या नातेवाइकांना भेट देत असत. ठाकूरसाहेबांची आतेबहीण चंपा हिचें लग्न होतें. नुसती लग्नपत्रिका आलेली पाहतांच ते जायला निघाले.

चंपानें ठाकूरसाहेब आल्याचें ऐकतांच त्यांना आंत बोलावलें. हेतसिंहाला झालेल्या शिक्षेमुळें चंपाचें मन दुःखी होतें. त्याबद्दल तिला ठाकूरसाहेबांना कांहीं विचारावयाचें होतें.

चंपाचें धैर्य व स्पष्टवक्तेपणा ठाकूरसाहेबांना चांगला परिचित होता. प्रथम चंपासमोर जायला ते बिचकले, पण शेवटीं जावंच लागलं. कुशल प्रश्न झाल्यावर चंपानें हेतसिंहाच्या बाबतींत विचारलें. पश्चात्तापाच्या स्वरांत ठाकूरसाहेब म्हणाले, "काय, चूक झाली खरी."

"दादा, आतां तुम्ही या संवयी सोडाल तर बरं."

आपल्याला कांहीं समजलंच नाहीं असं दाखवून ठाकूरसाहेब म्हणाले, "कोणत्या संवयी बेटा!"

चंपानें भेदक दृष्टीनें त्यांच्याकडे पाहिलें व ती गप्प राहिली. ठाकूरसाहेब जरा मनांत दबले व म्हणाले, "बेटा, मी कांहीं करीत नाहीं. तुला विश्वास वाटत नसेल तर एकदां येऊन आपल्या डोळ्यांनीं पाहून घे. तसं पाहिलं तर लोक वाटेल त्या खोट्या गोष्टी उठवतात पण तूं त्याच्यावर विश्वास ठेवतां कामा नये."

* * *

चंपाचें लग्न झालें. चंपा सासरीं गेली व ठाकूरसाहेब घरीं आले.

घरीं आल्यावरही चंपाचें तें मार्मिक बोलणें राहून राहून ठाकूरसाहेबांच्या हृदयावर आघात करीत होतें. पुष्कळ वेळां त्यांच्या मनांत विचार येई कीं, "या संवयी आपण कां सोडीत नाहीं? आयुष्यांत कोणाला ठाऊक किती पापं झालीं! त्याचं प्रायश्चित्त आतां घेतलं पाहिजे. आतां आपला नरेंद्रही मोठा झाला आहे. त्याच्यावर सर्व सोंपवून काशीला जाऊन गंगेच्या तीरावर कां नाहीं भजनपूजन करूं? अर्धं वय तर गेलंच आहे. काय आयुष्यभर हेंच करायचं? माझ्या या वर्तनाचा परिणाम नरेंद्रवरही झाल्याशिवाय राहाणार नाहीं." पण पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणें हे विचार त्यांच्या मनांत येत व नाहींसे होत. त्यांचा कार्यक्रम पुन्हां पहिल्यासारखा सुरूंच होता.

* * *

विवाहानंतर कांहीं दिवसांनीं चंपाचे पति नवलकिशोर यांचा एक मित्र संतोष यानें नवलकिशोरला चंपाला आपल्या घरीं घेऊन येण्याचें आमंत्रण दिलें. एक दिवस संतोषला कांहींही सूचना न देतां तीं दोघें त्यांच्या घरीं जावयाला निघालीं. अशा रितीनें संतोषच्या घरीं जाऊन त्याच्या म्हाताऱ्या आईला चकित करण्याचा त्यांचा विचार होता. चंपा व किशोर अलिगडला जाण्यास निघाले. प्रवास सुखानें होत होता. उष्मा मुळींच नव्हता. झिम-झिम पडणारा पाऊस फार आल्हाददायक वाटत होता.

ही दोघें अलिगडला उतरलीं. अंधार पडायला लागला होता. स्टेशन-पासून गांव पांच-सहा मैल दूर असल्यानें नवलकिशोरनें विचार केला कीं, स्टेशनवरच जेवण उरकून घ्यावें व मग गांवांत जावें. चंपाला सामाना-जवळ बसवून तो खाद्य वस्तूंची चौकशी करायला गेला. हलवायाच्या दुकानावर सर्व कांहीं होतें. पुऱ्या जरा निवाल्या होत्या. ताज्या पुऱ्या करून घेण्याकरितां तो तिथेंच थांबला.

इकडे सामानाजवळ एकटीच बसून चंपा कंटाळली. एक पुस्तक काढून तिनें वाचायला सुरुवात केली. थोड्या वेळानें एक मनुष्य आला व म्हणाला, "बाबूजी उपाहारगृहांत आपली वाट पहात आहेत."

"पण ते तर जेवण इथेंच आणणार होते ना?"

"उपाहारगृह इथून जवळच आहे. ते म्हणतात कीं, तिथेंच जेवूं. म्हणजे इथें आणण्याचा त्रास नको."

उठतां उठतां चंपा म्हणाली, "सामानाजवळ कोण राहील?"

"सामान हमाल पाहील. आपण काळजी करूं नका. दहा मिनिटांत परत याल." क्षणभर चंपानें विचार केला व ती त्या मनुष्याबरोबर निघाली.

स्टेशनबाहेर पडल्यावर जवळच्या एका घराकडे बोट दाखवून तो मनुष्य म्हणाला, "तें समोर दुकान आहे. बाबूजी तिथेंच बसले आहेत."

चंपा लवकर लवकर चालायला लागली. जवळच एक मोटार उभी होती. त्या मनुष्यानें चंपाला मागून उचलून मोटारींत घातलें. मोटार भरधांव निघाली. चंपाचें ओरडणें कोणालाही ऐकूं गेलें नाहीं.

अर्ध्या तासानें नवलकिशोर खाण्याच्या वस्तु घेऊन आला, तर चंपाचा पत्ता नव्हता. इकडे-तिकडे शोधलें. गाडीचा प्रत्येक डबा शोधला. पण चंपा कुठें सांपडली नाहीं. तेव्हां नाइलाजानें पोलिसांत वर्दी दिली. परक्या ठिकाणीं तो तरी अधिक काय करणार? तिथल्या पोलिसांचीं तोंडेंही ठाकूरसाहेबांच्या रुपेरी शिक्क्यानें बंद असल्यामुळें सर्व कांहीं माहीत असूनही ते अज्ञानाचा आव आणीत असत. मग परक्या माणसाचें ते कुठलें ऐकायला! जेव्हां हर प्रयत्न करूनही चंपाचा पत्ता लागला नाहीं तेव्हां नवलकिशोर संतोषच्या गांवालाही जाऊं शकला नाहीं. तिथेंच धर्मशाळेंत राहून तो तिचा शोध लावण्याचा प्रयत्न करूं लागला.

मोटारींत चंपा बेशुद्ध झाली. शुद्धीवर आल्यावर आपण एका मोठ्या वाड्यांत डांबलों गेलों असल्याचें तिला आढळून आलें. घराच्या सजावटीवरून एखाद्या बड्या माणसाचें घर असावें असें तिला वाटलें. खोलींत चारी बाजूला मोठमोठे आरसे होते. दरवाजे व खिडक्यांवर सुंदर रेशमी पडदे सोडलेले होते. भिंतीवर सुंदर पण सदभिरुचीला न आवडणारीं चित्रें लावलेलीं होतीं. एका बाजूला सौंदर्यप्रसाधनांच्या साहित्यानें सुसज्जित असें एक ड्रेसिंग टेबल ठेवलेलें होतें. जमिनीवर बैठक होती. भिंतीला टेकून दोन-चार तक्के होते. जवळपास आरामखुर्च्या व कोच ठेवून दिले होते. बैठकीवर पडून चंपा खूप रडली. थोड्या वेळानें दरवाजा उघडला गेला आणि एक म्हातारी खाण्याच्या वस्तु घेऊन आंत आली. त्या वस्तु खालीं ठेवून ती म्हणाली, "घे खाऊन. रडून काय होणार? इथें तर हे प्रकार रोजचेच आहेत."

खाण्याच्या वस्तूंना चंपा शिवलीसुद्धां नाहीं. ती रडतच होती. रडतां रडतां तिला केव्हांतरी झोंप लागली. सकाळीं ती जागी झाली तेव्हां सूर्य बराच वर आला होता. अगोदरपासून एक स्त्री तिची वेणी घालून द्यायला तिथें बसली होती. तिनें चंपाची वेणी घालूं देण्याची इच्छा दर्शविली. पण एका झटक्यासरशी चंपानें तिला दूर लोटून दिलें. बडबडत ती बाई निघून गेली.

अशा प्रकारें अन्नपाण्याशिवाय चंपानें एक दिवस आणि दोन रात्री काढल्या. तिसरे दिवशीं सकाळीं उठून चंपा शून्य दृष्टीनें खिडकींतून बाहेर रस्त्याकडे पहात होती. कोणाच्या तरी पावलांची चाहूल लागली, म्हणून तिनें वळून पाहिलें. तो एकदम ओरडली, " दादा !! "

ठाकूर खेतसिंहाच्या तोंडून उद्गार निघाले, " बेटी " !!

त्या दिवसापासून त्या गांवांतल्या कोणत्याही स्त्रीकडे कोणीही वांकड्या नजरेनें पाहूं शकला नाहीं.

● ● ●

निर्मला विश्वप्रेमाची उपासक होती. जगांत सगळ्यांविषयीं तिच्या मनांत सारखे भाव होते. तिच्या मनांत भेदभाव नव्हता. स्वभावानें ती मिळून-मिसळून वागणारी, खरंच हंसतमुख होती. साधारण शिकलेली होती. कदाचित् मॅट्रिकपर्यंत असेल. पण हिंदीचा अभ्यास चांगला होता. वाङ्मय-प्रांतांत तिला मान होता. आणि काव्यकुंजांतील ती एक मनोहारिणी कोकिला होती.

निर्मलेचें जीवन नांवाप्रमाणें निर्मल होतें. दुसऱ्याच्या वर्तनाकडे ती नेहमीं चांगल्या दृष्टीनें बघत असे. कोणी तिच्याशीं वाईट वर्तन केलें तर ती मनाशीं म्हणे, 'त्यांनीं मुद्दाम केलें नसेल, चुकीनें झालें असेल.'

पतितांच्याविषयीं तिच्या मनांत जिव्हाळा होता. कोणाला कधीं तिनें कसलीही गोष्ट करतांना पाहिलें तरी त्या व्यक्तीचा तिरस्कार अगर अपमान ती करीत नसे. गोड शब्दांनीं चूक समजावून देण्याची हातोटी तिला चांगली साधली होती. टाकून किंवा टोंचून बोलून दुसऱ्याच्या मनाला दुःख देणें तिला ठाऊकच नव्हतें. ती जितकी नम्र, सुशील आणि दयाळू होती तितकीच स्वाभिमानी, दृढनिश्चयी व न्यायप्रिय होती. नोकरांचाकरांना ती सहृदयतेनें वागवीत असे.

एकदां तिच्या घरच्या मोलकरणीनें तेल चोरून एका मोठ्या दगडाआड ठेवलें होतें. घरीं जातांना गुपचूप उचलून तें नेण्याचा तिचा विचार होता. कांहीं कामाकरितां रमाकांत त्याच वेळीं तिथें आले. त्यांच्या नजरेला तें पडतांच पत्नीला हांक मारून त्यांनीं विचारलें, "निर्मला, हें तेल इथें कुणीं ठेवलं आहे?" निर्मलेनें जवळच उभ्या असलेल्या मोलकरणीकडे पाहिलें. तिच्या तोंडावरच तिचा अपराध स्पष्ट दिसत होता. तरी सुद्धां निर्मलेनें उत्तर दिलें, "मींच ठेवलं असेल. उचलण्याची आठवण राहिली नाहीं."

रमाकांत निघून गेल्यावर त्या बाटींत आणखी भर घालून तिनें तें मोलकरणीला दिलें व म्हणाली, "जेव्हां ज्या वस्तूची तुला गरज असेल तेव्हां मागून घेत जा. मीं कधीं द्यायला नाहीं तर म्हटलं नाहीं ना?"

जें काम रागावून व धाक दाखवून झालें नसतें तें निर्मलेच्या या सहृदयतेच्या वागण्यानें झालें.

रमाकांतांचा स्वभाव याच्या अगदीं विरुद्ध होता. ते डबल एम्. ए. असून एका कॉलेजचे प्रोफेसर, साहित्यिक आणि देशभक्त होते. पण पति-पत्नीच्या स्वभावांत फारच फरक होता. कोणी चांगल्या हेतूनें त्यांच्याकडे आले तरी त्यांत कांहींना कांहीं त्या माणसाचा स्वार्थ असला पाहिजे, असा ते ग्रह करून घेत.

पतितांना ते तिरस्कारानें वागवीत. त्यांची थट्टा करीत. एकाद्याला धक्का देऊन ते पाडतील, पण त्याला उठवून आपले हात ते कधींच अपवित्र करणार नाहींत. पतितांची सावलीसुद्धां त्यांना सहन होत नसे. आपल्या आप्तस्वकीयांचें भलें करतांना दुसऱ्याला दुःख झालें तरी त्याची पर्वा करीत नसत. ते सज्जन असूनही सज्जनता त्यांच्यापासून लांब होती. कोणी त्यांच्याशीं वाईट वागलें तर ते त्याचा बचपा दुपटीनें घेत.

पति-पत्नींना वेगवेगळें अवलोकन केलें असतें तर त्यांच्यांत दुर्गुणांचा

लेशही सांपडला नसता. त्यांच्यासारखें सुखी जोडपें क्वचितच सांपडलें असतें. दुसऱ्यांना त्यांच्या भाग्याचा हेवा वाटत असे. त्यांच्यांत कधींही भांडण होत नसे. तरी सुद्धां पावलोपावलीं दोघांचे मतभेद होऊन त्यांचें जीवन दूषित करीत असत.

* * *

घरांतलें काम आटोपून सकाळ-संध्याकाळ निर्मला फिरायला जात असे. यामुळें शुद्ध हवा मिळत असून एकांतांत नवीन गोष्टीचा विचार करायला तिला सवड मिळत असे. पण निर्मलेच्या सासूला हें खपत नसे. तिला संशय वाटत असे—ती फिरण्याच्या निमित्तानें ही कोठें जात असेल, कोणाला भेटत असेल. बहुधा निर्मला कुणीकडून येते इकडे तिचें लक्ष असे. पुष्कळदां ती विचारी, "तूं गेलीस इकडून अन् आलीस तिकडून, ती कशी काय?"

निर्मला कधींच उत्तर न देतां नुसती हंसत असे. पण सासूचें समाधान न झाल्यानें तिला तिचें वागणें आवडत नसे. निर्मलेची सगळी वागणूक तिच्या सासूला संशयास्पद वाटत असे. पण रमाकांत या बाबतींत कांहींच बोलत नसल्यानें तिला गप्प बसणें भाग होतें.

कधीं कधीं असह्य झालें म्हणजे ती त्यांना सुनेच्या वर्तनाबद्दल नापसंती दर्शवीत असे. पण त्यांच्याकडून टाळाटाळ होते हें पाहून ती चूप राही. निर्मलेला आपल्या मुलाची फूस असल्यानें ती अशी वागते असें तिला वाटत असे. त्यामुळें प्रत्यक्ष नाहीं तरी 'लेकी बोले सुने लागे' या नात्यानें ती निर्मलेला कधीं तरी बोलत असे. निर्मलेला हें सर्व समजत असूनही ती त्याच्याकडे काणाडोळा करी.

आपलें काम ती व्यवस्थित करीत असे. निरर्थक गोष्टींकडे ती कधींच लक्ष देत नसे. त्रास झाला तरी शब्दानें बोलून दाखवीत नसे. नेहमीं प्रसन्न असे. कोणी कसेंही वागलें तरी ती त्याचें वाईट चिंतीत नसे.

* * *

एक दिवस कॉलेजांतून आल्याबरोबर रमाकांत म्हणाले, " आज एक मोठी विचित्र गोष्ट घडली, निर्मला ! "

" काय झालं ! " निर्मलेनें उत्सुकतेनें विचारलें.

तिरस्कारपूर्ण स्वरांत रमाकांत म्हणाले, "काय झालं ? हेंच कीं, बिट्टनला दिवस गेले आहेत. चार-पांच महिने झाल्यावर घरांतील सर्वांना कळलं आणि तिला घरांतून घालवून दिलं आहे. तिच्या माहेरीं तर कोणी नाहींच आहे. रस्त्यावर बसून रडते आहे. "

बिट्टन बालविधवा होती. बिचारी जन्मापासूनच अभागी होती. म्हणून निर्मलेचे तिच्यावर विशेष प्रेम होतें. बिट्टनच्या या करुणाजनक अवस्थेनें तिचें हृदय कळवळलें. तिनें रमाकांतांना विचारलें, " आतां तिचं कसं होईल ? कुठें जाईल ती ? "

रमाकांत उपेक्षेनें म्हणाले, " कुठें जाईल मी काय सांगूं, केलं तसं भोगेल. "

निर्मलेनें एक दीर्घ निःश्वास सोडला. कांहीं वेळ विचार करून ती निश्चयानें म्हणाली, " मी जातें न् तिला घेऊन येतें. दुसरीकडे व्यवस्था होईपर्यंत ती माझ्याजवळ राहील. "

रमाकांत घाबरून म्हणाले, " नको, नको, असा अविचार करूं नको. तिला घरीं आणून काय आपली बदनामी करून घेणार ? तुला कोणी कांहीं म्हणणार नाहीं. मला लोक टोंचून खातील. "

निर्मला दयार्द्र होऊन, " येवढ्या लहानशा गोष्टीला इतके भितां ? दुसऱ्याचं बरं करीत असतांना लोकांनीं नांवं ठेवलीं तर खुशाल ठेवूं देत. परमेश्वराला तर आपला हेतु समजेल ना. मला तिच्या परिस्थितीची दया येते. तुम्ही सांगाल तर मी तिला जाऊन घेऊन येतें. "

रमाकांत कांहीं बोलण्यापूर्वीं त्यांची आई म्हणाली, " अशा बायकांबद्दल हिला मोठी सहानुभूति वाटते. घरीं बोलावणार म्हणे तिला. कुठंही

जाऊन ती तोंड काळं करील ! पण लक्षांत ठेव–तिला घरांत बोलावशील तर ! तिनं घरांत पाऊल टाकलं तर ठीक होणार नाहीं. ''

निर्मला शांतपणें म्हणाली, '' जर घरांत आलीच ती तर काय कराल आई ? ''

आईची तळपायाची आग मस्तकाला गेली. तिरमिरीनें ती म्हणाली, '' तंगडी तोडून टाकीन आली तर ! म्हणे काय कराल ? रामूच्या चिथावणीनें तूं इतकी डोक्यावर चढली आहेस. पण त्याला कांहीं भीत नाहीं मी ! तूं आणि तुझ्याबरोबर रामू दोघांचीही भीड ठेवणार नाहीं. अशा कुलटांच्या छायेला उभं राहणं सुद्धां पाप आहे. मोठी घरांत बोलवायला निघाली तिला ! ''

निर्मला म्हणाली, '' पण आई ! ती जर दारांत आली तर मी तिला हाकलून देणार नाहीं. मला तर वाटतं कीं, तिनं कायमच आपल्या घराचा आश्रय घ्यावा. पण तिची कांहीं तरी व्यवस्था होईपर्यंत घराच्या एका कोपऱ्यांत ती पडून राहिली तर काय बिघडलं ? '' ती काय आपल्या स्वयंपाकघरांत थोडीच येणार आहे ? कसंही असलं तरी एक गरीब अडलेली स्त्री आहे बिचारी ! चूक कोणाच्या हातून होत नाहीं ? ''

आई म्हणाली, '' एकदां सांगितलं ना कीं, मी तिला घरांत येऊं देणार नाहीं ! तरी पुन्हां पुन्हां उलटून उत्तरं देतेस ? तिचं आपलं काय नातं ? अन् असतं तरी मीं तिला लाथ मारून हाकलली असती ! फिरून फिरून तेंच तेंच विचारून माझा राग वाढवूं नकोस. परिणाम चांगला होणार नाहीं. ''

पुन्हां निर्मला नम्रपणें म्हणाली, '' तुमचं काय बिघडणार आहे यांत ? माझ्या खोलींत पडून राहील. वाटलं तर तिचं तोंड तुम्हांला दिसूं नये अशी मी व्यवस्था करीन. पण आतांच त्याची चर्चा कशाला ? आपल्याकडे ती आलीच तर पाहतां येईल. ''

आईचा राग आणखी वाढला. ती म्हणायला लागली, "तुझ्या खोलींत राहील, अन् मला तोंड दाखवणार नाहीं, यांत काय अर्थ आहे? कांहीं तरी उलटं-सुलटं तेंच तें काय बोलतेस? तूं आपल्या शिक्षणाच्या अभिमानानं फुगून जाऊं नकोस. मी तुझ्या त्या विद्वत्तेला काडीचीही किंमत देत नाहीं. धर्माच्या नांवानं सदा कपाळाला आठ्या! अशा कुलटेला घरांत घेऊन धर्म राखणार म्हणे! विचित्रच रीत आहे ही! सबंध आळींत तिला कोणी आश्रय द्यायला तयार नाहीं. ही निघाली घरांत ठेवून घ्यायला! तूंच जगांत एक मोठी धर्मदात्री आहेस कीं नाहीं! दुसऱ्याला दाखवायला मोठा दयाळूपणाचा आव आणतां येतो. ज्यांना ठाऊक नसेल त्यांना सांग. घरच्या म्हातारीची काळ तूं!"

निर्मलाही जरा रागावून म्हणाली, "मला कशाला इतकं खरं-खोटं ऐकवतां?"

निर्मलेला मध्येंच थांबवून जरा दरडावून रमाकांत म्हणाले, "तूं चूप रहाणार-नाहींस निर्मला? बऱ्याच वेळांपासून पाहतों तोंड सारखं चाललं आहे. तुला जर बिट्टनची येवढी दया येत असेल, अन् तुझ्याच्यानं राहवत नसेल तर जा तिला घेऊन नि एखाद्या धर्मशाळेंत जाऊन रहा. माझ्या घरांत मात्र तिला जागा नाहीं."

निर्मलेलाही आतां राग आवरेना, ती जोरानें म्हणाली, "काय या घरांत एखाद्या व्यक्तीला एक-दोन दिवस ठेवून घेण्याइतका माझा अधिकार नाहीं का? त्या दिवशीं राधेलालजीचा इतका आदरसत्कार कां केलात! त्यांचं चरित्र कोणाला ठाऊक नाहीं? घरांत तर त्यांनीं मुसलमान वेश्या ठेवली आहे. तिच्या हातचं ते खातात-पितातसुद्धां? बिट्टननें काय यापेक्षां जास्त अपराध केला आहे?"

रमाकांतांच्या या बोलण्यानें आईलाही धैर्य आलें. ती कडाडली, "चूप बैस, नाहींतर जीभ ओढून काढीन. सारखी 'बिचारी बिट्टन, बिचारी बिट्टन'

म्हणतेस. तिची तुला येवढी दया येते याचं कारण तूंच तशी असशील. उगीच नाहीं एवढा पुळका येत आहे तो ! साध्वी स्त्री अशा बाजारबसवीच्या सांवलीला सुद्धां उभी रहाणार नाहीं. आणि तूं राधेलालला काय म्हणून नांवं ठेवतेस ? तो तर फुलावरचा भ्रमर आहे. पुरुषांच्या जातीला सर्व कांहीं शोभतं. एक नाहीं दहा बायका ठेवील तो. पण बाई पुरुषांची बरोबरी कशी करू शकेल ? ''

निर्मला चढ्या आणि निश्चयाच्या स्वरांत म्हणाली, '' पुरे आई ! मी आतां जास्त ऐकून घेणार नाहीं. मी ब्रिट्टनसारखी असेन किंवा तिच्याहूनही वाईट असेन. पण या वेळीं ती निराश्रित आहे. माणुसकीच्या दृष्टीनं तिला मदत करणं मी आपला धर्म समजते आणि तो मी करीन ! ''

आतां रमाकांतांना राग आवरेना. खोलींतून बाहेर अंगणांत येऊन जळत्या डोळ्यांनीं निर्मलेकडे पहात ते म्हणाले, '' काय म्हटलंस ? ब्रिट्टनला तूं या घरांत ठेवून घेशील ? ''

निर्मला निश्चयपूर्वक म्हणाली, '' होय. या घरांत जितका तुमचा अधिकार आहे, तितकाच माझाही आहे. तुम्ही जर आपल्या चारित्र्यहीन मित्रांना आदरसत्कारपूर्वक घरांत येऊं देतां तर मी एक असाह्य, दीन अबलेला निदान थोडावेळ तरी आश्रय देऊं शकतेंच. ''

रमाकांत निर्मलेच्या आणखी जवळ जाऊन कठोर स्वरानें म्हणाले, '' माझ्या इच्छेविरुद्ध तूं तिला या घरांत आश्रय देशील ? ''

तशाच स्वरांत निर्मला उतरली, '' हो. माझ्या इच्छेलाही कांहीं किंमत आहे. तुमच्या इच्छेपुढें माझी इच्छा सदोदितच काय म्हणून दाबली जावी ? ''

रमाकांतांना राग आवरणें अशक्य झालें. त्यांनीं पत्नीच्या तोंडांत तडातड तीन-चार थपडा मारल्या. निर्मलेचें बोलणें बंद झालें. रमाकांत तडक खोलींत जाऊन आंतून कडी लावून बसून राहिले. आई रखवाल-

म. प्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ३६७२ नों. दि. .....
वि. ना.वा. क्र. .....

दारासारखी दरवाज्यावर पहारा करीत बसली. न जाणों, बिट्टन कुठें डोळा चुकवून येतें कीं काय !

* * *

या प्रकारानतर एक तासानें बिट्टनला जेव्हां कुठेंच आश्रय मिळाला नाहीं तेव्हां 'निर्मलेजवळ जाऊन आपल्या भाग्याची परीक्षा पहावी' असें तिनें ठरविलें. दारांतच तिला आई दिसली. बिट्टनला पाहतांच ती गरजली, "कोण आहे? बिट्टन ! दूर ! तिकडेच उभी रहा. खबरदार उंबऱ्याच्या आंत पाऊल टाकशील तर !" बिट्टन बाहेरच थांबली. निर्मला जवळ जाऊन शांत मृदु स्वरांत म्हणाली, "बिट्टन ! बाहेरच बैस. मी तिथेंच तुझ्या जवळ येतें." बाहेर येऊन बिट्टन व निर्मला बराच वेळ एकमेकींच्या गळ्यांत गळा घालून रडत होत्या !

निर्मला म्हणाली, "तुझ्यासारखंच मलाही घर नाहीं बाई ! या घरावर जर माझा थोडासुद्धां अधिकार असता तर मी तुला इथून जाऊंच दिलं नसतं. पण काय करूं ? मी लाचार आहें. माझं हें पत्र घेऊन तूं माझा भाऊ ललितमोहन याच्याकडे जा. तो तुझी सर्व व्यवस्था करील. तुला तर त्याचं घर ठाऊकच आहे. रात्रीच्या वेळीं पायीं जायला त्रासदायक होईल. हा रुपया घे टांगा करायला. ईश्वरावर विश्वास ठेव. ज्याला जगांत कोणी नसतं त्याचा पाठीराखा परमेश्वर असतो."

निर्मलेनें दहा रुपये बिट्टनला दिले. पत्र घेऊन ती निघून गेली. निर्मला बाहेर पडवींत चटई टाकून त्यावर पडली. सकाळीं ती जागी झाली, तेव्हां रमाकांत उठले होते व त्यांची आई स्नान करून पूजेची तयारी करीत होती.

रोजच्याप्रमाणें निर्मला सर्व काम करूं लागली. जणुं कांहीं रात्रीं कांहीं झालंच नव्हतं. मार खाल्ल्यानंतर जर तिनें आरडाओरडा केला असता,

बडबडली असती, तर रमाकांतांना आपल्या वर्तनाचा इतका पश्चात्ताप झाला नसता. त्यांना वरचेवर आपण चुकलों असं वाटत होतं. अशी चूक त्यांच्याकडून कधींच घडली नव्हती. काल त्यांनीं बेफाम होऊन तिच्या अंगावर हात टाकला होता. त्याबद्दल त्यांना शंभर विंचू चावल्यासारख्या यातना होत होत्या. ते वाट पहात होते कीं, निर्मला आपल्याला एकीकडे भेटेल व आपण पश्चात्तापाच्या आसवांनीं तिचे पाय भिजवून टाकूं आणि तिची क्षमा मागूं. पण निर्मला हें ओळखून अशी वेळ येऊंच देत नव्हती. ती सारखं घरांतलं काम करीत होती. ती खूष आहे कीं नाखूष आहे हेंही तिच्या चेहऱ्यावरून कळत नव्हतें. तिच्या वर्तनांत एकच फरक होता तो म्हणजे रुबाबाचा अभाव. घरावर कोणताही हक्क नसणाऱ्या पण काम करणाऱ्या नोकरासारखीच आपण एक, असें ती आपल्याला समजत होती.

● ● ●

"वहिनी ! ध्या हें आणलंय."

"खरंच आणलंय ? कुठें मिळालं ?"

"मोठ्या कष्टानं मिळालीं, वहिनी !"

"मग मजुरी घे त्याबद्दल."

"काय देशील ?"

"तूं मागशील तें."

"मी मागेन तें देऊं शकशील तूं !"

"कां नाहीं देणार ? तूं मीं मागितलेल्या वस्तु आणून देऊं शकतोस, मग मी तुला हवी असलेली वस्तु कशी नाहीं देणार ?"

"नाहीं वहिनी, तूं देऊं शकणार नाहींस. उगीच कशाला म्हणतेस !"

"तुला नको असेल तर गोष्ट वेगळी. माग सांगितलं कीं, तूं मागशील तें मी देईन."

"राहूं दे आतां. वेळ येईल तेव्हां मागून घेईन." असं म्हणत म्हणत मोहन आपल्या घराकडे निघाला. दुरून येत असलेल्या भामेच्या सासूनें द्रोणांत कांहींतरी घेऊन मोहनला घरांत शिरतांना पाहिलें होतें. पण ती घरांत येऊन पोंचण्यापूर्वीच मोहन निघून गेला होता. मोहनला ती कांहींच

विचारूं शकली नाहीं. मोहननें द्रोणांतून कांहींतरी आणलेलें तिनें पाहिलें होतें. पण काय आणलें तें तिला कळूं शकलें नाहीं.

* * *

घरीं आल्याबरोबर तिनें सुनेला विचारलें, " मोहन, द्रोणांतून काय घेऊन आला होता ? "

भामा मनाशीं हंसत म्हणाली, " मिठाई. "

म्हातारी संतापली. ती रागानें म्हणाली, " इतकं खातेस दिवसभर बकरी-सारखं तरी तुझं पोट भरत नाहीं. बाजारांतून मिठाई आणवून खातेस ? मीं जर आतां डोळ्यांनीं पाहिलं नसतं तर तूं कधीं सांगितलं असतंस कां ? "

भामा हंसतच म्हणाली, " सांगूं कशाला ? सांगण्याकरितां थोडीच मागवली होती ! "

" काय घरांत मला कांहींच किंमत नाहीं ? तुझ्याजवळ मिठाईकरितां पैसे आहेत. मीं कधीं दानधर्माकरितां मागितले तर नाहीं म्हणतेस. तुझा नवरा असला तरी माझाही मुलगा आहे ना तो ! त्याच्या मिळकतीवर माझा कांहींच हक्क नाहीं का ? दोन वेळच्या ओल्या-कोरड्या भाकरीशिवाय मला कधींच कांहीं मिळत नाहीं, तूं मात्र मिठाई आणवून खातेस ? करून घे मनाला वाटेल तें. परमेश्वर सर्व पाहतोच आहे. तो शिक्षा करीलच. "

भामा (हंसतच)–" कां उगीच रागावतां ! काय झालं एक दिवस मिठाई खाल्ली म्हणून ! ठेवली आहे अजून. तुम्हांला हवी तर तुम्हीही घ्या."

" राहूं दे आतां. अशी सारवासारव करून मी फसणार नाहीं. दुसऱ्याला सांग तूं या गोष्टी. तुला वाटत असेल आपण करतों तें दुसऱ्याला कळत नाहीं. मी तुला पूर्ण ओळखते. जगांत पुष्कळ बायका पाहिल्या पण तुझ्यासारखी मात्र पाहिली नाहीं."

ग्रंथ संग्रहालय, अनुक्रम 30866 आ.वी. 24482 दि. 8-8-67

(पुन्हां हंसत हंसत) "सर्वज्ञणी तुम्हांला (माझ्यासारख्या आंढळण शक्यच नाहीं. माझी बरोबरी करणं सामान्य गोष्ट नव्हे. मी अशी-तशी थोडीच आहें."

"चल चल मोठेपणाची मिजास दाखवूं नकोस. बाहेर काढीन तुझें सर्व मोठेंपण."

भामा आतां थोडी चिडली होती. ती म्हणाली, "कसं मोठेंपण काढणार तुम्ही माझं ? काय, माराल मला ?"

म्हातारीला आणखीच राग आला. ती म्हणाली, "मारलं तरी माझा कोण हात धरणार आहे ? मी गंगाला मारूं शकतें तर तुला मारतांना कोण माझा हात धरणार आहे ?"

"मारा बरं. पाहूं कसं मारतां तें ! सासूचा मार गुपचूप खाणारी मी सून नव्हे, हें पक्कं लक्षांत ठेवा."

"नाहींतर काय तूंही मला मारशील ? देवा ! देवा ! हिनें तर घटकेंत मला उडवून दिलं. मला मारीन म्हणते. येऊं दे गंगाला म्हणजे सांगतें कीं तुझ्या बायकोच्या हातचा मार खाऊन आतां या घरांत राहण्याची माझी इच्छा नाहीं. मला आपलं वेगळं झोपडं बांधून दे. ज्या घरांत सून सासूला मारण्याला तयार होते त्या घरांत राहण्याचा धर्म राहिला नाहीं." येवढं बोलून म्हातारी जोरजोरानें रडायला लागली.

भामानें पाहिलें तों गोष्ट मर्यादेबाहेर गेली. ती म्हणाली, "मी मारीन म्हटलं नाहीं. कां उगीच खोटं खोटं बोलतां. मी गुपचूप कोणाचा मार खाणार नाहीं हें खरंच आहे. माझ्या आईबापांचा सुद्धां खाल्ला नाहीं. मग इतरांचा लांबच राहिला."

"गुपचूप सहन करणार नाहींस म्हणजे मला मारशील असंच कीं नाहीं ? हाच अर्थ होतो त्या बोलण्याचा. येवढी मखलाशी करून सांगते आहेस तें मला समजत नाहीं ?"

म्हातारीचें जोरजोरानें रडणें ऐकून आजूबाजूच्या बायका जमा झाल्या. कांहीं भामाच्या बाजूच्या होत्या, तर कांहीं तिच्या सासूच्या. म्हातारीला रडतांना पाहून भामालाच सर्वांनीं दोषी ठरविलें. सगळ्याजणी म्हातारीच्या भोंवतीं घेर करून बसल्या. भामा गुन्हेगाराप्रमाणें घरांत निघून गेली. भामानें ऐकलें कीं, सासू जमा झालेल्या स्त्रियांना सांगते आहे, "आपण द्रोण भरून मिठाई आणून खाते. मीं कधीं पैशा-अडक्यांची गोष्ट काढली तर साफ 'नाहीं' म्हणून सांगते. हिला वाटेल तेव्हां पैसे मिळतात. माझ्या नांवानेंच सरतात. क्षुल्लक वस्तूकरितां सुद्धां मागून मागून जीव बेजार होतो. मनांत आलं तर देते आणून. नाहींतर खुशाल बडबड, अशी माझी स्थिति आहे. आजही द्रोणभर मिठाई आणली आहे. जरा विचारलं तर मारायला तयार झाली. म्हणते कीं, 'मी माझ्या नवऱ्याचें खातें. कांही कोणाच्या बापाचं खात नाहीं.' तिचा नवरा असला तरी माझा मुलगा आहे. तिचा बारा आणे हिस्सा असला तर माझा निदान चार आणे तर आहेच?"

शेजारची एक म्हातारी म्हणाली, "राम राम. येवढी शिकलेली हुषार आहे; पण अक्कल कवडीची नाहीं. तूं मुलाचा भार नऊ महिने वाहिलास. तुझा सोळा आणे हक्क आहे. मुलगा बायको आईच्या सेवेकरितां आणत असतो. तुमची सगळी सेवा हिनं केली पाहिजे. माझा नंदन माझे पाय दाबल्याशिवाय बायकोला खोलींत पाय ठेवूं देत नाहीं."

"आपलाच दाम खोटा, परक्याला काय दोष लावायचा बाई! मुलगाच चांगला असता तर ही कशी मला मारायला तयार झाली असती"

* * *

गंगाप्रसाद गांवांतल्या प्राथमिक शाळेंतील एका मास्तरच्या बदलीवर काम करीत होता. साडेसत्रा रुपये महिन्याला मिळण्याच्या या जागेकरितां त्याला दिवसभर धांवपळ करावी लागे. याला भेट त्याला भेट—सर्वांना खूष करण्याचा प्रयत्न करूनही नोकरीच्या शाश्वतीबद्दल त्याला फारशी आशा

नव्हती. बऱ्याच महिन्यांपासून तो बेकार होता. भामाचे कांहीं दागिने होते. ते गहाण टाकून महिन्याची तोंडमिळवणी कशीतरी होत असे. भामा अत्यंत काटकसरीनें संसार चालवीत असे. पति व सासू यांना पोटभर घालून आपण अर्ध-पोटीं रहात असे. कधीं कधीं नुसत्या पाण्यावरच तिचा निर्वाह होई. कधीं नुसतं उसळीचं पाणी, तर कधीं नुसती भाजी खाऊनच ती राही. पैशाच्या अडचणीमुळें घरांत नेहमींच अन्तःकलहाचे प्रसंग येत असत.

दिवसभराच्या धांवपळीनंतर गंगाप्रसाद घरीं आले, तेव्हां संध्याकाळ झाली होती. आंगणांतच त्यांची आई उदास होऊन बसलेली त्यांना दिसली. मुलाला पाहिल्यावर खालीं मान घालून ती गुपचूप बसून राहिली. गंगाप्रसादांना आपल्या आईबद्दल फार आदर होता. तिला दुःख होईल अशी गोष्ट ते कधींच करीत नसत. आईचा उदासवाणा चेहरा पाहून ते तिच्याजवळ जाऊन बसले. प्रेमानें आईच्या गळ्यांत हात घालून त्यांनीं विचारलें, "आई! आज तूं उदास कां? प्रकृति बरी नाहीं का?"

"नाहीं, चांगली आहे."

"कांहींतरी झालंय् खास. त्याशिवाय तूं उदास कशी असशील?"

आतां आईच्यानें रहावेना. ती हुंदके देऊन देऊन रडत म्हणाली, "मला तुमच्यांत भांडण लावायचं नाहीं. माझं एवढंच म्हणणं आहे कीं, या घरांत मला आतां राह्यचं नाहीं. मला निराळं झोंपडं बांधून दे. तिथें मी पडून राहीन. तुम्हांला वाटेल तर पैसे द्या. नाहींतर भीक मागून खाईन."

"कां बरं आई! कांहीं भांडण झालं? खरं खरं सांग!"

"आजचंच काय? रोजचंच आहे तें! तुझ्या बायकोनें मोहनकडून आज माझ्या देखत द्रोणभर मिठाई आणली. मीं जरा विचारलं तर म्हणते, "हो आणवली मिठाई. मी माझ्या नवऱ्याचं खातें. कांहीं

तुमच्या बापाचं तर खात नाहीं ? मीं जेव्हां म्हटलं कीं, तुझा नवरा आहे, तर माझा मुलगा नाहीं का ? त्याच्या मिळकतीवर माझाही हक्क आहे. तर म्हणते कशी, 'तुमचा हक्क होता एकेकाळीं. आतां सर्व माझं आहे. जास्त बोलाल तर मारून घराबाहेर घालवीन.' तुझ्या बायकोचा मार वाटलं तर तूं खा. मी भीक मागून पोट भरीन, पण सुनेच्या हातचा मार नाहीं खायची."

गंगाप्रसादाला आतां धीर निघेना. ते म्हणाले, "ती तुला मारील आई ! मीच तिचे हातपाय तोडून टाकीन." असं म्हणत हातांत काठी घेऊन ते तावातावानें घरांत शिरले व भामाला दटावून म्हणाले, "मोहनच्या हातून तूं काय आणवलं होतंस ?"

गंगाप्रसादांच्या या प्रश्नाला. "कदंबाची फुलं होतीं बरं का" असं उत्तर देत मोहन आंत शिरला तोंपर्यंत भामानें द्रोण आणून गंगाप्रसादांसमोर ठेवला होता. द्रोणांत पिवळ्या पिवळ्या बेसनाच्या लाडवांसारखीं आठ-दहा कदंबाचीं फुलें होतीं. तीं फुलें पाहून गंगाप्रसादांना हंसूं आलें.

द्रोणांतलें एक फूल उचलून घेऊन मोहन म्हणाला, "किती सुंदर आहे हें फूल !"

● ● ●

चौधरी आणि चौधरीणबाईच्या लाडानें तिनी स्वच्छंद आणि उच्छृंखल झाली होती. ती फार बेरड आणि चौकस होती. अर्ध्या रात्रीं वाटेल तेव्हां ती नदीवर जाऊन जलविहार करी. पाण्याच्या कांठावर खेळणारीं चंद्र-किरणें पहात बसणें हा तिचा नेहमींचाच खेळ होता.

एवढी एकच मुलगी चौधरींचें सर्वस्व होती. जातींत योग्य नवरामुलग न आढळल्यानें बापानें तिचें लग्न अजून केलें नव्हतें. नदीच्या या तीराघरून स्या तीराला सर्व गोष्टी नेण्याचा ठेका चौधरीनें घेतला होता. बापाच्या गैरहजेरींत ती हें काम व्यवस्थितपणें पार पाडीत असे.

* * *

" आज इतक्या लवकर कुठें जातेस तिनी ? "

" कां तुम्हांला ठाऊक नाहीं ? "

" काय ? "

" हेंच कीं, राजेसाहेब आज स्या किनाऱ्यावर जाणार आहेत. "

" कोणते राजेसाहेब ? "

" तुम्हांला हेंही ठाऊक नाहीं ? "

" मी तर आजच इथें आलों. "

" आतांपर्यंत कुठें होतात ? "

" आपल्या घरीं. "

" जशी कांहीं मी दिवसभर इथें या घाटावरच्च असतें कीं नाहीं मला सर्व ठाऊक असायला ? "

" तुम्ही मला नेहमींच कसं रागवतां ! आतां मी तुमच्याशीं बोलणारच नाहीं ! "

तिन्नीला चिडवून तिची क्रुद्ध मुद्रा बघण्यांत तरुणांना फार आनंद वाटत असे. म्हणून नेहमींच ते तिला असे निरर्थक प्रश्न विचारून चिडवीत असत. आज तर गोष्ट जरा जास्त वाढली. तिन्नीनें तर न बोलण्याची प्रतिज्ञा केली. रागाच्या झटक्यांत तिन्नी जायला निघालेली पाहून युवकानें तिचा रस्ता अडविला आणि मोठ्या नम्र भावानें तो म्हणाला—

" तिन्नी ! खरं सांग ! मी तुझं वल्हें चालवीन, तुझं सर्व काम करून देईन. "

तिन्नीच्या रागीट मुद्रेवर हंसूं फुललें. युवक आपल्याबरोबर वल्हवील तर आपलं अर्धं काम करील, या कल्पनेनें ती प्रसन्न होऊन म्हणाली, " खरं सांगतें तूं माझ्याबरोबर वल्हवायला येशील ? हें बघ बापू नाहींत. मी एकटीच आहें. तुला जर खरंच माझ्याबरोबर वल्हवायचं असलं, तर सांगेन. "

" खरं नाहीं तर काय खोटं ? मी जरूर वल्हवीन. तुला मला दाखवावं लागेल. " युवक म्हणाला.

" इथें आपल्या जवळच त्यांची कांहीं जहागिरी आहे नं ! तिथंच तर नदीच्या त्या बाजूला राजेसाहेब शिकार खेळायला जाणार आहेत. महिना-पंधरा दिवसांचं काम आहे, मनोहर ! खूप मजा येईल. पैसेही चांगले मिळतील. मात्र बापू येईपर्यंत मला मदत करायचं कबूल केलं पाहिजेस तूं. "

" यांत काय विशेष आहे तिन्नी ? तुला पसंत असेल तर मी तुझ्या-बरोबर जन्मभर वल्हवायला तयार आहें. "

" मीं जसं कांहीं नाहींच म्हटलं आहे ! तूं माझ्याबरोबर नाव चालवशील आणि मी नाकारीन कशी ? "

" मग तिन्नी ! तूं माझ्याबरोबर लग्न कां करीत नाहींस ? म्हणजे आपण दोघं जन्मभर वल्हवीत राहूं. "

क्षणभर तिन्नी लाजली. पण लगेच स्वतःला सांभाळून म्हणाली, " बोलतांना तर बोलून गेलास मनोहर ! पण मी लग्नाला तयार झालें तर—? "

" तर मी आनंदानें वेडा होईन. "

" मग पुढें ? "

" पुढें तुला राणी करून मी स्वतःला बादशहा समजेन. "

" आपल्याला बादशहा समजशील मनोहर ? आणि मी होईन राणी. पण मी राणी झाल्यावर वल्हवणार नाहीं, हें आधींच सांगून ठेवतें. "

" मग मी तरी थोडाच वल्हवणार आहें ! मी राजा न् तूं माझी राणी ! मग वल्हवतील तुझे-माझे नोकर. "

" असं आहे तर ! " असं म्हणून तिन्नी मोठमोठ्यानें हंसली. दोघेंही घाटाकडे निघून गेलीं.

* * *

एका मोठ्या नावेंत राजेसाहेब आणि युवराज कृष्णदेव आपल्या सल्लागारांबरोबर परतीराला जाण्याकरितां बसले होते. तिन्नी कांहीं कोळी व मनोहराबरोबर वल्हवायला लागली. काम करतांना तिन्नीच्या मनोहरबरोबर हंसत हंसत गप्पाही चालू होत्या. वाऱ्याबरोबर उडणारे तिचे काळे, कुरळे केस तिच्या सुंदर मुखाची शोभा वाढवीत होते. कृष्णदेव आपल्याकडे इतका टक लावून पाहतो आहे इकडे तिन्नीचें लक्ष नव्हतें. राजेसाहेब मात्र मुलाची स्थिति ओळखून होते. त्यांच्या आयुष्यांत असे प्रसंग कितीतरी येऊन गेले होते.

आतां कृष्णदेव बहुधा रोज जलविहाराकरितां येत व तिन्नी नावाड्याचें काम करी. कृष्णदेवाच्या मूक प्रेमानें तिन्नीही त्याच्याकडे आकर्षित होत होती. ज्या वेळीं कृष्णदेव घाटावर येई त्या वेळीं इतर कोळी नसले तरी तिन्नी स्वतः नाव चालवीत असे.

राजेसाहेबांना सर्व ठाऊक होतें. युवराज रोज जलविहाराला जातात आणि तिन्नी नाव चालवते हें त्यांना कळलें होतें. ही गोष्ट कळूं देणें योग्य नाहीं, असें ठरवून शिकारीला न जातांच राजेसाहेब आपल्या गांवीं निघून गेले. पित्याबरोबर कृष्णदेवही परत गेला. पण त्याचें हृदय मात्र त्या कोळ्याच्या झोंपडींत तिन्नीजवळ राहिलें.

गांवांत परत आल्यावर कृष्णदेव सदोदित आपल्याच विचारांत उदास असा असे. कदाचित् त्याला मनोहरच्या भाग्याचा हेवाही वाटत असेल. तिन्नीचें आणि मनोहरचें मनमोकळें वागणें, नाचणें पाहून 'हीं सामान्य माणसें किती सुखी आहेत!' असें त्याला वाटत असे. मी जर कोळी असतों आणि तिन्नीबरोबर नाव चालवायला मिळाली असती तर किती सुखी झालों असतों!"

परंतु तो कधीं कोणाला कांहीं सांगत नसे. आतां त्याला शिकारीची आवड राहिली नव्हती. तो उत्तम बुद्धिबळपटु होता. पण तिकडेही आतां त्याचें मन लागेना. तो अध्ययनप्रेमी होता. त्याच्या वाचनालयांत उत्तमोत्तम पुस्तकें होतीं. पण तीं आतां धूळ खात होतीं.

दोन-चार मित्र जमत. ते त्याला प्रश्न करीत. पण कृष्णदेवांत फरक पडेना. त्याच्या मनांत—विचारांचें तुफान चाले. तो आपल्या यातना मुकाट्यानें सहन करीत होता. या मनोयातनांचा प्रभाव त्याच्या शरिरावरही पडला. दिवसेंदिवस त्याची प्रकृति खालावत चालली.

पित्याला मुलाचा रोग ठाऊक होता. पण हळुहळूं हें नाहींसें होईल म्हणून ते दुर्लक्ष करीत. कृष्णदेव आपल्या पित्याचा एकुलता एक मुलगा असल्यानें राजेसाहेबांना त्याची फार काळजी वाटे. तिन्नीच्या अकृत्रिम

रूपचातुर्यानें राजेसाहेबांनाही आकृष्ट केलें होतें. पण ती कोळ्याची मुलगी होती. तिच्याबरोबर कृष्णदेवाचें लग्न कसें होणार ?

एक दिवस राजेसाहेब कृष्णदेवाच्या खोलींत गेले. त्या वेळीं तो निजला होता. डोळ्यांखालीं खोल वर्तुळें पडलीं होतीं. शरीर पिवळें पडलें होतें. चेहरा सुकून गेला होता. मखमलीच्या गादी-तक्क्याशिवाय न निजणारा त्यांचा लाडका कृष्णदेव विचार करतां करतां एका चटईवरच झोंपी गेला होता. राजेसाहेबांच्या डोळ्यांत पाणी आलें. एक शब्दही न बोलतां ते खोलीच्या बाहेर पडले.

* * *

दुसरे दिवशीं राजेसाहेबांकडून तिन्नी व चौधरी यांना बोलावणें आलें. त्यांना तातडतोब नेण्याकरितां गाडी आली होती. यामुळें साऱ्या आळींतल्या लोकांना कुतूहल वाटलें. चौधरी फार घाबरला. आपल्या अनुपस्थितींत आपल्या द्वाड पोरीनें कांहींतरी केलें असलें पाहिजे, असें त्याला वाटलें. राजेसाहेब नाखूष आहेत. नाहींतर तिन्नीसकट आपल्याला कशाला बोलावणें आलें असतें ? सगळ्या आळींतल्या लोकांनीं परोपरीनें त्याला शिकविलें, पण तिन्नीच्या मनांत वेगळेच भाव येत होते. ती आपल्या पित्यासह मोटारींत बसली, तेव्हां मनोहर हळूंच म्हणाला, " तिन्नी, राजकुमारांनीं तुला आपली राणी व्हायला बोलावलं असलं तर ? "

तिन्नी—तूं मला तेव्हां राणी करणार होतास; आतां राजकुमार करतील !

मनोहर—तिन्नी, तूं सदोदित माझ्या हृदयाची राणी आहेस अन् आज असं काय बोलतेस ?

" नाहींतर काय ? लग्नाशिवाय मी तुमच्या हृदयाची राणी कशी होऊं शकणार ? " तिन्नीनें स्पष्टतेनें विचारलें.

मनोहर—तिन्नी ! राणी करायला विवाहाची काय जरूरी आहे ? जिच्यावर प्रेम करूं तीच आपली राणी.

तिन्नी म्हणाली, " छट्, मी अशी राणी नाहीं होणार. अशी राणी व्हायला कोळ्याचीच मुलगी चांगली. " मनोहरच्या उत्तराची वाट न पाहतां ती मोटारींत बसली. मोटार निघाली.

राजेसाहेबांच्या महालांत ही मंडळी पोंचली तेव्हां अंधार पडायला लागला होता. त्यांच्या आगमनाची बातमी राजेसाहेबांना दिली गेली. चौधरी व तिन्नी यांना एका रिकाम्या खोलींत बोलावण्यांत आलें. खोलींत फक्त राजेसाहेब व कृष्णदेव होते. भीतीमुळें चौधरींचें मन ठिकाणावर नव्हतें; पण तिन्नी मनांतल्या मनांत हंसत होती. पितापुत्रीचा योग्य सन्मान करून राजेसाहेब म्हणाले, " चौधरी, आम्हीं तुम्हांला कशाला बोलावलें हें ठाऊक नसेल ? "

चौधरी भीतीनें कांपत हात जोडून म्हणाला, " मी तर महाराजांचा गुलाम आहें." मध्येंच राजेसाहेब म्हणाले, " आम्हांला ही तुमची मुलगी युवराजांकरितां हवी आहे."

तिन्नी गालांतल्या गालांत हंसली. चौधरी आश्चर्यानें सुन्न होऊन तो एकदां राजेसाहेबांकडे आणि एकदां तिन्नीकडे पाहूं लागला. त्याचा या गोष्टीवर विश्वासच बसेना. कुठें हा भिकार कोळी न् कुठें राजेसाहेब ! ही सोयरीक होणं कसं शक्य आहे ? पुन्हां चौधरी हात जोडून म्हणाला, " महाराज, ही माझी मुलगी नाहीं."

राजेसाहेबांनीं आश्चर्यानें विचारलें, " मग कुणाची मुलगी आहे ही ? "

तो हात जोडून म्हणाला, " महाराज, पंधरा वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. नदीला मोठा पूर आला होता. या पुरांतच माझी म्हातारपणची काठी ही मुलगी मिळाली. एका खाटेवरून ही वाहात आली. हिच्या गळ्यांत एक सोन्याचा ताईत होता."

ताईताचें नांव ऐकतांच तो पाहण्याची राजेसाहेबांना उत्कंठा लागली. त्यांना अस्पष्ट गतस्मृति आठवल्या. पित्याच्या सांगण्यावरून तिन्नी गळ्यांतला ताईत काढूं लागली.

त्यानें बोलणें सुरूं केलें, "महाराज, या ताईताचीही एक विचित्र कहाणी आहे. एक दिवस ताईताचा दोरा तुटला. पुष्कळ दिवस तो पुन्हां गळ्यांत बांधायची आठवण राहिली नाहीं. ही इतकी आजारी झाली कीं, वांचत नाहीं असं वाटलं. ताईत गळ्यांत बांधतांच औषधाशिवाय बरी झाली. तेव्हांपासून तो तिच्या गळ्यांतच आहे."

पंधरा वर्षांपूर्वीं आपली मुलगी तंबूंतून पुराबरोबर वाहून गेल्याचें राजेसाहेबांना आठवलें. एका ज्योतिष्याच्या सांगण्यावरून तिच्या गळ्यांत एक ताईत बांधलेला होता. त्यांनीं एकदां कृष्णदेवाकडे व एकदां तिन्नीकडे पाहिलें. दोघांत त्यांना बरेंच साम्य दिसलें. तोंपर्यंत तिन्नीनें ताईत काढून राजेसाहेबांसमोर ठेवला. युवराजांचें हृदय धडधडत होतें. ताईत हातांत घेऊन पाहतांच 'मांझी कांता' म्हणून राजेसाहेबांनीं तिला हृदयाशीं धरलें. ज्योतिष्याच्या सांगण्यावरून मुलीच्या गळ्यांत बांधलेला हाच तो ताईत होता.

पिता-पुत्री व बहीण-भावाचें हें अपूर्व मीलन होतें. सर्वांच्या नेत्रांतून प्रेमाश्रू वहात होते.

* * *

महालाजवळच आतां चौधरीचें घर बांधलें गेलें आहे. आतां ते नाव चालवीत नाहींत. राजेसाहेबांकडून त्यांना आतां इनामी वेतन मिळतें.

राजमहालांत राहणारी कांता चौधरीच्या घरांत आली कीं तिन्नी होते. अजूनही ती चौधरीच्या ताटांत बसून चौधरीच्या हातची जाडी-भरडी भाकरी खाते.

बहिणीच्या रूपानें तिन्नीचा लाभ झाला म्हणून कृष्णदेव नाखूष नव्हता. त्याला तिन्नीचा सहवास हवा होता. मग तो पत्नीच्या रूपानें मिळो वा बहिणीच्या !

● ● ●

सबंध शहरांत डॉ. मिश्रांच्या तोडीचा डॉक्टर नव्हता. त्यांची प्रॅक्टिस फारच जोरांत होती. त्यांचा हात मोठा यशस्वी होता. विनोदी व उदार स्वभावाची त्यांत जोड होती. त्यांच्या उत्साहवर्धक बोलण्यानें रडणारा रोगी हंसायला लागत असे. निकटवर्ति आप्ताप्रमाणें त्यांचें रोग्यांशीं वर्तन असे. तासन् तास रोग्यांशीं नानाप्रकारच्या गप्पा मारून त्यांच्या मनांत ते आशा व विश्वास उत्पन्न करीत असत.

मुलांविषयीं त्यांना फार प्रेम होतें. त्यांना पाहिल्याबरोबर लहान मुलें त्यांना बिलगत असत. मुलांना आकर्षक वाटणाऱ्या पेपरमिंटच्या वड्या नेहमीं त्यांच्या खिशांत असत. ते होमिओपाथीचे चिकित्सक होते. या औषधाच्या गोड गोळ्याही मुलांना त्यांच्यापासून मिळत.

एक दिवस असेंच मुलांनीं येऊन त्यांना घेरलें. एका रोग्यानें डॉक्टर-साहेबांच्या मुलाकरितां दिलेली मेवामिठाई टांग्यांत होती. मुलांना ती मिठाई ते देऊं लागले. मुलांच्या घोळक्यांत एक नऊ-दहा वर्षांची नवीन मुलगी आज त्यांना दिसली. मुलीच्या चेहऱ्यावर व डोळ्यांत मनाला ओढून घेणारी विशेष प्रकारची मोहकता होती. इतर मुलांप्रमाणें तिच्याही-पुढें डॉक्टरांनीं मिठाई केली. पण मुलीनें संकोचपूर्वक ती नाकारली.

मिठाई नाकारणारें मूल हें डॉक्टरांनीं प्रथमच पाहिलें. एकाऐवजीं दोन लाडू घेऊन त्यांनीं तें तिला घेण्याचा आग्रह केला. तरीही तिनें नकार दिला. तेव्हां डॉक्टरसाहेबांनीं विचारलें—

"का बेटा ! मिठाई का घेत नाहींस ?"

"आज एकादशी आहे. आज कोणी मिठाई खातें का ?"

डॉक्टरसाहेब हंसून म्हणाले, "हीं इतकीं मुलं नाहीं का खात आहेत ?"

"पुरुष खाऊं शकतात. बायका नाहीं. माझी आजी म्हणते कीं एकादशीच्या दिवशीं अन्न खाऊं नये."

"तूं एकादशी करतेस ?"

"कां नाहीं ? आमची आजी म्हणते—आपले नेमधर्म पाळले पाहिजेत."

दिवसभराच्या सर्व कामांत डॉक्टर त्या मुलीला विसरून गेले. पण रात्रीं अंथरुणावर अंग टाकतांच त्या मुलीची त्यांना आठवण झाली. लज्जा व संकोचानें भरलेले ते तिचे डोळे, भोळा पण निश्चयी चेहरा, मिठाई न घेण्याचा तिचा निर्धार—डॉक्टरांच्या डोळ्यांसमोर सर्व चित्र उभें राहिलें.

* * *

मागून डॉक्टरांना कळलें कीं, ती बरीच लांब राहते. तिचा बाप एका मंदिराचा पुजारी होता. दान वर्षांपूर्वी मुलीचें लग्न झालें व सहाच महिन्यांत ती विधवा झाली. जुन्या रीतीप्रमाणें तिचे केस कापण्यांत आले. त्या कुटुंबांत दोन विधवा होत्या. एक पुजाऱ्याची आई व दुसरी ही अभागी मुलगी. आजीच्या आयुष्यांत गतकालांतल्या सुखद स्मृति ताज्याप्रमाणें अधूनमधून चमकून तिला सुखवीत होत्या; तर दुसरीच्या आयुष्यांत अंधःकारमय भविष्यकाळ आ पसरून उभा होता. समाधानाची गोष्ट इतकीच होती कीं, मुलीला परिस्थितीची अजून जाणीव नव्हती. वृद्धा व बालिका दोघींचीही दिनचर्या सारखीच कठोर व नियमबद्ध होती. यौवन आणि

संयम यांच्याबरोबर आयुष्यांत आपल्याला झगडावें लागणार आहे, याची त्या अल्पवयी मुलीला कल्पनाही नव्हती.

या गोष्टीला दहा वर्षें लोटलीं. त्या गांवाचे रोग आपल्या कर्तृत्वाला पुरेसे नाहींत असें पाहून डॉक्टर दुसऱ्या मोठ्या शहरांत प्रॅक्टिस करूं लागले. तिथें त्यांची प्रॅक्टिस खूपच वाढली. कारण गरीबांना व श्रीमंतांना त्यांचा सारखाच उपयोग होई.

मोठें शहर असल्यामुळें सार्वजनिक संस्थांनाही तोटा नव्हता. डॉक्टर मिश्रासारखी मनमिळाऊ व्यक्ति आपल्या संस्थेंत असावी, असें प्रत्येकाला वाटे. परंतु वेळेच्या अभावीं डॉक्टरांना तें शक्य होत नसे.

याच वेळीं शुद्धि आणि संघटनाचा प्रश्न जोरांत पुढें आला होता. शेंकडों वर्षें झोंपीं गेलेल्या हिंदु समाजाला आपली संख्या घटत असून मुसलमानांची अमर्याद वाढत आहे याची जाणीव होऊं लागली. असाच क्रम चालला तर दोनशें वर्षांत हिंदु नांवालाही राहणार नाहींत. सर्वच मुसलमान होतील. अशा विचारानें धर्मभ्रष्ट हिंदूंना पुन्हां धर्मांत घेऊन त्यांचें संघटन करण्याची आवश्यकता भासूं लागली. आर्यसमाजानें मोठी चळवळ करून कांहीं लोकांना शुद्ध करून घेतलें. समाजांत यामुळें मोठीच खळबळ माजली. कांहींना हें पसंत पडलें; तर पुराणमतवाद्यांना हा अधर्म वाटला.

मुसलमानही चेतून तक्रारी करूं लागले. डॉ. मिश्रांवर याचा कांहींच परिणाम होत नव्हता. हिंदु व मुसलमान त्यांच्याकडे सारख्याच भावानें येत. डॉक्टरही त्यांना समभावानें वागवीत. हिंदूंचें शुद्धिसंघटन व मुसलमानांचें बाटविणें त्यांना सारखेंच अन्यायाचें वाटे.

* * *

एक दिवस डॉक्टर दवाखान्यांत बसले असतां दिसायला साधारण परिस्थितीचा दिसणारा एक मुसलमान घाबऱ्या-घाबऱ्या त्यांना बोलवायला

आला. डॉक्टरसाहेबांनीं विचारल्यावर 'आपली पत्नी फार आजारी असल्याचें' त्यानें सांगितलें. गेल्या वर्षीं ती माहेरीं खेड्यांत बाळंत झाली. तिथें नीट काळजी न घेतली गेल्यानें ती आजारी झाली. तिला तो घरीं घेऊन आला होता. दिवसेंदिवस तिची प्रकृति बिघडतच होती. त्याच्या-बरोबर टांग्यांत बसून डॉक्टर रोग्याला पाहायला निघून गेले. एका गल्लीच्या तोंडाशीं टांगा थांबला. जरा पुढें रहमानचें घर होतें. घर कसें होतें?—समोर दोन-तीन ठिकाणीं फाटलेला तरटाचा पडदा होता. तो पडदा कोणींतरी विड्यानें रंगविला होता. समोर एक लहानशी खोली. बसण्या-उठण्याची व स्वयंपाकाचीही पण तीच जागा होती. रहमान विड्या करीत असे. पावसाळ्यांत विडीच्या कारखान्याचेंही रूप याच खोलीला ध्यावें लागे! स्वयंपाकघराच्या एका दरवाज्यांतून पलीकडे एक आणखी पडवी-सारखें दिसत होतें. तिकडून थोडी-थोडी घाणही येत होती. रहमान प्रथम आंत गेला. डॉक्टर बाहेरच उभे राहिले. रहमाननें बोलावल्यावर ते आंत गेले. त्यांना आंत आलेलें पहातांच अनोळखी पाहुण्याला भिऊन एक कोंबडी कुडकुड करीत पंख फडफडावीत बाहेर उडाली. डॉक्टरसाहेबांना बसण्याकरितां रहमाननें एक स्टूल ठेविलें. त्याची बायको खाटेवर निजली होती.

तिथली घाण आणि कुंद हवा पाहून डॉक्टर घाबरून गेले. डॉक्टरांनीं रोग्याला नीट तपासलें. पण अशक्ततेशिवाय त्यांना दुसरा कसलाच रोग आढळला नाहीं. ते म्हणाले, "यांना अशक्ततेशिवाय कसलाच आजार नाहीं. यांना तुम्ही पौष्टिक अन्न देतां ना?"

रहमान—ही खाईल तर ना? सांगून सांगून मी दमलों, ही कांहीं खातच नाहीं. दूध अन् साबुदाण्यानें कुठें शक्ति येते?

"कां बरं? खायला काय हरकत आहे?" डॉक्टरांनीं विचारलें.

"हरकत कसली डॉक्टर! 'पचणारच नाहीं' म्हणते."

डॉक्टर हंसून म्हणाले, " न पचायला काय झालं? सर्व कांहीं पचेल. "

" डॉक्टरसाहेब तुम्हीच तिला तें टॉनिक पाजा. कारण माझं ती कधींच ऐकणार नाहीं. येवढी कृपा कराच. "

डॉक्टर रहमानच्या पत्नीकडे वळून म्हणाले—

" माझ्यासमोर तें सूप घ्याल ना? पचण्याची हमी मी घेतों. "

तिनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. फक्त नकारार्थी मान हलविली. तिच्या चेहऱ्यावर लज्जा व संकोच हीं स्पष्ट दिसत होतीं. तिनें तोंड भिंतीकडे वळविलें होतें. डॉक्टरना तोंड दाखविण्याची तिची इच्छा नाहीं, हें स्पष्ट दिसत होतें.

डॉक्टर पुन्हां म्हणाले, " आज तुम्हांला माझ्यासमोर हें सूप घ्यावेंच लागेल. त्यापासून तुम्हांला बरें वाटेल. "

पुन्हां फक्त तिनें मान हालवून नापसंती दर्शविली. पण येवढ्यानें डॉक्टर निराश होणारे नव्हते. त्यांनीं रहमानला म्हटलें, " सूप तयार आहे? आणा, पाजा थोडें. "

रहमान वाटी उचलून स्वच्छ करण्याकरितां मागच्या बाजूला गेला. तेवढ्यांत ती स्त्री उठून अत्यंत कातर स्वरांत डॉक्टरांना म्हणाली, " डॉक्टरसाहेब, माफ करा. मी तें पिणार नाहीं. "

आवाज परिचित वाटला, आणि ते डोळे—त्यांतली ती आकर्षकता—डॉक्टर एकदम स्तंभित झाले. एक अस्पष्ट स्मृति त्यांच्या डोळ्यांसमोर उभी राहिली. एकदम त्यांच्या तोंडांतून उद्गार निघाला, " कां? "

भरून आलेले अश्रू आवरीत ती म्हणाली, " आज एकादशी आहे. "

डॉक्टरसाहेब चमकून उठले. विस्फारित नेत्रांनीं ते तिच्याकडे बघतच राहिले!

त्या दिवसापासून डॉक्टर शुद्धि व संघटनाचे पक्षपाती झाले.

● ● ●

स्त्रियांच्या दवाखान्यांतील एका वॉर्डमधल्या दोन स्त्रियांना एकाच दिवशीं मुलें झालीं. खोली नं. ५ मध्यें राधेश्यामजींची पत्नी मनोरमा हिला दुसरा मुलगा झाला होता. ती बाळंतरोगानें आजारी होती. तिची स्थिति कठीण असून ती घटका मोजीत होती. खोली नं. ६ मध्यें कुंतलाचे आईला ६ वी मुलगी झाली होती. बाळ-बाळंतीण खुशाल होती. घरांत दुसरें कोणी नसल्यानें कुंतलाच आईची व्यवस्था पहात होती. तिचे वडील एका कचेरींत नोकर होते. त्यांना पत्नीकडे जायला वेळच नव्हता.

पंडित राधेश्यामजी-ॲडव्होकेट, आई आणि नोकर असूनही पत्नीला सोडून जात नव्हते. अकरावे दिवशीं कुंतलची आई घरीं गेली, आणि त्याच दिवशीं राधेश्यामच्या पत्नीचा अंत झाला. आपल्या मातृविहीन अर्भकाला घेऊन ते घरीं आले. पत्नीशिवाय घर त्यांना उदास वाटूं लागलें.

* * *

पत्नीच्या मृत्यूनंतर लग्न न करण्याचा राधेश्यामनीं दृढ-निश्चय केला होता. मनोरमेवर त्यांचें अत्यंत प्रेम होतें. तिनें राधेश्यामच्या स्वाधीन केलेली आपली प्रतिकृति हाच त्यांच्या जीवनाचा आधार होता. 'या मुलाचें

पालनपोषण करण्यांत व मनोरमेच्या मूर्तीच्या पूजन-चिंतनांत मी माझें आयुष्य घालवीन' असें ते म्हणत. ज्या हृदयमंदिरांत एकवेळ मनोरमेची पवित्र मूर्ति स्थापन केली त्या ठिकाणीं दुसरीला जागा नव्हती. घराबद्दल त्यांच्या मनांत विरक्ति उत्पन्न झाली. बाहेर-बाहेरच ते वेळ घालवीत. घरांत फार क्वचित् लक्ष घालीत. प्रत्येक वस्तु मनोरमेची स्मृति जागृत करीत असे. मनोरमेच्या खोलीला कुलूप लावून ठेवलें होतें. मनोरमा बाहेर पडल्या दिवसापासून त्यांनीं त्या खोलींत प्रवेश केला नव्हता. जीवन त्यांना भकास वाटत होतें. येणाऱ्या-जाणाऱ्यांना ते संसाराची असारता व देशाची क्षणभंगुरता पटवीत असत. कचेरींतही त्यांचें मन लागत नसे. जें काम ५० रु. त करावयाचें तें ते पंचविसांतही करून देत. गरिबांचे खटले तसेच चालवीत. 'पैशाच्या मागें लागून हाय हाय करण्यांत काय अर्थ आहे?' असा ते विचार करीत. कसं तरी आयुष्य ढकलायचं, या वृत्तीनें ते राहत असत.

दुसऱ्या लग्नाची गोष्ट काढतांच होणारा त्यांचा गंभीर चेहरा पाहून कोणाला ती गोष्ट काढण्याचें धैर्य होत नसे. त्यांच्या आईनें त्यांना अनेक-वेळां सांगून पाहिलें. पण त्यांचा निश्चय रतिमात्र ढळला नाहीं. एक दिवस मुलाच्या लग्नाची काळजी मनांत घोळवीत तिनें जगाचा निरोप घेतला!

या प्रसंगानंतर कांहीं दिवसांनीं राधेश्याम सकाळच्या वेळीं आपल्या मित्रांशीं गप्पा मारीत बसले होते. अंगणांत त्यांचा मुलगा हरिहर नोकरा-बरोबर खेळत होता. समोरून एक टांगा जात होता. एकदम त्या टांग्याचें एक चाक निघून गलें व टांगा तसाच घांसत पुढें जाऊं लागला. एक सात-आठ वर्षांचा मुलगा टांग्यांतून खालीं पडला. आणि एक मुलगी—बहुधा मुलाची मोठी बहीण असावी—पडतां पडतां सावरून दुसऱ्या बाजूला जाऊन उभी राहिली. मुलाला बरेंच लागलें होतें. मुलीनें आपले भयभीत सुंदर नेत्र मदतीस सभोंवार फिरविले आणि ती आपल्या भावाला उठवूं

लागली. राधेश्याम तें पाहिल्याबरोबर धांवत आले व मुलाला उठवूं लागले. राधेश्यामचे एक मित्र जगमोहनही लगेच धांवत बाहेर आले आणि त्या मुलीकडे पाहून म्हणाले,

" कुठें जात होतीस कुंतला ? "

" मावशीच्या घरीं आई संजीला गेली आहे. तिकडेच मी जात होतें. " कुंतला लाजून म्हणाली.

कुंतलला पाहतांच राधेश्यामच्या मनांत एक स्मृति जागृत झाली. दुसरा टांगा बोलावून त्या मुलांना त्यांत बसवून दिल्यावर ते घरांत गेले.

* * *

एक दिवस बोलतां बोलतां राधेश्यामनीं जगमोहनला विचारलें, " त्या दिवशीं टांग्यांतून पडलेली मुलगी कोणाची होती ? "

"ती पंडित नंदकिशोर तिवारी यांची कन्या असून शिकलेली, गृहकार्यांत दक्ष व सुंदर आहे. महिना पनास रुपयांत संसार चालवून मुलीला हुंडा देणें शक्य नसल्यानें ती अजून अविवाहित राहिली आहे. आपल्या समाजांत हुंड्याशिवाय लग्न होणें शक्य नाहीं. एवढा मोठा परिवार संभाळून बिचारा दोन-तीन हजार रुपये कुठून आणील ? मुलगी शहाणी, शिकलेली— एखाद्या सूर्खाच्या गळ्यांत बांधायची आहे थोडीच ! " अशी माहिती जगमोहन यांनीं दिली.

' तिवारीवर उपकार करण्याची संधि बांया घालवूं नये ' असा एक विचार राधेश्यामच्या मनांत येऊन गेला. पण मनोरमेच्या स्मृतीनें तो विचार तिथेंच थांबला. तिवारीवर उपकार म्हणजे मनोरमेला विसरणें, हाच अर्थ होता. यामुळें जेव्हां जेव्हां 'तिवारीकन्या' हे शब्द कानावर पडत तेव्हां ते मान हालवून त्या विचाराला बजावीत, "असं होणं शक्य नाहीं." आजही त्यांची अस्वस्थ मनःस्थिति जगमोहननीं ओळखली होती. हीच

वेळ आपलं घोडं दामटायला ठीक आहे असं पाहून जगमोहननीं आघात केला.

जगमोहन—तुला कसं वाटतं राधेश्याम ? मुलगी सुंदर आहे नाहीं ? पण बिचारीला नवराच मिळत नाहीं. तूंच करून घेतलीस तर काय हरकत आहे ?

राधेश्याम—मुलगी सुंदर आहे खरी. पण मीं तर लग्न न करण्याची प्रतिज्ञा केली आहे.

जगमोहन उत्सुकतेनें म्हणाले, "जाऊं दे रे ! पत्नीच्या मरणानंतर असं स्मशानवैराग्य सगळेच घेतात. त्याचा अर्थ असा नव्हे कीं, नंतर कोणी लग्न करीत नाहीं. जन्म-मृत्यु जीवनांत हातांत हात घालूनच वावरत असतात. जन्मामागें मृत्यु ठेवलाच आहे. दुःख कोणाला होत नाहीं ? पण त्या दुःखामुळें कांहीं कोणी वैरागी होत नाहीं. तुझं वय तरी असं काय आहे ? पस्तीस-छत्तीसच कीं नाहीं ? जन्मभराची गोष्ट आहे ही ! स्त्री-शिवाय घराला कळा तरी असते का आमच्या वज्रेशची आई चार दिवस माहेरीं गेली तर घर कसं खायला धांवतं !"

राधेश्याम—तें जाऊं दे ! घराशीं मला आतां काय करायचं आहे. मनोरमेबरोबरच माझं घर संपलं. या मुलांची जोपासना कोण करील ? येवढीच मला काळजी आहे. आई होती तोंपर्यंत ठीक होतं. आतां त्यांना पहायला कोणीच नाहीं. नोकरांवर विसंबणं शक्य नाहीं. मी काय करूं शकणार ! तूंच विचार कर. मुलं त्यामुळें दिवसेंदिवस खराब होताहेत.

* * *

राधेश्यामचा विवाह कुंतलबरोबर झाला. त्यांच्या संसाराला पुन्हां बहार आला. मनोरमेच्या खोलीचें कुलूप निघून तिच्या फोटोवर एक रंगीत पडदा सोडला गेला. नूपुरांचा मधुर आवाज पुन्हां घरांत ऐकायला येऊं लागला. चतुर गृहिणीचा हात फिरल्यानें घराचें नंदनवन झालें.

कुंतलच्या कार्यकुशलतेवर व कुशाग्रतेवर राधेश्याम मुग्ध झाले होते. कुंतलेच्या प्रेमप्रकाशामुळें त्यांचें अंतःकरण उजळून गेलें. आतां तिथें मनोरमेची अंमळसुद्धां आठवण शिल्लक नव्हती. ते पूर्ण सुखी होते.

* * *

हरिहरला संभाळण्याकरितां नाइलाजानें राधेश्यामनीं कुंतलशीं लग्न केलें. पण तिला हरिहरपेक्षां राधेश्यामचीच तैनात जास्त करावी लागे. त्यांची मर्जी संभाळतां संभाळतां ती इतकी थकत असे कीं, हरिहरकडे बघायलाही तिला वेळ मिळत नसे.

आयुष्याच्या उतरणीला लागलेल्या राधेश्यामला सुंदर व तरुण पत्नीच्या यौवनानें बाजवीपेक्षां अधिक असावध केलें होतें.

प्रत्येक बऱ्यावाईट गोष्टीला मर्यादा असते. राधेश्यामच्या वर्तनानें कुंतलला मनोयातना होत. त्याचा परिणाम तिच्या प्रकृतीवरही झाला. तिचा सुंदर वर्ण लोपून पिवळा पडला. डोळे निस्तेज झाले. सहा महिन्यांच्या आजाऱ्यासारखी ती दिसायला लागली. स्वभावतःच ती नाजूक व सुकुमार होती. चालतांना तिचे पाय कांपत ! नेहमीं तिचे हातपाय दुखत. उत्साह वाटेनासा होई. निजली तर उठण्याची शक्ति नाहींसें वाटे. ही कुंतलची अवस्था राधेश्यामला ठाऊक होती—लक्ख दिसत होती. पण ते एकपत्नीव्रती सच्चरित्र पुरुष होते. करणार तरी काय ? कधीं कधीं त्यांना पश्चात्ताप होत असे. पण नाइलाज होता.

असं म्हणतात कीं, मध्यम वयांत दुसरेपणाची सुंदर बायको मनुष्याला वेडा करते. तसाच कांहींसा हा प्रकार होता.

पण ती राधेश्यामला कोणत्या तऱ्हेनें अडवणार ! ती त्याची विवाहित पत्नी होती. सात पावलें तिच्याबरोबर फिरल्यानंतर तिची पूर्ण मालकी त्यांना मिळाली होती.

* * *

कांहीं दिवसांपासून त्या शहरांत एक महिलासमाज स्थापन झाला होता. एक दिवस त्यांपैकीं कांहीं स्त्रियांनीं येऊन कुंतलला निमंत्रण दिलें. कुंतलला वाटलें या निमित्तानें तरी घरांतून घटका दोन घटका सुटका मिळेल. बाहेरच्या जगाचें दर्शन होईल. त्यांच्या निमंत्रणाचा फायदा घेऊन ती समाजांत गेली. बऱ्याचशा स्त्रियांचीं भाषणें तिनें ऐकलीं. तिला वाटलें आपण या सर्वांपेक्षां जास्त लिहूं व बोलूं शकतों. घरीं येऊन तिनें 'भारताच्या संस्थांच्या सामाजिक जीवनांत स्त्रीचें स्थान' या विषयावर एक निबंध लिहिला. राधेश्यामनीं तो लेख पाहिला. त्यांना फार आवडला. बाहेर मित्रमंडळी होती, त्यांना दाखवला. सर्वांनीं कुंतलच्या भाषाशैलीची तारीफ केली. राधेश्याम खूष झाले.

आपले एक साहित्यिक मित्र अखिलेश्वर यांना घेऊन राधेश्याम घरांत आले व कुंतलला हांक मारून म्हणाले, "कुंतला, तुझा लेख फार चांगला आहे. तुला इतकं चांगलं लिहितां येतं हें ठाऊक असतं तर मीं तुला नेहमीं आग्रह करून लिहून घेतलं असतं. थोडी भाषा सुधारावयाला हवी. माझे हे मित्र ती ठीक करून देतील. तूं आतां रोज लिहीत जा, व हे लेख सुधारून देत जातील. मला भाषेचें फारसें ज्ञान नाहीं. नाहींतर मींच मदत केली असती. हाही आपल्या घरचाच आहे. कुंतलाच्या लेखनाचा भार अखिलेश्वराकडे सोंपवून राधेश्याम निश्चित झाले.

ज्या प्रकारच्या मित्राची कुंतलला आवश्यकता वाटत होती तसा मित्र आतां तिला मिळाला होता. घराबाहेरच्या जगाचें ज्ञान तिला त्याच्याकडून मिळूं शकत होतें. प्रथितयश लेखक व कवींच्या कलाकृतींचा आस्वाद त्याच्या मदतीनें तिला मिळत होता. आपले जीवनांतले कष्ट ती अखिलेश्वरच्या सहवासांत विसरत होती. तिच्या आयुष्यांतला नीरसपणा नाहींसा झाला. दिवसांतून एकवेळ तरी दोघांची भेट होत होती. दोन साहित्यिक मित्रांप्रमाणें तीं गप्पागोष्टी करीत. कुंतलाच्या लेखनशैलीवर आणि असाधारण

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम.....आहुति

प्रतिभेवर अखिलेश्वर खूष होते. तिच्या प्रतिभेला विकसित करण्याचा ते सतत प्रयत्न करीत. वाचनालयांतून चांगलीं चांगलीं पुस्तकें आणून ते तिला वाचून दाखवीत. शेले, कीटस्, महाकवि शेक्सपियर वगैरेंच्या कविता आणून ते तिला समजावून देत. हिंदी कवींच्या कवितांचें अध्ययन ते तिच्याकडून करून घेत असत. तिची प्रतिभा कवितेकडे वळावी अशी त्यांची फार इच्छा होती. गद्यापेक्षां पद्य ती फार चांगलें लिहील असें वाटत होतें. पण अखिलेश्वरांचा कुंतलेशीं वाढणारा सहवास आतां राधेश्यामना अस्वस्थ करूं लागला. कुंतलाच्या रूपावर भाळून हा इतका वेळ बसतो, असें त्यांना वाटूं लागलें. पण ते बोलूं शकत नव्हते. कारण त्यांनींच अखिलेश्वरला घरांत येण्याची मुभा दिली होती. कुंतला राधेश्यामना ओळखून होती. ती जपूनच वागत असे. चुकून जरी तिच्या तोंडून अखिलेश्वरचें नांव निघालें तरी राधेश्यामचें मन मत्सरानें जळत असे. त्यांच्या मनांत आतां अखिलेश्वराबद्दल असूया उत्पन्न झाली होती.

याच वेळीं कुंतलनें कांहीं कविता केल्या. भावना व कल्पनांचा सुंदर मिलाफ त्या कवितांत दिसून येत होता. शब्दपंक्ति मात्र असाव्या तितक्या चांगल्या नव्हत्या. आपल्या हातानें लावलेल्या रोपट्याला फुलें आलेलीं पाहून माळ्याला जसा आनंद होतो, तसा आनंद कुंतलाची कविता पाहून अखिलेश्वरला झाला. त्यांनीं ती कविता राधेश्यामला दाखविली व कुंतलेच्या बुद्धीचें कौतुक केलें, पण राधेश्याम कांहींच बोलले नाहींत. कुंतलेनें अखिलेश्वरामुळें होणाऱ्या विरहावर कविता केल्या असल्या पाहिजेत, अशी त्यांनीं आपली समजूत करून घेतली.

अखिलेश्वर निष्कपटपणानें कुंतलला शिक्षण देत होते. तिला तयार करण्यांत त्यांना एवढेंच समाधान होतें कीं, आपण एक चांगली साहित्य-सेविका तयार करीत असून तिच्याकडून उत्तम साहित्य निर्माण होऊं शकेल. यापेक्षां अधिक स्वार्थ त्यांच्या मनांत नव्हता. राधेश्यामच्या मनांत

उत्पन्न होणाऱ्या मत्सराचा त्यांना पत्ताही नव्हता. कारण त्यांचें हृदय पवित्र–निर्मल–होतें.

बरेच आजारी असल्यानें अखिलेश्वर घराबाहेर पडूं शकले नाहींत. अंथरुणावर एकटेंच पडून राहतांना त्यांना अनेक वेळां कुंतलची आठवण होई. पुष्कळदां तिला बोलावणें पाठवावें असें त्यांना वाटे, पण तो विचार अंमलांत आला नाहीं. पुष्कळ दिवसांत कांहींच बातमी न कळल्यानें कुंतलाही काळजींत होती. तिला सारखें वाटे, एकाएकीं ते कां बरें येईनासे झाले ? राधेश्यामला अखिलेश्वरच्या बाबतींत विचारण्याचें तिला धैर्य होत नव्हतें. एक दिवस कुंतलाच्या आईनें तिला बोलावणें पाठविलें. 'टांगा येईल त्यांतून तूं आईकडे जा,' असें सांगून राधेश्याम कचेरींत निघून गेले. आईकडून दुपारीं तीन वाजतां कुंतला परत येत असतां वाटेंत तिला अखिलेश्वराचा नोकर भेटला. 'अखिलेश्वर बरेच दिवसांपासून आजारी असून अजूनही घराबाहेर पडूं शकत नाहींत' असें त्यानें सांगितलें. कुंतलेच्यानें राहवेना. अखिलेश्वराच्या घराजवळ टांगा येतांच ती उतरली व आंत गेली. बरोबर तिची लहान बहीण होतीच. अचानक आपल्याकडे कुंतला आलेली पाहून अखिलेश्वरला आश्चर्य व आनंद वाटला. पलंगाजवळच तिला बसायला खुर्ची देऊन खाटेवरून उठत ते म्हणाले, "कुंतला, तूं कशी आलीस ? आजारीपणांत मीं तुझी फार आठवण काढली !"

याच वेळीं राधेश्यामनीं खोलींत प्रवेश केला. कुंतला कांहींच बोलली नाहीं. राधेश्यामना पाहतांच अखिलेश्वर म्हणाले, "ये ! ये ! राधेश्याम ! आज कुंतला आली. तूंही आलास. आज आठ दिवस मी तुमची सारखी आठवण करतों आहें. तुम्ही कोणीच आलां नाहींत." नंतर घड्याळाकडे पहात ते म्हणाले, "आज कचेरींतून तीन वाजतांच कसा आलास ?"

राधेश्यामनीं स्पष्टपणानें उत्तर दिलें, "काम नव्हतं फारसं म्हणून आलों." नंतर पत्नीकडे वळून म्हणाले, "चलतेस ? मी निघालों !"

अखिलेश्वरनीं नंतर थांबण्याचा पुष्कळ आग्रह केला, पण त्यांनीं ऐकलें नाहीं. त्यांच्या मागोमाग कुंतलाही गेली. जातांना तिनें अखिलेश्वराकडे अशा नजरेनें पाहिलें कीं, त्यांत असीम करुणा, विवशता आणि कातरता भरलेली होती. कुंतला निघून गेली. पण तिच्या त्या दृष्टिक्षेपानें त्यांच्या डोक्यांत प्रकाश पडला. राधेश्यामच्या मनांतील भावना आतां त्यांना कळल्या.

घरीं आल्यावर कुंतला कांहींच बोलली नाहीं. स्वयंपाकघरांत निघून गेली. कांहीं वेळानें ती बाहेर आली तेव्हां तिला दिसलें कीं, तिचे सर्व लेख, कविता, वह्या, पेन्सिली आणि अखिलेश्वरांनीं तिला भेटीदाखल दिलेलें फाऊंटन या सर्वांना कोणींतरी आग लावून दिली होती ! त्याच अग्नींत दिवाणखान्यांत शोभणारें अखिलेश्वरांचें चित्र धुमसून जळत होतें. वर जाणारीं धुराचीं वर्तुळें जणुं सांगत होतीं कीं, 'कुंतला, ही तुझ्या साहित्यिक जीवनाची चिता आहे ! ! '

● ● ●

"'कां रडतेस !' असं विचारून जखमेंत मीठ भरूं नका. जरा थांबा, पोट भरून रडून घेऊं द्या. कितीतरी दिवसांनीं आज मनमोकळं रडतां येत आहे. रडण्यांनीं मला शांतता मिळते—सुख मिळतं. म्हणून मी रडतें. मला अडवूं नका. रडूं द्या."

"काय म्हणालांत ? 'कशाकरितां रडतेस ?' तें ऐकून काय कराल ? त्यापासून तुम्हांला कांहीं फायदा नाहीं. म्हणून न विचाराल तर बरं. या यातना ही माझी संपत्ति आहे. त्या मीं आपल्या हृदयांत नीट जपून ठेवल्या आहेत. याउपर तुम्हांला ऐकायचंच असेल तर सांगतें. पण लक्षांत ठेवा ! जें सांगेन तेवढंच ऐका. जास्त विचारूं नका."

ते एक श्रीमंत मातापित्यांचे पुत्र होते. परमेश्वरानं त्यांना अनुपम रूप दिलं होतं. शरिराइतकंच त्याचं मनही सुंदर होतं. ते दयाळू, सुस्वभावी आणि उदार होते. गांवांतील लहान मुलं त्यांना पाहतांच खूष होत. म्हातारीं माणसं आशिर्वादाचा वर्षाव करीत. स्त्रिया त्यांना आपला हितचिंतक बंधु मानीत. युवक त्यांच्या साहाय्यानें कामें करीत. सारांश, सर्वांचे ते मित्र होते. सर्वांशीं त्यांचा स्नेह होता.

मी त्यांच्याच गांवांत राहात होतें. माझे पति प्राथमिक शाळेंत शिक्षक

होते. घरांत म्हातारी सासू आणि आम्ही दोघं अशीं तीन माणसें होतों. महागाईचे दिवस. २८ रुपयांत कसातरी संसार चाले. घरांत सर्व कामें हातांनींच करावीं लागत.

मी नुकतीच लग्न होऊन आलें त्या वेळची गोष्ट. शहरांतली मुलगी मी ! नेहमीं नळाशीं व्यवहार. विहिरीचें पाणी काढणं मला कसं ठाऊक असणार ! माझी सासू मला विहिरीचें पाणी ओढणें शिकवीत होती. अचानक ते कुठून तरी आले व म्हणाले, "काय पाणी भरण्याचं शिक्षण देतां आई ! तुम्ही अशी मुलगी करून आणली कीं तिला पाणीही भरतां येत नाहीं." मी ओढणीआडून जराशी हंसलें.

* * *

दुसरे दिवशीं मला एकटीलाच पाणी भरायला जावं लागलं. मी दोर-पोहरा घेऊन विहिरीवर गेलें. पण काळीज धडधडत होतं. पाणी काढतां येईल कीं नाहीं अशी भीति वाटत होती. बरोबर कोणी नव्हतं. मीं ओढणी काढून घेतली. पोहऱ्याला दोर लावून विहिरींत सोडला. पोहरा भरल्यावर ओढायला लागलें, पण ओढलाच जाईना. कसं तरी करून अर्धी दोरी ओढली, तों ते समोरून येतांना दिसले. त्यांच्या बंगल्याकडे जाणारा रस्ता तिथूनच होता. त्यांना येतांना पाहून घुंगट ओढण्याकरितां एक हात सोडला. पण एका हाताला तें वजन संभाळतां आलें नाहीं ! झटक्यासरशीं दोर व पोहरा विहिरींत पडला. मीही पडतां पडतां वांचलें. एक मिनिटांत हा सर्व प्रकार घडला. तोंपर्यंत ते विहिरीपर्यंत येऊन पोंचले होते. मी घाबरून गेलें. पदर ओढण्याचें भान राहिलें नाहीं. वांकून विहिरींत पाहूं लागलें. मी दोर-पोहरा तर काढूं शकत नव्हतें. निरुपायानें मीं त्यांच्याकडे पाहिलें. माझी अवस्था पाहून त्यांना दया आली. जवळ येऊन म्हणाले, "घाबरूं नका. मी आतां दोर-पोहरा काढून देतों." जरा हंसून ते

म्हणाले, " मात्र यावरून तुम्ही एक शहरची पोक्राखी मुलगी आहांत हें सिद्ध केलंत."

मीं हंसून घुंगट जरा पुढें ओढला. तें पाहून ते हंसले. त्यांच्या नोकरांनीं येऊन पाहतां पाहतां दोर-पोहरा काढून दिला. घागर उचलून मी घराकडे गेलें. शब्दांनीं नाहीं, पण माझ्या कृतज्ञतापूर्ण नजरेनें त्यांना सांगितलें, 'या तुमच्या उपकाराची फेड मी या जन्मांत करूं शकणार नाहीं.' जवळ-जवळ पाऊण तास विहिरीवर मोडला. सासूच्या रागावण्याची भीति होतीच. लवकर लवकर येऊन मीं घागर तिपाईवर ठेवली आणि दोर खुंटीवर ठेवण्याकरितां हात उंच करते तर हातांत सोन्याची बांगडी नाहीं. तुम्ही म्हणाल पाणी भरणारणीच्या हातांत सोन्याची बांगडी कशी ? त्यावर माझं उत्तर असं कीं, या बांगड्या मला आईनं दिल्या होत्या. मरायच्या वेळेला त्या बांगड्या लग्नांत मला द्याव्या, असें आईनें सांगितलें होतें. दोरी ठेवून धांवतच विहिरीवर गेलें. समोरून ते येत होते. त्यांनीं " ही तुमच्या घाबरटपणाची दुसरी खूण ! " असें म्हणून ती बांगडी माझ्या हातांत दिली. बांगडी घेऊन मी गुपचूप घरीं आलें.

* * *

घरीं येऊन पाहिलें तर शाळेतून ते घरीं आले होते. आई रागारागानें बोलत होती.

" पाहिलीस बायकोचीं लक्षणं. एक घागर पाणी भरायला गेली. ती तासांनीं परत आली ! घागर ठेवून पुन्हां वेड्यासारखी धांवत गेली. मीं पाहातांक्षणीं सांगितलं होतं कीं, शहरची मुलगी करूं नकोस. पण तूं ऐकलं नाहींस. घर निघण्याचीं लक्षणं आहेत हिचीं. त्या जमीनदाराच्या मुलाशीं बोलण्याची हिला काय जरूर ! ही इकडून धांवत जात होती. तो तिकडून धांवत येत होता. कोणाला ठाऊक त्यांनीं हिला काय दिलं तें ! खिशांत ठेवलं. मला कांहीं हें आवडत नाहीं. इतक्याउप्पर तुझी बायको

आहे. काय वाटेल तें कर.'' माझ्याकडे रागानें पाहून त्या म्हणाल्या, '' दाखव बरं तुझ्या खिशांत काय आहे तें ! ''

मीं बांगडी काढून त्यांच्यासमोर ठेवली. त्या पुन्हां दटावून म्हणाल्या, '' ही त्याच्याजवळ कशी गेली ! ''

मीं गुन्हेगाराप्रमाणें घाबरत घाबरत सर्व हकीगत सांगितली. यानंतर मायलेकांचीं टोंचून बोलणीं सारखींच मला ऐकावीं लागलीं. त्याबरोबरच त्यांच्याबरोबर पुन्हां न बोलण्याची ताकीदही दिली गेली.

त्याचं नांव विचारतां ? त्याचं नांव ! कशाला विचारतां ? राहूंद्या ना. विचारूं नका मला ! त्याचं नांव उच्चारण्याचा मला काय अधिकार आहे ? तुम्हांला फक्त माझी कहाणीच ऐकायची आहे ना ? काय बरं मी सांगत होतें ? मला सांगण्यांत आलं होतं कीं, जर मी पुन्हां त्यांच्याशीं बोलल्याचं कळलं तर बरी गत नाहीं. मीं लीनतेनें म्हटलें, '' मी घरांतलं सर्व काम करीन. पण उद्यांपासून मी पाणी भरणार नाहीं.''

यावर पतिदेव गरजले; '' तूं पाणी भरायला जाणार नाहींस तर राणी बनवून मी तुला ठेवूं शकत नाहीं. इथं आम्हीं सांगूं तसं तुला केलं पाहिजे.''

काय सांगूं त्यानंतर काय झालं तें ? जों जों त्यांच्याशीं भाषण करण्याची बंदी होत गेली, तों तों त्यांच्याशीं एक वेळ तरी बोलण्याची माझी उत्कंठा वाढत गेली. पण ही माझी इच्छा पूर्ण झाली नाहीं. ते जातां जातां थोडंसं बोलून जात. मीही उत्तरादाखल नुसती हंसत असें. पण लोकांना हेंही सहन झालं नाहीं. एकाचे दोन होत असत.

घरांत आतां माझ्यावर सर्व प्रकारचे अत्याचार होऊं लागले. दोन-तीन दिवसांआड मार मिळूं लागला. पण मी तरी काय करणार ? मी त्यांच्याशीं बोलत सुद्धां नव्हतें. त्यांचं बोलणं बंद करणं मला शक्य नव्हतं. अनुचित असं ते कधींच कांहीं बोलत नाहींत. रडणाऱ्यांना हंसविण्याची कला त्यांना अवगत होती. अशा तऱ्हेनें ते बोलत. विनोद सुद्धां इतका

सभ्य–मोजून मापून–असे कीं, कितीही दुःख झालें तरी हंसूं आल्याशिवाय रहात नसे.

हळूंहळूं माझ्या परिस्थितीची जाणीव त्यांना झाली. त्यांच्या मृदु मनाला त्यामुळें अत्यंत दुःख झालें. त्या दिवशीं मी पाणी भरायला गेलें असतां ते आले आणि म्हणाले, "मला तुम्हांला कांहीं सांगायचें आहे."

त्यांच्या आवाजांत व्यथा, शब्दांत माधुर्य आणि डोळ्यांत करुणेचा सागर उसळत होता. मीं आश्चर्यचकित होऊन त्यांच्याकडे पाहिलें. आज प्रथमच अशा तऱ्हेनें बोलतांना मी त्यांना पहात होते. ते म्हणाले, "पहिली गोष्ट अशी कीं, माझ्यामुळें तुमचा छळ होतो असं मला कळलं असतं तर मी तें कधींच बंद करूं शकलों असतों. दुसरी गोष्ट मी तुम्हांला सांगायला आलों ती ही कीं, तुमच्या छळाचं मूळच मी नाहींसं करतों. तुम्ही सुखांत रहा. जर मी तुम्हांला विसरूं शकलों तर पुन्हां परत येईन. नाहींतर आज मी तुमचा कायमचा निरोप घेतों."

माझ्यावर जणुं वज्राघात झाला. मी कांहीं बोलूंही शकलें नाहीं. ते लगेच निघून गेले. आतां माझी अवस्था पूर्वीपेक्षां दमनीय होती. माझं कशांतच मन रमेना. हृदयांत आग पेटली होती. पण मला रडायचा हक्क नव्हता. आतां तर सर्व लोक मला वेडी म्हणतात. मीं कांहीं केलं तरी कोणी मला अडवत नाहीं. म्हणूनच मी मनमोकळेपणानें रडतें आहें. आणि तुम्हांला ही आपली कर्मकथा सांगूं शकतें. तुम्ही सांगूं शकाल ते कुठें आहेत तें ? फक्त एकवेळ त्यांना पाहण्याची माझी इच्छा आहे.–ही माझी कथा–हा उन्माद–त्यांनींच मला दिला आहे. जर कोणी सज्जन सहृदय मला त्यांचा पत्ता सांगेल तर त्यांची ही भाची त्यांच्या स्वाधीन करीन.

● ● ●

त्या आंबराईत श्रावण लागतांच जो झोपाळा बांधला जाई तो विजयादशमीपर्यंत तसाच असे. सकाळ, संध्याकाळीं मुलें आणि रात्रीं युवति त्या झोपाळ्याची शोभा वाढवीत असत. सत्याग्रहाची मोहीम जेव्हां पूर्ण भरांत होती, त्या दिवसांतली गोष्ट आहे. साऱ्या भारतवर्षात रणकुंड पेटलें होतें. दडपशाही जोरांत तांडव करीत होती. गोळीबार, लाठीहल्ला, धरपकड यांशिवाय वर्तमानपत्रांत दुसरी बातमी नव्हती. या गांवातही हे प्रकार सुरूं झाले होते. कॉंग्रेसचे अध्यक्ष व मंत्री पकडले गेले होते.

त्या दिवशीं राखीपौर्णिमा होती. आपल्या भावांना बहिणी नेहमीं याच आंबराईत राखी बांधीत असत. इथें सर्व लोक एकत्र जमून सण साजरा करीत. प्रथम मुली आपापल्या भावांना कांहीं उपहार देत. नंतर गळ्यांत माळा घालीत आणि हातांत नारळ देऊन कपाळाला कुंकवाचा टिळा लावीत व राखी बांधीत. राखी बांधतांना त्या म्हणत, "या राखीची लाज संभाळा. समरांगणांत कधीं पाठ दाखवूं नका."

एकीकडे राखीचें हें मनोवेधक दृश्य दिसत होतें, तर दुसरीकडे लहान मुलें झोपाळ्यावर झोके घेत होतीं. त्यांच्या सुकुमार हृदयांतही देशप्रेमाचीं

रोपटीं जीव धरूं लागलीं होतीं. देशाकरितां पराक्रम करून फांसावर जाण्यांत खरा गौरव आहे, असें त्यांना वाटत होतें. मुली कांहीं गाणीं म्हणत होत्या. इतक्यांत एक मुलगा म्हणूं लागला—

झेंडा ऊंच्या रहे हमारा

सगळीं मुलें त्याला साथ देऊन जोरानें म्हणूं लागलीं—

" झेंडा ऊंच्या रहे हमारा."

* * *

ही वार्ता ठाकूरसाहेबांना समजली. आंबराई त्यांची होती. आतां तीन महिन्यांपूर्वीच ते रायसाहेब झाले होते. ऑनररी मॅजिस्ट्रेट असून त्यांच्यावर सरकारची कृपा होती. तेव्हां त्यांनीं ऐकलें कीं, आंबराईत असहयोगी सेनेचा मेळावा जमला असून रोजच ते लोक तिथें येतात. तेव्हां ते घाबरले. ताबडतोब घोड्यावर स्वार होऊन आंबराईकडे निघाले. ते येण्यापूर्वीच पोलिस येऊन पोंचले होते. ठाकूरसाहेबांना पाहातांच दरोगा लियाकत-अल्ली रागावून म्हणाला, " ठाकूरसाहेब ! आपल्याकडून अशी अपेक्षा केली नव्हती. तुम्ही त्यांच्यांतलेच आहांत असं दिसतंय. तुमच्याच परवानगीनें हें सर्व होतंय वाटतं. पण हें तुम्हांला शोभत नाहीं. पांच मिनिटांत या लोकांना हाकलून द्या. नाहींतर आम्हांला लाठ्या चालवाव्या लागतील."

ठाकूरसाहेब नम्रतेनें म्हणाले, " जरा थांबा. मी सर्वांना बाहेर काढतों. तुम्हांला लाठी चालवण्याचं काम पडणार नाहीं. " साहेबांचा पारा ११०° वर होताच. ते तावातावानें म्हणाले, "दहा मिनिटांत जागा रिकामी झाली नाहीं, तर मी ताबडतोब लाठ्या चालवीन. " ठाकूरसाहेबांनीं आंबराईत प्रवेश करतांच त्यांचा सात वर्षांचा नातू विजय हातांत लांकडी तरवार घेऊन त्यांच्यासमोर येऊन उभा राहिला. ठाकूरसाहेबांना उद्देशून तो म्हणाला—

" दादा ! पहा माझ्याजवळही तरवार आहे. मीही वीर होईन. "

इतक्यांत त्याची नऊ वर्षांची बहीण कांती गुलाबी रंगाची साडी नेसून सजलेली ठाकूरसाहेबांना म्हणाली, "दादा! हा विजय लांकडाची तरवार घेऊन मोठा पराक्रम करायला निघाला आहे. मी तर दादा, स्वराज्याकरितां काम करीन. सांगा दादा! मी देशभक्त होईन कीं हा लांकडी तरवारवाला?"

विजयच्या तरवारीचा पहिला वार कांतीवरच झाला. तो कांतीकडे रागावून पहात म्हणाला—

"बघ एक दिवशीं फांसावर लटकेन तेव्हां समजेल. लांकडी तरवार असली म्हणून काय झालं? मारलाच कीं नाहीं तुला?"

मुलाच्या या बोलण्यांत ठाकूरसाहेब क्षणभर स्वत:ला विसरून गेले. इकडे दहाचीं अकरा मिनिटें होतांच लियातकअल्लींनीं लाठी चालवण्याचा हुकूम दिला. पाहतां पाहतां आंबराईत लाठ्या फिरूं लागल्या. आज आंबराईत ठाकूरसाहेबांकडच्या स्त्रिया, मुलें, त्याचप्रमाणें गांवांतले लहान-मोठे लोक सण साजरा करायला जमले होते. त्यांचीं तबकें, राख्या, हार, गुलाल, नारळांनीं भरलेलीं दिसत होतीं. पण थोड्याच वेळांत गंध-गुलालांनीं भरलेलीं तीं तबकें रक्तानें भरून गेलीं.

* * *

आपलें काम संपवून पोलिस गेल्यावर पाहिलें तों जखमी लोकांची संख्या जवळजवळ तीस होती. मुलें, स्त्रिया आणि सात-आठ जणें जास्त घायाळ होतीं. विजयला सर्वांत जास्त लागलें होतें. कांतीलाही मार बसला होता. पण विजयहून कमी! ठाकूरसाहेबांचा सर्व परिवार घायाळ होता. जखमी लोकांना त्यांच्या घरीं पोंचावण्यांत आलें. आंबराईत पोलिसांचा पहारा होता.

विजयची अवस्था जास्त-जास्तच वाईट होत होती. ज्या वेळीं तो शेवटच्या घटका मोजीत होता त्याच वेळीं ठाकूरसाहेबांना कोर्टांतून समन्स आलें. त्यांना हें विचारण्याकरितां बोलावलें होतें कीं, 'आंबराईत

सत्याग्रहींचा मेळावा कसा आणि कोणाच्या हुकुमानें जमला होता?' ठाकूरसाहेब ऑनररी मॅजिस्ट्रेटच्या जागेचा–रायसाहेबीचा राजीनामा खिशांत ठेवूनच गेले होते. त्यांचें निवेदन पुढीलप्रमाणें होतें—

माझ्या बगीच्यांत असहयोगी कधींच जमले नव्हते, कारण मी सरकारी कृपेंतला मनुष्य आहे. सरकारच्या नोकरीवर माझा विश्वास होता. घरांत बसून वर्तमानपत्रांतल्या बातम्या मी वाचीत होतों. पण त्या मला कधींच खऱ्या वाटल्या नाहींत. बापाच्या नांवावर निरपराधी मुलें, स्त्रिया व लोक यांच्यावर लाठ्या चालविल्या जातील अशी मला कधीं बातमीही आली नाहीं. आज सारा प्रकार पाहिला. माझा असा विश्वास आहे कीं, ही राजनीति प्रजेचर हितकारक होत नसेल–तर त्यांत अवश्य बदल झाला पाहिजे. राजनीतींत बदल करणें हा प्रत्येक हिंदी मनुष्याचा धर्म आहे. मी माझ्या धर्माचें पालन करणारा आहें. हा माझ्या सरकारी कृपेनें मिळालेल्या हुद्यांचा राजीनामा!" ठाकूरसाहेब ताबडतोब कोर्टाबाहेर पडले.

* * *

दुसऱ्या दिवसापासून आंबराईत राष्ट्रीय गाणीं गाणारीं माणसं रोज पकडलीं जाऊं लागलीं. इतके दिवस सरकारच्या कृपाछत्राखालीं असलेल्या साठ वर्षांच्या ठाकूरसाहेबांना सहा महिन्यांची सक्तमजुरी व ५०० रु. दंड झाला. दंडाच्या वसुलींत त्यांच्या आंबराईचा लिलांव झाला. जियें दरवर्षीं पावसाळ्यांत मुलें झोके घेत होतीं, त्या ठिकाणीं पोलिसचौकी केली गेली होती.

● ● ●

"उद्यां रात्रीं मी जातों आहें."

"नाहीं. आतां आपण जाऊं शकणार नाहीं." आग्रह, अनुरोध आणि आवेशयुक्त स्वरानें वीणा म्हणाली.

निरंजन जरासे हंसले, न बोलतां त्यांनीं खिशांतून एक पत्र काढलें. तें वीणासमोर फेंकून ते म्हणाले,

"तुम्ही हें पत्र वाचा. माझी कांहीं हरकत नाहीं. त्यानंतरही तुम्हांला मीं जाऊं नये असं वाटत असेल तर तुम्ही 'जा' म्हणेपर्यंत मी हलणार नाहीं."

वीणा मान हलवून म्हणाली, "राहूं द्या. मी पत्रबित्र वाचणार नाहीं अन् तुम्हांला जाऊंही देणार नाहीं."

निरंजन हंसत हंसत म्हणाले, "पण पत्र वाचल्यावर तो शत्रु नसून मित्र आहे, असेंच तुम्हांला वाटेल."

वीणा तिरस्कारानें म्हणाली, "हें शक्यच नाहीं. जो आपल्याला माझ्याकडून नेऊं इच्छितो त्याला मी कोणीही असला तरी शत्रूच म्हणेन."

निरंजन म्हणाला, "खरं!! पण तुम्ही असा विचार कां करतां?"

वीणानें निरंजनचे बोलणें ऐकलें नाहीं. ती पत्र वाचीत होती. त्यांत लिहिलें होतें—

"प्रिय.....

महिन्यापूर्वी तुमचें पत्र आलें होतें. एक-दोन दिवसांत इथलें काम आटोपून रविवारपर्यंत येतों, असं तुम्हीं लिहिलं होतं. त्यानंतर किती रविवार गेले. रोज मी तुमची वाट पाहतें. प्रत्येक गाडीच्या वेळेला माझे कान उत्सुकतेनें दाराकडे लागतात. असं वाटतं कीं, टांगा थांबला आणि तुम्ही आलांत! मला ठाऊक आहे कीं, तुम्ही उगीच वेळ दवडीत नाहीं. पण मन ऐकत नाहीं. पंख असते तर उडत तुमच्याजवळ आलें असतें. तुम्ही कधीं याल? जिवंत असून मला मेल्यासारखें वाटत आहे."

निरंजननें पत्र उचलून घेतलें व म्हणाला, "इच्छा नसेल तर वाचूं नका पत्र. पण—"

मध्येंच त्याला थांबवून वीणा म्हणाली, "द्या बरं! पाहूं कोणाचं पत्र आहे तें? पत्रलेखक कोणीतरी शत्रु समजला पाहिजे. त्याशिवाय कांहीं तो तुम्हांला माझ्यापासून ओढून नेत नाहीं."

"जेव्हां दोन पक्षी एकत्र जमतात तेव्हां हृदयांत कालवाकालव होते. कुठपर्यंत मला प्रतीक्षा करावी लागेल हें कळवाल का? तुमची इच्छा असेल तेव्हां या. मला तर वाटतं पत्राच्या उत्तरादाखल तुम्ही स्वतः निघून याल."

पत्र वाचतां वाचतां वीणाच्या चेहऱ्यावर अनेक वेळां विषादाच्या छटा येऊन गेल्या. पत्र वाचून मुकाट्यानें तिनें निरंजनच्या हातांत दिलें. निरंजननें तें घेऊन खिशांत ठेवलें. कांहीं वेळ दोघेंही गुपचूप होतीं. नंतर उमरखय्यामच्या रुबायांचा अनुवाद करण्याचें रोजचें काम सुरूं झालें. निरंजन शांत, अविचल होते. पण वीणा आज नीट वाचूं शकत नव्हती आणि अर्थही सांगूं शकत नव्हती. ती अस्वस्थ झाली होती. तिची अस्वस्थता निरंजनपासून लपून राहिली नाहीं. त्यांनीं म्हटलें, "आज आपलें काम राहूं दे. उद्यां होईल. चला. थोडा फोनो तरी ऐकूं."

फोनो सुरू झाला. इंदुबालाची रेकॉर्ड होती. "राजन तुम काहेको तेहा लगाए." एकदां, दोनदां, तीनदां तीच रेकॉर्ड तिनें लाविली. वीणाचे यजमान कुंजबिहारी संधि साधून घरीं आले. वीणाला उदास पाहून म्हणाले, "तुला किती वेळां सांगितलं कीं इतकं काम करूं नकोस. पण तूं ऐकत नाहींस. घरीं आरशांत तोंड तर बघ जाऊन. कसं दिसतं आहे तें!"

वीणा कांहींच बोलली नाहीं. निरंजन म्हणाले, 'मी पण यांना तेंच सांगत होतों. सर्व कांहीं ठीक होईल. पण त्या ऐकतात कुठें!"

निरंजन गेल्यानंतर एक दिवस रात्रभर जागून वीणानें सर्व रुबायांचा अनुवाद करून टाकला. 'एकवेळेला तें वाचण्याचीच मला आवश्यकता होती.' निरंजनच्या पत्नीचें पत्र वाचल्यानंतर वीणाला स्वतःलाच एक प्रकारचा कमीपणा वाटूं लागला. निरंजनवरचें आपलें प्रेम स्वार्थी आहे असें तिला वाटायला लागलें. कारण त्यांचा सहवास आवडतो म्हणून आपण त्यांना दुराग्रहानें अडवीत आहों. निरंजनाच्या पत्नीची नम्रता, तिचें शील आणि विश्वास यांच्यासमोर ती आपल्याला हीन मानूं लागली.

निरंजन हे नम्र वृत्तीचे गृहस्थ होते. विशेषेंकरून स्त्रियांच्यासमोर ते जास्त नम्रता धारण करीत. त्यामुळें वीणाचा आग्रह त्यांना मोडवेना. कितीतरी वेळां जाण्याचा निश्चय करून ते जाऊं शकले नाहींत. मात्र वीणानें ठरविलें कीं, 'त्यांना आतां अडवायचें नाहीं. त्यांचं जाणं मला फार त्रासदायक होईल हें मी जाणतें, पण स्वतःच्या स्वार्थाकरितां पति-पत्नीला विरहांत टाकणं हा कुठला न्याय! मी सर्व सहन करीन, पण त्यांना अडवणार नाहीं.'

दुसरे दिवशीं ठरलेल्या वेळीं निरंजन आले. वीणा त्यांना दिवाण-खान्यांतच भेटली. त्यांना पाहतांच उठून हंसत म्हणाली (हें तिचें हास्य फक्त ओठावरच होतें. तिचें मन रडत होतें. निरंजन जातांच आपल्याला उन्माद होईल असें तिला वाटत होतें.):-

"कसं काय निरंजन! जाण्याची तयारी झाली?"

निरंजन नम्रतापूर्वक म्हणाले, "नाहीं. मी आज कुठें जातों आहें! आपल्या रुबायांचा अनुवाद पूर्ण होईपर्यंत मी तर इथेंच रहाणार आहें."

वीणा म्हणाली, "सर्व रुबायांचा अनुवाद पूर्ण करून झाला. पाहून घ्या एकदां!"

निरंजननें आश्चर्यानें विचारलें, "खरं! रात्रीं आपण फार श्रम केलेत असं दिसतंय?"

वीणा—"हो. श्रम तर पडलेच. पण आपल्याला आज जायचं आहे ना? आतां येवढं हें पाहून घ्या. दोन-तीन तासांचा प्रश्न आहे फार तर!"

निरंजन हंसून म्हणाले, "कां, माझ्यावर रागावलांत का? इतक्या लवकर कां मला घालवायला बघतां? जाईन सवडीनें मी."

निरंजनकडे एक मार्मिक कटाक्ष फेंकीत वीणा म्हणाली, "निरंजन! मी तुमच्यावर रागावलें? तुम्हांला तें खरंही वाटणार नाहीं. पण ज्या रितीनें माझ्या आग्रहाखातर आपण आजपर्यंत राहिलांत तसेच आज माझ्या अनुरोधानें आज रात्रीच्या गाडीनें निघून जा."

निरंजननीं एकवेळ वीणाकडे पाहिलें व ते रुबायांचा अनुवाद पाहूं लागले.

● ● ●

पंडित रामधन तिवारींना परमेश्वरानें सर्व कांहीं दिलें होतें. पण मुलां-शिवाय त्यांचें घर सुनें दिसत होतें. धनधान्यांनीं भरलेलं घर त्यांना जंगलासारखें वाटत असे. संततीकरितां त्यांनीं अनेक प्रकारचे जप, विधी केले. शेवटीं उतरत्या वयांत मुलगा नाहीं, पण एक मुलगी त्यांना झाली. या वेळीं त्यांनीं खूप सढळ हातानें खर्च केला. गांवभोजन दिलें. मुलगी खरी पण तिच्यामुळें तिवारींचा निपुत्रिकपणाचा कलंक दूर झाला होता. मुलीचा रंग गोरापान, मोठमोठे डोळे आणि सरळ नाक होतें. केस दाट, काळेभोर आणि मस्तकभर असून सुंदर दिसत होते. तिचे नांव ठेवलें सोना. सोनाचें पालनपोषण मोठ्या लाडानें होऊं लागलें.

सोना सात वर्षांची झाल्यावर घरांतच मास्तर ठेवून तिचें हिंदी शिक्षण सुरूं झालें. थोड्याच दिवसांत ती रामायण-महाभारतासारखे धार्मिक ग्रंथ वाचूं लागली. गांवांतल्या सर्व लोकांनीं सोनाच्या कुशाग्र बुद्धीची वाहवा केली. यापेक्षां जादा शिकून मुलीला नोकरी करावयाची नसल्यानें तिचें शिक्षण बंद झालें.

आतां सोना नऊ वर्षांची सुंदर, सुकुमार बालिका होती. तिचें सौंदर्य पाहून गांवांतले लोक म्हणत, "तिवारी ! तुमची मुलगी खेड्यांत राहण्या-

लायक नाहीं. तिचें लग्न तुम्ही शहरांत कुठें तरी करून द्या. शहरांत मोठी चैन असते म्हणतात!"

तिवारींची बहीण (जानकी) पहिल्यानें गांवांतच राहणारी, पण आतां शहरवासी झालेली होती. जेव्हां कधीं ती एखादे वेळीं गांवांत येत असे तेव्हां तिची स्वच्छ रुंद कांठाची साडी, अर्ध्या बाह्यांचे लेस लावलेलें पोलकें, टिकलीऐवजीं लाल कुंकू आणि पायांत काळेभोर स्लिपर पहायला गांवांतल्या सर्व स्त्रिया जमत असत. गांवांतल्या तरुणांना कुतूहल होई; तर म्हाताऱ्यांना फारसें खपत नसे. पण सर्वांना तो एक नवा विषय झाला होता. जानकीचे यजमान नारायण यांना मिलमध्यें नोकरी असून २० रु. दरमहा मिळत होता. तो आतां खेडवळ राहिला नसून पूर्ण पांढरपेशा बनला होता. धोतराऐवजीं पायघोळ पायजमा, शर्ट, जाकीट, कोट, पगडीऐवजीं काळी टोपी, पायांत 'पंपशू' असा त्याचा पोशाख असे. जेव्हां तो अशा थाटांत गांवांत येई तेव्हां कानांतल्या हीना, वाळा यांच्या अत्तराच्या वासानें खेड्यांतील लोक खूष होत. त्यांना आपल्या जीवनापेक्षां शहरीं जीवन जास्त आकर्षक व सुखदायक वाटत असे.

* * * *

शहरी जीवनाचे हे फायदे लक्षांत घेऊन व स्वतःचें रूप पाहून तिची आई नंदो हिनें ठरविलें होतें कीं, तिला शहरांतच द्यावयाची. पायांत तोरड्या व काळे काळे स्लिपर घातलेली, रुंद कांठाचें स्वच्छ पातळ नेसलेली, आणि लेसचें जाकीट अंगांत घातलेली आपली सोना किती सुंदर दिसेल! या कल्पनेनें ती हर्षविव्हल होत असे. सोनाला या गोष्टींचें कांहींच ज्ञान नव्हतें. आपल्या खेड्यांतील स्वच्छंद जीवनांत ती मस्त होती. दिवसभर ती फुलपांखराप्रमाणें बागडत असे. खेळांत दंग असली म्हणजे तिला खाण्यापिण्याचेंही भान रहात नसे. सुंदर वस्तु जमा करून त्यांचें निरीक्षण करण्याचें जणुं तिला वेडच होतें. तिची बरोबरी करणारी कोणीही मुलगी

नसल्यानें तिचें फारसें सख्य नव्हतें. नंदोला हें मुलीचें वर्तन फारसें पसंत नसे. पण ती त्याला आळा घालूं शकत नव्हती. एखादे वेळीं जर ती कांहीं बोलली तर तिवारी तिला रागावून म्हणत, "बोलून-चालून मुलगी ! परक्याचें धन ! लवकरच दुसऱ्याच्या घरीं जाणार ! कशाला तिच्या मागें लागतेस ! आहे तितके दिवस तिला नाचूं-खेळूं दे. जन्ममर थोडीच आपल्या घरीं राहणार आहे ?" यावर बिचारी नंदो चूप रहात असे.

हळूं हळूं सोनानें तेराव्या वर्षांत प्रवेश केला. बिचारीचें तिकडे लक्षच नव्हतें. एक दिवस नंदो त्यांना म्हणाली, "मुलीच्या लग्नाची कांहीं काळजी आहे कीं नाहीं ?"

तिवारी अन्यमार्गानें म्हणाले, "सोनाचें लग्न ! किती वय आहे तिचें ? असं किती दिवस चालणार ? मुलीचें लग्न हें झालेंच पाहिजे."

सोनाबरोबर लग्न होऊं शकेल असे कितीतरी मुलगे गांवांत होते. पण नंदो आणि तिवारींना शहरांतलें स्थळ हवें होतें. शहरांतल्या जीवनाचें रम्य स्वप्न राहून राहून त्यांच्या नजरेसमोर येत असे. जानकी आणि नारायणला त्यांनीं स्थळं पहायला कितीतरी वेळां सांगितलें होतें.

सोना बारा वर्षाची असली तरी ती एक अल्लड मुलगीच होती. तिचे सर्व खेळ, पानं-फुलं गोळा करणें आणि फुलपांखराच्या मागें धांवणें सुद्धां तसेंच सुरूं होतें. हळूं हळूं यौवन तिच्यावर आपला प्रभाव गाजवीत होतें. पण सोनाला त्याचें ज्ञानही नव्हतें. आठ वर्षाच्या मुलीप्रमाणें अजूनही ती निष्पाप, निरागस अशी होती.

एका चारित्र्यवान् सुंदर बावीस-तेवीस वर्षाच्या वराबरोबर सोनाचें लग्न झालें. त्याला प्रेसमध्यें नोकरी असून ७५ रु. महिना मिळत होते. एका म्हाताऱ्या आईशिवाय त्याला दुसरें कोणी नव्हतें. बिहारचे राहणारे असून कांहीं दिवसांपासून त्यांचें वास्तव्य युक्तप्रांतांत होतें. पडदा—जुन्या रूढीचे ते पक्षपाती होते. त्यांचें नांव विश्वमोहन. त्यांच्या घरांत दाराला व

खिडक्यांना सुद्धां चिकाचे पडदे होते. जमिनीवर बैठक असून मध्यभागीं एक वाटोळें मेज व तीनचार खुर्च्या होत्या. विश्वमोहननीं जेव्हां तिवारींना आग्रह करूनच चहा प्यायला लावला तेव्हां तिथला थाट पाहून तिवारी आश्चर्यानें गोंधळून गेले. आनंद त्यांच्या डोळ्यांत नाचत होता. सुंदर कपबशींतून खुर्चीवर बसून चहा पिण्याचा त्यांचा पहिलाच प्रसंग होता. चहापानानंतर थोडीशी वरदक्षिणा देऊन तिवारींनीं लग्न निश्चित केलें. परत येतांना वाटेंत नारायण म्हणाला, "काय तिवारी ! आहे कीं नाहीं मुलगा हजारांत एक ! आहे तुमच्या गांवांत असा कोणी ? सूटबूट, हॅट घालून निघाला कीं साहेब नाहीं असं कोण म्हणेल ? सर्व लोक वांकून सलाम करतात. घर पाहिलत ना ? घरांत सर्व दारांना पडदे ! इतकी म्हातारी आई आहे, पण कोणाला तिची सावली दिसेल तर शपथ ! दोन वेळां चहा पितात; खुर्चीवर बसतात. मजा आहे !"

तिवारी हर्षोत्फुल्ल होऊन म्हणाले, "नारायण, मी तुझा सदैव ऋणी राहीन. आम्हांला शोधूनही असं घर मिळालं नसतं. खेड्यांत राहणारे आम्ही ! शहरच्या गोष्टी आम्हांला कांय माहिती ? पण सोनाला तुम्हीं आपली मुलगी समजून इतकी खटपट केलीत आणि असं स्थळ मिळवून दिलंत याचं फळ परमेश्वर तुम्हांला जरूर देईल.

नारायण—बरं आतां जाऊन लग्नाची तयारी करा. खाण्यापिण्याची नीट व्यवस्था करा. शहरचीं माणसं सर्व कांहीं मदत करतील, पण खाण्या-पिण्याची व्यवस्था नीट हवी. खेड्याची मिठाई त्यांना चालणार नाहीं; कोणी शहरांतलाच हलवाई घेऊन जा. समजलं !

तिवारी आनंदानें घरीं आले. घरीं येऊन जेव्हां त्यांनीं मुलाच्या रूप-गुणाचें, घराचें सविस्तर वर्णन केलें तेव्हां नंदोचा आनंद गगनांत मावेना. तिला पाहिजे होतं तसं घर ईश्वरानें मिळवून दिलें. या कृपेबद्दल तिनें

परमेश्वराला शतशः धन्यवाद दिले. नारायणवर आशिर्वादांचा वर्षाव केला. कारण त्यांनींच धांवपळ करून हें स्थळ मिळवून दिलें होतें.

सोनानें जेव्हां लग्नाची बातमी ऐकली तेव्हां धांवत येऊन ती आईला म्हणाली, " आई ! लग्न म्हणजे काय ग ! अन् तें कशाला करतात? "

आईला कळेना याचं उत्तर कसं द्यावं तें ! पण चतुर जानकीनें पटकन सांगितलें, " सोना, लग्न झालं कीं, चांगले चांगले दागिने व कपडे मिळतात ! याकरितां लग्न करायचं !

सोना—आत्या, मग काय होतं ग ?

जानकी—मग सासूच्या घरीं जावं लागतं. मी तुला आपल्याबरोबर घेऊन जाईन.

" लग्न झाल्यावर सासूच्या घरीं जावं लागतं हें मला ठाऊक आहे ग ! पण सांगून ठेवतें, मी कुठें जाणार नाहीं. वाटेल तर लग्न करा नाहींतर करूं नका. " असं बोलून ती खेळायला निघून गेली. नंदोचे डोळे भरून आले. ती डोळे पुशीत म्हणाली, " अजून लहान आहे. मोठी झाली कीं, आपोआप समजायला लागेल. "

जानकी–" मग सासरहून दोन-चार दिवसांकरितां माहेरीं येणं जिवावर येईल वहिनी ! माझंच पहाना दोन-चार दिवसांकरितां येतें, पण सारखं लक्ष तिकडे असतं. एकदां संसाराचा भार अंगावर पडला म्हणजे खेळणं-नाचणं सारं विसरून जातं. जोंपर्यंत लग्न होत नाहीं तोंपर्यंतच खेळण्या-बागडण्याची मजा.

नंदो–जानकीताई ! तुमच्या सर्वांच्या आशिर्वादानं माझी सोना सुखी होवो. जसं तिचं नांव सोना आहे तसा तिच्या जीवनांत सोन्याचाच पाऊस पडत राहो म्हणजे झालं.

* * *

सोनाचें लग्न झालें. तिचें लग्न ही गांवांत एक विशेष गोष्ट होती. या लग्नांत आग्र्याहून भजनमंडळी आली होती. फार सुंदर उपदेशपर भजनें झाली. कपडे, दागिने सर्व नव्या पद्धतीचे. साड्या, जोडे, पावडरचे डबे, सुवासिक तेलें एकाहून एकेक उंची वस्तु. जानकी आणि नंदो यांनीं कधीं कल्पनाही केली नव्हती. गांवच्या सर्व स्त्रियांना नंदो मोठ्या कौतुकानें सर्व वस्तु दाखवी. सोनाच्या भाग्याची प्रशंसा करीत पहाणाऱ्या घरीं जात. ज्या दिवशीं नंदोनें सासरचे सर्व दागिने व कपडे घातलेल्या आपल्या मुलीकडे पाहिलें त्या वेळीं तिला मोठा अभिमान वाटला. दृष्ट लागूं नये म्हणून तिनें गालबोट लावलें. ज्याची नजर सभोंवार जाई तो तिच्याकडे पहातच राहात असे. खरोखरच ती नांवाप्रमाणें होती.

पाठवणीच्या वेळीं माय-लेकी खूप रडल्या. तिवारीच्या कमरेला विळखा घालून जेव्हां सोना रडूं लागली तेव्हां त्यांचेंही धैर्य खचून ते मोठ्यानें रडूं लागले. सोना सासरीं गेली. मुलीच्या विरहाबरोबर तिवारींना एक समाधान होतें कीं, ती चांगल्या ठिकाणीं पडली. सुखांत राहील.

सोना सासरीं पोंचली. रस्त्यांत कांहीं फारसें वाटलें नाहीं. पण सासरीं गेल्यावर जेव्हां खोलींत बंदिस्त होऊन पडावें लागलें तेव्हां तिला तें जीवन असह्य वाटूं लागलें. आतां तिला कपडे, दागिने आनंद देईनासे झाले. राहून राहून मोकळ्या हवेंत फिरण्याकरितां तिचा जीव तळमळूं लागे. स्वच्छंद वातावरणांत फिरणाऱ्या बुलबुल पक्ष्याला पिंजऱ्यांत कोंडल्यानें त्याची जशी परिस्थिति होते तशी सोनाची झाली होती. चार-सहा दिवसांत गालावरचे गुलाब पिवळे पडले. डोळे भारावून गेले. एक दिवस विश्वमोहन ऑफिसांत गेले होते. सासू निजली होती. सोना अंगणाबाहेरच्या दरवाज्याजवळ जाऊन चिकाचा पडदा जरा बाजूला करून पाहूं लागली. खेड्यांतलें सौंदर्य इतकें नव्हतें, पण हवा मोकळी होती. इतक्या दिवसांनंतर क्षणभर मिळालेल्या हवेनें तिचें चित्त प्रसन्न झालें. पण त्याच वेळीं

एक म्हातारी बाहेर आली. सोनाला तिनें पडद्याजवळ पाहिलें. तिनें विश्वमोहनच्या आईला जाऊन सांगितलें, " सुनेला जरा संभाळून ठेवा. लग्नाला अजून वर्ष-सहा महिने झाले नाहींत तोंच ती बाहेर डोकावून पहाते. हीं लक्षणं कुलीन घरच्या सुनालेकींना शोभत नाहींत. तुमचं वय येवढें झालें, पण तुमचं नख सुद्धां अजून कोणाला दिसलं नाहीं. अन् तुमच्या सुनेचीं हीं लक्षणं ! ! यालाच कलियुग म्हणतात बरं ! " म्हातारी उपदेश करून निघून गेली. चिकाच्या पडद्याजवळ भेटल्यानें आपण काय अपराध केला हें तिला समजेना. तरीसुद्धां बिचारीनें मुकाट्यानें सर्व ऐकून घेतलें. काय करणार बिचारी ! एक दिवस जेव्हां तिवारी तिला माहेरी न्यायला आले तेव्हां तिला बुडतांना कोणीतरी काढीत असल्यासारखें वाटलें. वडिलांना पाहून तिला फार आनंद झाला. तिनें मनांत पक्का निश्चय केला कीं, " आतां गेलें म्हणजे पुन्हां या घरांत कधीं परत यायचं नाहीं. "

* * *

पण शहरांतले लोक सासुरवाशिणींना माहेरीं जास्त दिवस राहूंच देत नाहींत. सोनाला माहेरीं येऊन पंधरा दिवस होतात न होतात तोंच विश्वमोहन तिला न्यायला आले. त्यांना येतांना वाटेंतच चिंचेच्या झाडावर चढलेली सोना दिसली. तिच्याबरोबर आणखी बरेच मुलगे व मुलीही होत्या. तिचें मस्तक उघडें होतें व ती चिंचा तोडून खात होती. त्या ती खालच्यांना फेकून मारून हंसत होती ! विश्वमोहननें सोनाला पाहिलें, पण तिला ते दिसले नाहींत. पत्नीचें हें वर्तन त्यांना सहन झालें नाहीं. त्यांचे डोळे आरक्त झाले. पण राग त्यांनीं मुकाट्यानें गिळून टाकला. त्या वेळीं त्यांनीं सोनाला पुन्हां माहेरीं न पाठविण्याची मनांत प्रतिज्ञा केली. ते जाऊन घरांत बैठकीवर बसतात तोंच आपल्या खेळगड्यांना घेऊन सोना आली. विश्वमोहनला पहातांच हातांतील चिंचा फेंकून तिनें माथ्यावरून पदर ओढीत ती आंत पळाली. पुन्हां सासरीं जावें लागणार या कल्पनेनें तिचें मन व्याकुळ झालें.

सोना पुन्हां सासरीं आली. या वेळेला संसाराचा सर्व भार सोनावर सोपवून तिच्या सासूनें आपली सुटका करून घेतली. कधीं कामाची संवय नसल्यानें तिला घरकाम करणें अत्यंत त्रासदायक होई. रोज सासूचीं बोलणीं ऐकावीं लागत. खेळणें, खाणें आणि फुलपांखराप्रमाणें स्वच्छंद विहार हें ती शिकली होती. घराच्या गाड्याला आपल्याला कधीं तरी जुंपावें लागेल असा विचार तिच्या मनांत आलाच नाहीं. महिना-पंधरा दिवसांच्या संवयीनें ती हेंही काम नीट करूं लागली.

घरांत रात्रंदिवस कोंडून घेण्याची तिला संवय नव्हती. बाहेर जाण्याकरितां सदा तिचा जीव तडफडत असे. फेरीवाल्यांचे आवाज ऐकले कीं तिच्यानें रहावत नसे. हा कैदखाना तिला असह्य वाटत होता. तिला फार दिवस या बाबतींत मन आवरतां आलें नाहीं. नवऱ्याचा व सासूचा डोळा चुकवून ती कधीं दरवाज्याजवळ तर कधीं खिडकीजवळ उभी राहून बाहेरचें दृश्य पहात असे. हिरवीं-हिरवीं झाडें व पानें, फुलें पाहून तिला समाधान वाटत असे. बाहेरच्या मोकळ्या हवेच्या स्पर्शानें तिला ताजेतवानें वाटत असे. बाहेर उभें राहण्यांत पाप नाहीं, हें तिला समजत होतें. पण सासूच्या व नवऱ्याच्या धाकानें तें तिला चोरून करावे लागे. भोंवतालच्या लोकांना हें सहन झालें नाहीं. नुकतीच लग्न होऊन झालेली मोठ्या घरची सून नेहमीं दरवाज्याबाहेर–खिडकीबाहेर पहाते ! तेव्हां ती आचरणभ्रष्ट असली पाहिजे. हळूं हळूं सोनाच्या चालचलणुकीची चर्चा शेजारीं होऊं लागली. जुन्या लोकांना तिचें वर्तन वाईटच वाटत असे. आळींतलीं उडाणटप्पू मुलें तिच्या घरावरून अनेक वेळां शिट्या वाजवीत जात.

सोनाचें या गोष्टीकडे लक्षही नव्हतें व तिला त्याची पर्वाही नव्हती. ती निसर्गपूजक होती. त्या निसर्गाचें दर्शन घेण्याकरितां ती खिडकी, दरवाजाजवळ जात असे. लोकांच्या कुणकुणीकडे ती कशाला लक्ष देते !

म. रा. स. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. क. ३६५२ नों. दि. .....
दि. ०१.०१.....

कांहीं कामाकरितां सोनाची सासू परगांवीं गेली होती. विश्वमोहन कचेरींत गेले कीं ती पूर्ण स्वतंत्र असे. हरिणीप्रमाणें तिचा स्वच्छंद विहार चाले. अडविणारें–रागावणारें कोणी नव्हतें. कधीं कधीं ती चिकाच्या पडद्याबाहेरही जात असे. शेजारच्या बऱ्याचशा स्त्रियांशीं तिची ओळख झाली. त्या सोनाकडे येत. सोनाही लपून-छपून दोनप्रहरीं त्यांच्याकडे जाऊन येत असे. आपल्या वर्तनाबद्दल लोक आपल्यामागें काय बोलतात तें तिला कळत नव्हतें. त्यांना उलट ती आपले जिवाचे मित्र समजत असे. तिच्याशीं तासन् तास गप्पा मारणारेच बाहेर जाऊन तिच्याबद्दल वाटेल तें बोलत. हळू हळूं ही चर्चा विश्वमोहनच्या कानापर्यंत पोंचली. या गोष्टीचें निवारण करण्याकरितां आई असणें आवश्यक वाटून त्यांनीं तिला बोलावणें पाठविलें. सोनालाही संभाळून राहण्याविषयीं त्यांनीं बजाविलें. सासू आल्यावर पुन्हां कैद-खाना सुरूं झाला. खेड्यांत स्वच्छंद वागलेल्या त्या मुलीला तें सहन होईना. ती दुःखी झाली. तिच्याच्यानें घरांत बसवेना. जरा सवड सांपडतांच मोकळ्या हवेचा आस्वाद घेण्याची तिची धडपड चाले. विश्वमोहननीं तिला पुष्कळदां सांगितलें कीं, 'तुझ्या वागण्यामुळें माझी बदनामी होते. तरी तूं खिडकी-दरवाज्याजवळ जात जाऊं नको.' एक-दोन दिवस गोष्ट सोनाच्या लक्षांत राही. पुढें लगेच ती विसरून जात असे. पुन्हां तिचें मन निसर्गाच्या सन्निध जाण्याकरितां धडपडूं लागे.

एक दिवस विश्वमोहनना कांहीं कामाकरितां बाहेरगांवीं जावयाचें होतें. सोनानें पतीच्या जाण्याची सर्व तयारी करून दिली. ते स्टेशनवर निघून गेले. सासूची वामकुक्षी सुरू होती. आपलं घरांतलं काम आटोपून सोनानें वेणी घातली. कपडे बदलले. पुस्तक घेऊन वाचीत पडली. पुस्तक वाचलेलें असल्यानें तिचें मन लागेना. एक-दोन पानें उलटते तोंच फेरी-वाल्याचा 'दोन पैसेवाला', 'दोन पैसेवाला' असा आवाज ऐकूं आला. पुस्तक फेंकून सोना दरवाज्याकडे धांवली. फेरीवाला दूर निघून गेला

होता. लांबपर्यंत तिनें पाहिलें, पण तो दृष्टीस पडला नाहीं. निराश होऊन परत फिरणार तोंच शेजारीं राहणारा एक बाण्याचा मुलगा फैजू धांवत येऊन म्हणाला, " वहिनी ! सुईदोरा असेल तर माझ्या सदऱ्याचं येवढं बटन शिवून द्याना ! मला कुस्ती पहायला जायचं आहे."

सोनानें विचारलें, " कुस्ती पहायला जातोस कीं खेळायला ? "

फैजू हंसून म्हणाला, " दोन्ही कामांकरितां, वहिनी ! पहिल्यांदा बटन लावून तर द्या. नाहींतर उशीर होईल."

सोना सुईदोरा घेऊन बटन लावूं लागली. फैजू तिथेंच थोड्या अंतरावर बसला.

गाडी तीन तास लेट होती. ' इथें बसून काय करायचं ' असा विचार करून सामान स्टेशनवर ठेवून विश्वमोहन घरीं आले. घरीं येतांच फैजू तिथें बसलेला पाहून त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. क्षणभर तिथेंच उभे राहून ते गुपचूप आंत जाऊन आईजवळ बसले. पतीचा राग सोनाच्या लक्षांत आल्याशिवाय राहिला नाहीं. कसेंतरी बटन लावून सहा पैसे घेऊन ती आंत गेली. येवढ्याशा गोष्टीचा इतका पोवाडा होईल ही सोनाला कल्पनाही नव्हती. पतीचा चेहरा पाहून ती ओशाळली. त्यांच्या भुंवया चढल्या होत्या. डोळे लाल झाले होते. ती आली, पण विश्वमोहननीं तिच्याकडे ढुंकूनही पाहिलें नाहीं. भीत भीत तिनें विचारलें, " कसे परत आलांत ? "

विश्वमोहननीं तुटकपणें म्हटलें, " गाडी लेट आहे. "

सोनानें पुन्हां विचारलें, " आतां केव्हां जायचं ? "

विश्वमोहननें तीक्ष्ण दृष्टीनें पालिकडे पहात कठोर स्वरांत उत्तर दिलें, " गाडी तीन तासांनीं जाईल. तेव्हां जाईन. "

सोना नम्रतेनें म्हणाली, " असें बसून कशाला राहतां ? मी पण अंथरूण टाकून देतें. जरा विश्रांति घ्या. "

" तुला श्रम घण्याचा जरुरी नाहीं. माझं सर्व ठीक आहे." विश्वमोहन रुष्टतेनें म्हणाले. सोनानें पुष्कळ आग्रह केल्यावर ते खोलींत जाऊन बसले. निजलेही नाहींत व शब्दही बोलले नाहींत. एक पुस्तक घेऊन ते पानें उलटूं लागले. एक अक्षरही वाचलें नसेल. पण या निमित्तानें आपली मनोवेदना लपविण्याचा ते प्रयत्न करीत होते. सोनाचें वर्तन त्यांना हजार वृश्चिकदंशांप्रमाणें यातना देत होत. सोना पतीची मानासिक अवस्था जाणून होती. ती त्यांच्या जवळ जाऊन बसली. हळूंच तिनें आपलें मस्तक त्यांच्या पायावर ठेवलें व म्हणाली,

" या वेळेला मला क्षमा करा. यापुढें तुम्ही सांगाल तशी मी वागेन, माझ्यावर रागावूं नका. "

विश्वमोहननीं झटदिशीं पाय उचलून घेतले आणि तिरस्कारानें म्हटलें, " ही काय पहिलीच वेळ आहे का ? हें वरवरचं बोलणं आहे. मनापासून नाहीं. मला सर्व ठाऊक आहे. तुझ्यामुळें मला कुठें तोंड दाखवायला जागा राहिलेली नाहीं. जिथें जावं तिथें हीच चर्चा ऐकूं येते. आपल्या तोंडावर कोणी बोलत नसलें तरी मागून कुजबुजतातच. तुला त्याचं कांहींच वाटत नाहीं. मनाला येईल तसं वागतेस ! तो तुझ्याजवळ बटन लावून घ्यायला कां आला ? तूं नाहीं कां नाहीं म्हटलंस त्याला ? तूं सवड दिली नाहींस तर कोण कसं तुझ्याजवळ येईल ? "

सोनानें भयभीत दृष्टीनें पतीकडे पहात म्हटलें, " थोडंसं तर काम होतं. शेजारधर्माप्रमाणें तें करून द्यावं असं मला वाटलं. नाहींतर 'नाहीं' नसतं कां म्हटलं ? "

" लहान लहान गोष्टींतूनच मोठ्या गोष्टी उद्भवतात. संभाळत बैस शेजारधर्म ! माझ्या अब्रूची तुला काय चाड ! " असें बोलून विश्वमोहन बाहेर गेले व सायकल उचलून स्टेशनकडे निघाले.

अपमानानें सोना चिडून गेली. घाव घातलेल्या वृक्षाप्रमाणें ती पलंगावर पडली व खूप रडली. जरा वेळानें तिला जरा बरें वाटलें. तिला आपल्या खेड्यांतील जीवनाची आठवण झाली. त्या सुखद स्मृति तिच्या सुंदर कल्पनेप्रमाणें डोक्यांत थैमान घालूं लागल्या. थंडीच्या दिवसांत शेकोट्या पेटवून लहानमोठे एकत्र जमवून गोष्टी सांगत–याची तिला आठवण झाली. कोणाला कशाच प्रकारचें बंधन नव्हतें. गांवांतल्या सर्व लेकीसुना नदीवर स्नानाला जायच्या व गाणीं गात गात एकदम परत फिरायच्या ! किती सुखमय होतें तें जीवन ! हरबऱ्याची भाजी तोडतांना येणारी सर्वांची मजा–हंसणें-खिदळणें सर्व तिला आठवत होतें. तिथें कोणाची कोणाबद्दल तक्रार नव्हती. शेजारच्या कुंदनकरितां ताईशीं भांडून ती मिठाई घेऊन जात असे. स्नानानंतर कुंदन कधीं कधीं तिची साडी धुऊन देत असे. पण तिथें त्याची कधींच चर्चा झाली नाहीं. एक सुंदर बटवा विणून तिनें कुंदनला दिला होता. तो अजूनही त्याच्याजवळ असेल. यांत कोणाला कांहीं वाईट वाटलें नाहीं. तिथें सर्वांना एकमेकांबरोबर बोलण्याची स्वतंत्रता होती. कुंदनची बहिनी नुकतीच लग्न होऊन आली होती. पण ती आमच्याचबरोबर नदीवर स्नानाला येई व झोपाळ्यावर झोके घेई. मग मीच काय असं पाप केलं, कीं ज्यामुळें शहरांत तोंड काढायला जागा नाहीं. कोणाशीं बोलणं, कोणाचं काम करून देणं हें पाप असेल तर कळत नकळत तें नेहमींच माझ्या हातून घडणार. माझ्याकरितां यांना पदोपदीं लांछन लागेल, मग माझ्या जगण्याला काय किंमत ! यापेक्षां मेलेलं काय वाईट ! मी घरांत पडद्यांत बसूं शकत नाहीं, हाच माझा गुन्हा आहे ना ? याचमुळें लोक माझ्या वर्तनाला नांवें ठेवतात ना ? मी लोकांशीं नीट बोलतें, वागतें, हीच गोष्ट माझ्यांत वाईट आहे ना ? आज ते माझ्यावर रागावले, मला टाकून बोलले, यांत त्यांची कांहीं चूक नाहीं. दगडालासुद्धां रोज दोरीनें ओढलें तर खूण पडते. ते तर देवतुल्य पुरुष आहेत. त्यांचें हृदय कोमल

आहे. या उपकारांचा कसा परिणाम होणार नाहीं ? रामचंद्रासारख्या महापुरुषांनीं क्षुल्लक गोष्टीवरून धर्मपत्नी सीतेला रानांत सोडली ! हे तर काय सामान्य मनुष्य आहेत. त्यांनीं जें म्हटलं तें सर्व बरोबरच होतं. पण यांत माझातरी काय दोष होता ? पण त्यांच्या मनांत जर संशय उत्पन्न झाला असेल तर जिवंत राहण्यापेक्षां मरण बरं.' याप्रमाणें अनेक तर्क-वितर्क तिच्या मनांत आले व गेले.

तीन दिवसांनीं विश्वमोहन परत आले. जातांना घडलेली गोष्ट ते पार विसरून गेले होते. येतांना सोनाकरितां एक सुंदर साडी, एक छानसा जोड्यांचा जोड आणि केसांतले आंकडे वगैरे सामान त्यांनीं आणलें होतें. पण समोरच ओट्यावर फैजू बसलेला त्यांना दिसला. जवळच्या हिरव्या गवतावर त्याचा 'तितर' चरत होता. त्याला पाहतांच विश्वमोहनचा राग जागा झाला. मनांत संशय पक्का झाला. मागचा सर्व वृत्तांत त्यांना आठवला. अनेक प्रकारच्या शंकाकुशंकांनीं त्यांचें चित्त व्याकुळ झालें. चेहरा गंभीर झाला. घरीं येऊन सोनाशीं ते शब्दही बोलले नाहींत. आईशीं थोडंसं बोलून न जेवतांच ते कचेरींत निघून गेले. सोनाला ती उपेक्षा सहन झाली नाहीं. गेल्या तीन दिवसांत ती दरवाज्याच्या किंवा खिडकीच्या जवळ सुद्धां गेली नाहीं. पुन्हां न जाण्याचा तिनें निश्चय केला होता. विश्वमोहनच्या दुर्लक्षानें तिच्या हृदयावर जबर आघात केला. तिला आपलें जीवन नकोसें झालें. पण त्याचा शेवट करण्याचें साधन तिच्या-जवळ नव्हतें. अंगणांतल्या धोतऱ्याच्या झाडाचीं फळें कुटून तिनें पिऊन टाकलीं. थोड्याच वेळांत तिचे हातपाय आंखडूं लागले. दांतखिळी बसली. चेहरा काळा पडला. डोळे तारवटून ती पहात होती. पण बोलत नव्हती. त्याच वेळीं तिला घरीं नेण्याकरितां तिवारी येऊन पोंचले. त्यांना पाहून सोना खूप रडली. पहातां पहातां सोनाचें प्राणपांखरूं उडून गेलें ! कायमची शांति देणारी झोंप लागली होती. अपवादांचा विषारी वायु आतां तिला स्पर्श करूं शकत नव्हता.

संध्याकाळीं सहा वाजतां विश्वमोहन कचेरींतून परत आले. घरांतून रडण्याचा आवाज ऐकून त्यांचें मन शंकाकुशंकांनीं अस्वस्थ झालें. घरांत येऊन पाहतात तों तिवारी मुलीचें शव कवटाळून जोरजोरानें रडत असलेले त्यांना दिसले. यापूर्वी कितीदां तरी तिवारी मुलीला न्यायला आले होते. पण विश्वमोहननीं तिला पाठविली नव्हती. सासरे-जांवई एकमेकांशीं फारसे बोलले नाहींत. अंत्यसंस्काराची तयारी सुरूं झाली. सर्व आटोपून विश्व मोहन घरीं आले तों टेबलावर त्यांना एक पत्र दिसलें.

"*माझ्या देवा ! मी मरतें आहें. पण आपण विश्वास ठेवा कीं मी* निर्दोष आहें. मला वाटतं मी या जगांत राहण्यालायक नाहीं किंवा जग माझ्या योग्य नाहीं. या कपटी जगांत मला धाडण्यांत परमेश्वरानें चूक केली. मला मरण्याचें दुःख नाहीं. एकाच गोष्टीचें वाईट वाटतें कीं मी आपल्याला कधीं सुख देऊं शकलें नाहीं.

—अभागिनी सोना."

● ● ●

" उद्यां होळी आहे. "

" असेल ! "

" कां तूं होळी करणार नाहींस ? "

" नाहीं. "

" कां बरं ? "

" काय सांगूं, कां तें ! "

" कां तें सांगशील तर खरं ? "

" ऐकून काय करशील ? "

" जें करतां येईल तें. "

" तुला कांहींही करतां येणं शक्य नाहीं. "

" तरी पण मला सांग. "

" काय सांगूं. तुला माहीत नाहीं कां कीं, होळीचा सण हा आनंदाकरितां आहे. जो सुखी आहे तोच होळीचा सण करतो. ज्यांच्या आयुष्यांत जरासुद्धां सुख नाहीं, आनंद नाहीं, त्यांनीं कशाच्या भरंवशावर सण साजरा करायचा ! "

" मग तुझ्याशीं होळी खेळायला मी येऊं नको तर ! "

" काय करणार येऊन ? "

करुणाकडे एक सकरुण दृष्टिक्षेप टाकून नरेश सायकल उचलून घराकडे निघून गेला. करुणाही आपल्या घरकामांत गुंग झाली.

* * *

नरेश गेल्यानंतर अर्ध्या तासानें करुणेचे पति जगत् प्रसाद यांनीं घरांत प्रवेश केला. त्यांचे डोळे लालभडक दिसत होते. तोंडाला मद्याचा तीव्र दर्प येत होता. हातांतली जळकी सिगरेट एकीकडे फेंकून एक खुर्ची ओढून त्यावर ते बसले. भ्यालेल्या हरिणीप्रमाणें पतीकडे पहात करुणानें विचारलें,

"दोन दिवस घरीं आलां नाहींत. प्रकृति बरी नव्हती का? घरीं येणं जमलं नसेल तर निदान निरोप तरी पोंचवायचा कीं नाहीं! मी सारखी वाट पाहतें आहें."

करुणेच्या या बोलण्याकडे त्यांनीं जरासुद्धां लक्ष दिलें नाहीं. खिशांतून रुपये काढून टेबलावर त्यांचा ढीग करीत असतांना ते म्हणाले, "विदुषीप्रमाणें रोज मला शिकवतंस कीं जुवा खेळूं नका, दारू पिऊ नका. हें करूं नका, तें करूं नका. मी जर जुवा खेळत नसतों तर इतके रुपये कुठून मिळाले असते? बघ. बरोबर पंधराशें आहेत. उचलून ठेव. पण लक्षांत ठेव कीं, मला विचारल्याशिवाय यांतला एक पैसा सुद्धां खर्च करतां कामा नये."

जुव्यामध्यें मिळविलेला पैसा करुणेच्या दृष्टीनें कस्पटासमान होता. गरिबींत ती आनंदानें रहायला तयार होती. पण चारित्र्य गमावून मिळविलेल्या पैशानें श्रीमंत होण्याची कल्पनासुद्धां तिच्या मनाला सहन होणारी नव्हती. जगत्प्रसादाच्या भीतीमुळें ती हे विचार कधीं बोलूं शकली नव्हती. आपले स्वतंत्र विचार बोलून दाखविल्यामुळें तिला अनेकदां अपमान आणि तिटकारा सहन करावा लागला होता. आणि यामुळेंच मनांतले सर्व विचार दाबून टाकून ती हळूंच म्हणाली, "तुम्हींच उचलून ठेवा ना! माझे हात पिठाचे आहेत!" करुणेच्या या उत्तरानें जगत्प्रसादांचा राग अनावर झाला. ते तिरमिरीनें उठले आणि म्हणाले, "काय म्हटलंस?" करुणा कांहींच बोलली नाहीं. खालीं मान घालून पीठ चाळण्याचें तिचें काम सुरूंच होतें.

तिच्या या गप्प बसण्यानें जगत्प्रसादांच्या रागाची कमान फारच चढली. रागारागानें त्यांनीं ते पैसे उचलले व पुन्हां खिशांत ठेवून दिले. "मला ठाऊकच होतं तूं असं करशील म्हणून. वाटलं होतं कीं, दोन दिवसांत कांहीं डोकं ठिकाणावर आलं असेल म्हणून ! मागचं सगळं विसरून शहाणी झाली असशील, अशी आशा होती. पण व्यर्थ आहे सगळं ! तुला आपल्या शहाणपणाचा गर्व आहे, तर मलाही आहे. मी जातोंच घरांतून निघून. मग तूं सुखानें रहा." असें म्हणून जगत्प्रसाद खोलींतून जाऊं लागले. मागून धांवत येऊन करुणेनें त्यांचा कोट धरला. आणि नम्रतेनें म्हणाली, "जेवून तर जा. मी पैसे ठेवून देतें. कां उगीच रागावतां ?" एका धक्क्यासरशीं आपला कोट सोडवून घेऊन जगत्प्रसाद निघून गेले. असावधपणें धक्का बसल्यानें करुणा खालीं फर्शीवर पडली. तिच्या डोक्यावर जबर जखम झाली. भळभळां रक्त वाहूं लागलें व तिचें सर्व आंग रक्तानें रंगून गेलें.

संध्याकाळची वेळ होती. जवळच रहाणाऱ्या बाबू भगवतीप्रसादजींच्या घरासमोरच्या चौकांतून आवाज ऐकायला येत होता.

"होली कैसे मनाऊं ? सैंया विदेश, मैं द्वारे ठाढी, कर मल मल पछताऊं"

होळी खेळायला निघालेले होळकर भांगेच्या नशेंत बेभान झाले होते. गाणाऱ्या नर्तकीवर पैशाचा पाऊस पडत होता. जगत्प्रसादांना आपल्या पत्नीची आठवण सुद्धां नव्हती. नर्तकीवर पैसे फेंकणाऱ्यांत त्याचा पहिला नंबर होता. इकडे करुणा दुःखानें बिछान्यावर तळमळत होती.

"वहिनी, दरवाजा उघडा." कोणींतरी बाहेरून हांक मारली.

करुणानें मोठ्या कष्टानें उठून दरवाजा उघडला. हातांत रंगाची पिचकारी घेऊन नरेश समोर उभा होता. त्याच्या हातांतून पिचकारी गळून पडली. त्यानें आश्चर्यानें विचारलें, "वहिनी, हें काय ?"

करुणाचे डोळे आंसवांनीं भरून आले. भरलेल्या आवाजानें ती म्हणाली, "हीच माझी रंगपंचमी, भाऊजी !"

● ● ●

"वहिनी, तूं नेहमींच पांढरीं पातळं कां नेसतेस?"

"कसं सांगूं मुली, तुला!"

"वहिनी, आई तुला रंगीत पातळं नेसूं नको म्हणते का?"

"नाहीं मुली! माझं नशीबच मला नेसूं देत नाहीं. आई काय करील त्याला?"

"हें नशीब कोण आहे ग वहिनी? आईसारखंच रोज तुझ्याशीं तें भांडतं न् तुला शिव्या देतं का?"

सात वर्षांच्या मुलीनें किशोरीच्या गळ्यांत हात टाकून तिच्या पाठीवर पडून झोके घेत म्हटलें, "नशीब कुठें आहे? एकदां मला दाखव ना तें वहिनी!"

पाट्यावरचा वाटलेला मसाला वाटींत भरून घेत असतां किशोरीनें दीर्घ निःश्वास सोडला आणि म्हणाली, "नशीब कुठें आहे तें तुला कसं दाखवूं मुली?"

पदरानें अश्रू पुशीतच किशोरीनें भाजी फोडणीला टाकली. स्वयंपाक तयार व्हायला अर्ध्या तासाचा अवकाश होता. इतक्यांतच मुलीची आई गर्जतच स्वयंपाकघरांत आली व म्हणाली, "दहा साडेदहा वाजून गेले.

अजून स्वयंपाक तयार झाला नाहीं ? मुलं काय शाळेंत उपाशीच जातील ? बाई ! बाई ! बाई ! या अवलक्षणी कार्टीपायीं माझा जीव तर बेजार झाला अगदीं ! घरांत असं कोणतं मोठंसं काम आहे कीं वेळेवर स्वयंपाकही होत नाहीं ? जगांतल्या सगळ्याच बायका कामं करतात, तूंच कांहीं मोठी नवलाची कामं करणारी नाहींस ? ”

मुलीच्या आईनें एका श्वासांत सगळें बोलून टाकलें, आणि पाट घेऊन स्वयंपाकघरांत बसली. किशोरी भीतभीतच म्हणाली,

“ आत्तां तर नऊ वाजताहेत. अर्ध्या तासांत स्वयंपाक तयार होईल. कशाला उगीच त्रास करून घेतां ? ” जवळचा चिमटा घेऊन तो किशोरीच्या अंगावर भिरकावीतच मुलीची आई कडाडली, “ तूं खरी अन् मी खोटी का ? दहा वेळां सांगितलं असेल कीं तोंडाला तोंड देत जाऊं नकोस म्हणून ! कसली येवढी मस्ती आली आहे तुला ? तुझ्यासारख्या पंचवीस पोरी मी हाताच्या बोटावर नाचवीन. चल चालती हो इथून. ”

डोळे पुशीत पुशीत किशोरी स्वयंपाकघरांतून बाहेर आली. छोटीशी मुलगी आपल्या आईचें हें दुष्ट वर्तन आश्चर्यचकित होऊन पहात होती. किशोरी गेल्यावर तीही तिच्यामागून गुपचुप गेली. परंतु आईच्या धाकानें लगेच परतली.

या घरांत हे प्रकार बहुधा रोजच घडत असत.

* * *

मुलें जेवून वेळेच्या अगोदरच अर्धा तास शाळेंत जाऊन पोंचलीं. स्वयंपाक आटोपून मुलीची आई हात धूत होती. इतक्यांत तिचे पति रामकिशोर पत्रकारांशीं बोलणें संपवून घरांत आले. घरांत शांतता पाहून ते म्हणाले, “ मुलं कुठं गेलीत ? ”

नाक चढवून मुलीची आई म्हणाली, “ शाळेंत. आणखी कुठें जाणार ? किती वाजले तुम्हांस कांहीं ठाऊक आहे का ? ”

खिशांतून घड्याळ काढून पहात रामकिशोर म्हणाले, "आतां साडे-नऊन झाले आहेत ! मला कचेरीत जायचंय ना ?"

मुलीची आई ताडकन बोलली, "नक्की तुम्हीं ऐकलं असलं पाहिजे ? लाडक्या सुनेनें नऊ म्हटलें, तुम्ही साडेनऊ म्हणतां ? तिचं बोलणं तुम्ही खोटं कसं ठरूं द्याल ? या घरांत नोकरा-चाकरांना सुद्धां मान आहे, पण मला नाहीं. सगळे खरे, मीच काय ती खोटी !" असं म्हणून मुलीची आई मोठमोठ्यानें रडूं लागली.

"तूं खोटी आहेस असं नाहीं मी म्हणत ! घड्याळच मागें असेल. यांत येवढं रडण्यासारखं काय आहे बुवा !"

बोलत बोलत रामकिशोर स्नान करायला निघून गेले. आपल्या पत्नीचा स्वभाव ते पूर्णपणें ओळखून होते. किशोरीशीं होत असलेलें तिचें तें वर्तन त्यांना माहित होतें.

थोड्याशा कारणावरून किशोरीला मारणं व शिव्या देणं हा रोजचाच प्रकार होता. रामकिशोरांना वाटत असलेलं सुनेबद्दलचें प्रेम व आदर हाच या छळाच्या मुळाशीं होता. किशोरी ही त्यांच्या पहिल्या बायकोच्या एकुलत्या एका मुलाची पत्नी होती. लग्नानंतर लवकरच—थोड्याच दिवसांत—तिचें नशीब फुटलें. बिचारीच्या माहेरीं कोणी नव्हतें. कोणालाही दया यावी अशी तिची स्थिति होती. पण जों जों रामकिशोरजींना सुनेबद्दल प्रेम व आदर वाटे तों तों तिचें वर्तन सुनेशीं वाईट होत होतें. किशोरीवर होणारा अन्याय त्यांना समजत होता. पण आपल्या या बायकोला रामकिशोर फार भीत असत. सरळ गोष्ट सांगायला जाऊन स्वतःवरच संकट ओढवून घेण्याची त्यांची तयारी नसल्यानें बिचारे गप्प बसत. आजही ते मनांत समजले कीं, घरांत कांहींतरी प्रकार घडला आहे व किशोरीला त्याचें प्रायश्चित्त उपासाच्या रूपानें घ्यावें लागणार. म्हणून

किस्मत

कचेरींत जाण्यापूर्वी ते किशोरीच्या खोलीजवळ जाऊन म्हणाले, "उमशी राहूं नकोस बेटा. जेवून घे. नाहींतर मला फार वाईट वाटेल."

"जेवून घे. नाहींतर मला फार वाईट वाटेल." हे रामकिशोरचे वाक्य मुन्नीच्या आईनें ऐकलें. तिच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. मनांत विचार करूं लागली, "या अवदसेवर इतकं प्रेम! कचेरींत जायच्या वेळीं मुद्दाम तिला जेवण्याचा आग्रह करून गेले. माझ्याशीं बोलायला सुद्धां वेळ नव्हता. म्हणे जेवून घे. पाहीन कशी जेवते ती!"

मुन्नीच्या आईनें जेवण आटोपल्यावर सर्व अन्न मोलकरणीला देऊन टाकलें, आणि काम आटोपून बाहेर निघून गेली. किशोरी जेव्हां स्वयंपाकघरांत गेली तेव्हां सर्व भांडीं रिकामीं पडलीं होतीं. भाताच्या भांड्याला दोन-चार शितें चिकटलेलीं होतीं. किशोरीनें तीं काढून तोंडांत घातलीं व पाणी पिऊन ती आपल्या खोलींत निघून गेली.

आज रामकिशोर कचेरींत फारसें काम नसल्यानें लवकरच घरीं परतले. मुलीची आई बाहेर गेली होती. घरांत पत्नी कुठेंच दिसली नाहीं, तेव्हां ते सुनेच्या खोलींशीं आले. सुनेची ती करुणास्पद अवस्था पाहून त्यांचे डोळे भरून आले! "आज जर माझा चंदन जिवंत असता तर हिची अशी दशा झाली असती का?" आपल्या दुर्बलतेचा त्यांनीं मनांतल्या मनांत अनेकवेळां धिक्कार केला. तिचें पातळ ठिकठिकाणीं फाटलें होतें. त्या लुगड्यानें कसेंबसें आंग झांकलें जात होतें. अंथरुण्याच्या नांवानें बाजेवर कांहीं चिंध्या पडल्या होत्या. हाताची उशी करून ती जमिनीवरच पडली होती. त्या अवस्थेंतच तिचा जरासा डोळा लागला होता. पायाची चाहूल लागतांच ती चटकन् उठून बसली. रामकिशोरांना समोर पहातांच संकोचानें तिनें माथ्यावरचा पदर पुढें ओढला. पण डोक्यावरचा ओढलेल्या पदराचा तुकडा तो ओढतांच तिच्या हातांत आला. रामकिशोरांनीं तिचा कोमेजलेल्या कमळासारखा चेहरा व अश्रू आलेले डोळे पाहिले.

त्यांचें हृदय वात्सल्यानें भरून आलें, व ते मृदु-मधुर आवाजांत म्हणाले, "तूं जेवलीस ना बेटा?"

किशोरीच्या तोंडांतून एकदम 'नाहीं' असें निघून गेलें. पण स्वतःला लगेच सावरून ती म्हणाली, "जेवलें ना मी!" रामकिशोर म्हणाले, "मला तर वाटतं तूं जेवली नाहींस." किशोरी कांहींच बोलली नाहीं. तिनें तोंड फिरविलें. तिच्या डोळ्यांतून टपटप आसवें गळत होतीं व ती खालीं मान घालून उभी होती. रामकिशोर पुन्हां म्हणाले, "तूं जेवली नाहींस ना? मला अत्यंत दुःख होतंय! आपल्या म्हाताऱ्या सासऱ्याची एवढी लहानशी गोष्ट तूं ऐकली नाहींस ना?"

किशोरीला काय उत्तर द्यावें तें सुचेना. थोड्या वेळानें ती म्हणाली, "स्वयंपाकघरांत जें कांहीं होतं तें मीं खाल्लं आहे. खोटं सांगत नाहीं आपल्याला!"

रामकिशोरना तें खरें वाटेना. त्यांनीं मोलकरणीला बोलावून विचारलें. ती म्हणाली, "सूनबाईनें तर माझ्यासमोर कांहींच खाल्लं नाहीं. मोठ्या बाईनीं अगोदरच सर्व संपवलं होतं. खाणार तरी काय बिचारी!"

पत्नीच्या या निर्दय वागणुकीचा रामकिशोरांना अत्यंत मनस्ताप झाला. दुर्दैवी सुनेचा गरीबपणा व सौजन्य त्यांच्या हृदयाला भेदून गेलें. खिशांत ५० रुपये होते. त्यांतले दहा काढून सुनेला देत असतांना ते म्हणाले, "हे पैसे तुझ्याजवळ ठेव बेटा! जेव्हां तुला गरज लागेल तेव्हां खर्च कर."

नेमकी याच वेळीं मुलीची आई कुठून तरी वावटळीसारखीं तिथें येऊन पोहोंचली. किशोरीच्या हातांत पोंचण्यापूर्वीच तिनें ते हिसकावून घेतले व रागानें बेभान होऊन म्हणाली, "देवा, देवा, शर्थ झाली! या कलियुगांत काय होईल तें थोडं आहे. पांढऱ्या केसांची तरी कांहीं लाज राखा. मुलीसारख्या सुनेच्या खोलींत घुसायला तुम्हांला लाज नाहीं वाटत! तुमच्या फुशीमुळेंच ही इतकी शेफारली आहे. या थराला गोष्टी आल्या

असतील याची आजपर्यंत मला कल्पना नव्हती. म्हातारपणीं तुम्हांला असे ढंग सुचतील असं वाटलं नव्हतं मला! तुमच्या या पापाच्या भारानं धरणी देखील खालीं जाईल."

इतकें बोलून विजेसारखी वेगानें ती खोलींतून निघून गेली. तिच्या मागोमाग रामकिशोरही गुपचुप निघून गेले. वयानें ते फार नव्हते. पण घरांत होणाऱ्या या रोजच्या कटकटीमुळें आणि पुत्रशोकानें ते अकालीं वृद्ध दिसत असत. मनस्ताप आणि वैतागानें गांजून ते बाहेरच्या खोलींत जाऊन निजून राहिले. आज सारखी त्यांना चंदनची आठवण येत होती. लोडावर डोकें ठेवून ते असहायपणें रडूं लागले. मागून येऊन मुलीनें त्यांच्या गळ्यांत हात घातले व म्हणाली, "बाबा! तुम्ही कां रडतां?" रामकिशोर विरक्ततेनें उद्गारले, "आपल्या नशीबाच्या नांवानें रडतों, बेटी!"

सकाळीं मुलीनें आपल्या भावजयीला नशीबाला दोष देऊन रडतांना पाहिलें होतें. नंतर आतां ती नशीबाच्या नांवानें पित्याला रडतांना पहात होती! तिनें आश्चर्यचकित होऊन विचारलें, "नशीब कुठं राहतं? आपल्या आईचं व त्याचं कांहीं नातं लागतं का?"

मुलीच्या निष्पाप प्रश्नानें त्या दुःखांतही रामकिशोरांना हसूं आलें. आणि ते चटकन उद्गारले, "तें तुझ्या आईचं भावंडं—बहीण म्हणेनास—लागतं."

मुलीला जणूं तें पटलें. ती एकदम म्हणाली, "मग तेंच तें तुम्हांला व बहिनीला पण रडवतं."